



# INCLUSIVE NEWSROOMS

LGBTQIA+ मीडिया मार्गदर्शक पुस्तिका



# INCLUSIVE NEWSROOMS

குயர் சென்னை க்ரோனிக்கிள்ஸ்
Queer Chennai Chronicles

The NEWS Minute

queerbeat

Supported by
Google News Initiative

**सर्वसमावेशक न्यूजरूम्स**

© क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स, द न्यूज मिनिट आणि क्वीअरबीट

पहिली आवृत्ती: जून २०२३

प्रकाशन: क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स आणि द न्यूज मिनिट

सहकार्य: गूगल न्यूज इनीशीएटीव

ईमेल आयडी: news.inq@gmail.com

वेबसाइट: news-inq.com

मुखपृष्ठ: वाई

अक्षरजुळणी: बर्च इंडिया

इनक्लूसिव न्यूजरूम्स लीड्स:

द न्यूज मिनिट:

रागमालिका कार्तिकेयन, वरिष्ठ प्रमुख - श्रोता राजस्व आणि प्रयोग

इनक्लूसिव न्यूजरूम्स - प्रोजेक्ट प्रमुख

क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स:

सी मौली, सह-संस्थापक - क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स

इनक्लूसिव न्यूजरूम्स - प्रोजेक्ट प्रमुख

क्वीअरबीट:

अंकुर पलीवाल, संस्थापक - क्वीअरबीट

इनक्लूसिव न्यूजरूम्स - प्रोजेक्ट प्रमुख

गिरीश, संपादक - क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स

इनक्लूसिव न्यूजरूम्स - क्रिएटीव्ह प्रमुख

सेनथील. कार्यक्रम निर्देशक - क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स

इनक्लूसिव न्यूजरूम्स - संयोजक

# अनुक्रमणिका


- ६ मुख्य प्रश्न ..... 5
- बातमीला क्वीअर करणे: द न्यूज मिनीट कडून एक टीप ..... 7
- भाषेला क्वीअर करणे: क्वीअर चेन्नई क्रॉनिकल कडून एक टीप ..... 9
- प्रस्तावना ..... 11

१. सर्वसामावेशक विचाराने गृहीतकं बदलतात - मनीष गायकवाड ..... 13
२. एलजीबीटीक्युआयए+ शब्दांचा शब्दकोश ..... 15
३. पत्रकारांसाठी मुख्य गोष्टी ..... 22
४. संपादकांसाठी मुख्य गोष्टी ..... 25
५. स्तंभलेखन आणि त्यासाठी निवड ..... 28
६. फोटो आणि विडिओ ..... 31
७. अभिमान यात्रा आणि इतर एलजीबीटीक्युआयए+ कार्यक्रम ..... 35
८. बातम्या आणि चालू घडामोडी ..... 38
9. आरोग्य पत्रकारिता - क्वीअर व्यक्तींच्या आरोग्या बाबत लोकांवर प्रभाव पाडण्यासाठी केल्या जाणाऱ्या गोष्टी नव्याने करणे आणि शिकणे- आजीफा फातिमा ..... 40
१०. आरोग्य ..... 45
११. मानसिक आरोग्य आणि आत्महत्या ..... 48

१२. गुन्हा ........ 51

१३. कायदा आणि न्यायालय ........ 54

१४. राजकारण ........ 59

१५. शिक्षण ........ 65

१६. ऐतिहासिक क्वीअरफोबिया आणि विज्ञान क्षेत्रातील एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे कमी प्रतिनिधित्व ........ 70

१७. विज्ञान ........ 72

१८. मनोरंजन ........ 74

१९. पारलिंगी आणि द्विलिंगी ऍथलीट बद्दल विज्ञान काय सांगते- सायंतन दत्ता ........ 77

२०. क्रीडा ........ 83

२१. व्यवसाय ........ 85

२२. श्रद्धा ........ 89

□ ऋणनिर्देश ........ 92



# ६ मुख्य प्रश्न

## ही पुस्तिका नक्की **काय** आहे?

एलजीबीटीक्युआयए+ समुदाय, व्यक्ती आणि समस्यांबद्दल काम करताना पत्रकार आणि न्यूजरूम रिपोर्टिंग, लेखन किंवा संपादनासाठी ही मीडिया संदर्भ मार्गदर्शक पुस्तिका आहे. यामध्ये कोणत्या संज्ञा वापराव्या (आणि वापरू नये) याचा शब्दकोष आहे, आणि विविध बीट्सवर अनेक भाग आहेत. या पुस्तकात तपशीलवार एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, समुदाय आणि समस्यांबद्दलचे लेख लिहिताना, रिपोर्टिंग, एडिटिंग किंवा बातमी शूट करताना पत्रकारांनी काय करावे यासाठी सहज पाळता येतील अशा सूचना आहेत.

हे एलजीबीटीक्युआयए+ मीडिया संदर्भ मार्गदर्शिका द न्यूज मिनिट आणि क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स द्वारे तयार केले गेले आहे आणि गूगल न्यूज इनीशीएटीव कडून समर्थित आहे.

## आम्ही हे **का** करीत आहोत?

भारतातील वृत्त माध्यमांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे प्रतिनिधित्व अनेकदा चुकीचे, अपमानास्पद, अज्ञानी आणि दृष्टीकोन नसलेले दाखवले जाते. जेव्हा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, पत्रकारांना सदर चुका दाखवतात तेव्हा, आम्हाला मिळालेल्या सामान्य प्रतिसादांपैकी एक म्हणजे, त्यांना माहित नसणे की कोणते शब्द वापरणे योग्य आहे, आणि/किंवा काही चित्रण चुकीचे आहे हे त्यांना समजले नाही.

एलजीबीटीक्युआयए+ समुदाय, व्यक्ती आणि समस्यांचे प्रतिनिधित्व ज्या पत्रकारांना योग्यरित्या करावयाचे आहे त्यांच्यासाठी एक संसाधन असावे जे त्यांना मदत करेल या उद्देशाने आम्ही ही मार्गदर्शिका तयार केली आहे.

## ही मार्गदर्शिका **कोणासाठी** मदत करणारी ठरेल?

एलजीबीटीक्युआयए+ समुदाय, व्यक्ती किंवा समस्यांवर कथा किंवा व्हिज्युअल बनवण्याची/लिहायची/संपादन करायची ज्यांची इच्छा आहे असे सर्व रिपोर्टर, लेखक, संपादक, फोटो पत्रकार, विडिओ पत्रकार किंवा निर्माता यांच्या साठी ही मार्गदर्शिका मदत करेल. हा काही एखादा शैक्षणिक प्रबंध नाही. ही पत्रकारांसाठी एक व्यावहारिक मार्गदर्शिका आहे आणि तशी लिहिली गेली आहे. यात लांब स्वल्पविराम नसलेले परिच्छेद नाही आणि शक्य तितक्या बुलेट केलेल्या याद्या आहेत.

## ही मार्गदर्शिका तुम्ही **कधी** वापरू शकता?

तुम्ही निषेध मोर्च्यात असू शकता आणि एखाद्या क्वीअर व्यक्तीचे फोटो काढण्याच्या नैतिकतेबद्दल प्रश्न असू शकतो. तुम्ही आरोग्यसेवेबद्दल एक लेख लिहित असाल आणि संवेदनशील प्रश्न कसे विचारायचे याचा विचार करत असाल. तुम्ही गुन्ह्याची कथा संपादित करत असाल जिथे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती गुन्हेगार आहे आणि तुम्हाला रिपोर्ट संवेदनशील बनवायचा आहे, उगाच खळबळजनक नाही. तुम्हाला फ्रीलांसरकडून लेखासाठी कल्पना सादर करण्यात आली आहे, आपण ते स्वीकारावे की नाही हे माहित नाही.

थोडक्यात तुमचे काम आणि त्यातील कोंडी लक्षात घेऊन ही मार्गदर्शिका बनवली आहे. तुम्ही ती कधीही वापरू शकता. तुम्हाला एलजीबीटीक्युआयए+ समस्या कव्हर करण्याबद्दल प्रश्न आहे आणि कोणाला विचारायचे हे माहित नाही.

## ही पुस्तिका तयार करणारे **किती** पात्र आहेत?

**क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स** (QCC) हे एक स्वतंत्र प्रकाशन गृह आणि साहित्यिक मंच आहे. क्युसीसी (QCC) ची सुरुवात एलजीबीटीक्युआयए+ लेखक, अनुवादक आणि लेखकांना प्रकाशात आणण्याच्या उद्देशाने करण्यात आली होती आणि आधी पासून असणाऱ्या साहित्यिक जागा आणि मीडिया रिपोर्टिंग क्वीअर समुदायाला समावेश करून घेण्यासाठी करण्यासाठी. क्युसीसी (QCC) भारतातील पहिल्या क्वीअर लिटफेस्टचा (साहित्यसंमेलन) आयोजक आहे जो क्वीअर आणि समर्थक साहित्यिक यांना एकत्र आणण्यासाठी होता. क्युसीसी (QCC) विविध मीडिया हाऊसेस आणि कॉर्पोरेशन सोबत रिपोर्टिंगवर सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी, कामाच्या जागी विविध लोकांचा समावेश वाढवण्यासाठी धोरणे आणि त्यांची अंमलबजावणी प्रक्रिया यात सुद्धा सहकार्य करते.

गेल्या नऊ वर्षांपासून देशातील एलजीबीटीक्युआयए+ समस्यांवर संवेदनशीलपणे रिपोर्टिंग करण्यात **द न्यूज मिनिट** (TNM) आघाडीवर आहे. संस्थेच्या संपादकीयमध्ये एक क्वीअर व्यक्ती वरच्या हुद्दया वर आहे आणि एलजीबीटीक्युआयए+ जीवन आणि अधिकार बाबत काळजीपूर्वक रेपोर्टिंग च्या आणि संपादनाच्या पद्धती तयार केल्या आहेत. द न्यूज मिनिट मधील संपादकीय टीम ही देशात सगळ्यात विविधता असलेली टीम आहे आणि समाजाने लक्ष न दिलेल्या आवाजांना जागा देणे हे संपादकीय धोरणांपैकी एक महत्वाचे धोरण आहे.

गूगल न्यूज इनिशिएटिव्ह (GNI) शाश्वत, वैविध्यपूर्ण आणि नाविन्यपूर्ण बातम्या बनवण्या साठी योग्य जागा बनवण्यासाठी प्रकाशक आणि पत्रकारांच्या बरोबरीने काम करते. गूगल न्यूज इनिशिएटिव्ह मध्ये, आम्ही उद्योगातील नेत्यांसोबत भागीदारी करतो कारण पत्रकारितेला भेडसावणाऱ्या अत्यंत महत्त्वाच्या समस्यांना ते हाताळतात, वैविध्यपूर्ण, नाविन्यपूर्ण आणि सर्वसमावेशक समुदाय बनवतो, ज्याचे समान ध्येय बातम्यांसाठी एक मजबूत भविष्य तयार करणे आहे.

ही मार्गदर्शिका लिहिण्यात योगदान देणारे बहुतांश लोक क्वीअर आहेत आणि बरेच लोक पत्रकार देखील आहेत. आम्हाला भारतातील एलजीबीटीक्युआयए+ समुदायांच्या चिंता समजतात आणि न्यूजरूमचे कार्य कसे असते आणि पत्रकारांना दररोज कोणत्या आव्हानांचा सामना करावा लागतो हे आम्हाला माहीत आहे.

जर काही प्रश्न असतील तर **कुठे** संपर्क करायचा?

ईमेल: news.inq@gmail.com

इंस्टाग्राम: @news.inq

## बातमीला क्वीअर करणे
## द न्यूज मिनिट कडून एक टीप

अशा काळात जेव्हा भारतीय इंग्रजी बातम्यांचे उद्योगक्षेत्र अत्यंत केंद्रीकृत होते बहुतांश न्यूजरूम एकतर दिल्ली किंवा मुंबई येथे कार्यरत आहेत. द न्यूज मिनिट (TNM) ची सुरुवात दक्षिण भारत कव्हर करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून दक्षिण भारतातूनच करण्यात आली. TNM च्या संस्थापकांना दक्षिण भारतातील पाच राज्यांतील लोकांशी जोडणाऱ्या आवाजाची गरज वाटली जी राज्ये, आंध्र प्रदेश, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि तेलंगणा अशी आहेत. गेल्या नऊ वर्षांत, TNM स्त्रीवादी बातमीसंस्था म्हणून विकसित झाली आहे जी लिंग, लैंगिकता आणि जात यावर संवेदनशील पत्रकारितेचे नेतृत्व करते.

आम्ही ते करू शकलो कारण आमची सर्वसमावेशक न्यूजरूम - अशी न्यूजरूम जिथे सर्व गटातील वैविध्यपूर्ण आवाज आणि सत्तेशी सत्य बोलण्याची संस्कृती आहे. द न्यूज मिनिट्सचे नेतृत्व दलित, मुस्लिम, ख्रिश्चन आणि आमच्या सोबत काम करणाऱ्या क्वीअर नेते जे संस्थापकांसोबत मुक्त पत्रकारितेद्वारे स्टेटस-को ला मोडण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करतात.

२०१४ मध्ये सुरुवात झाल्यापासून, द न्यूज मिनिट एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या समस्यांचे संवेदनशील कव्हरेज करत आहे. सुरुवात झाल्यानंतर काही वर्षातच २०१६ मध्ये, आम्ही लेट्स टॉक एलजीबीटीक्युआयए+ नावाची मालिका चालवली, ज्यामध्ये क्वीअर भारतीयांचे आवाज आणि गोष्टी होत्या. ह्या मालिकेला लिंगभाव संवेदनशीलतेसाठीचा लाडली पुरस्कार मिळाला. २०१७ च्या सुरुवातीस, आमच्याकडे एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या समस्यांची बातमी कशा पद्धतीने तयार करावी यासाठी एक तयार मार्गदर्शिका होती जेणेकरून न्यूजरूममध्ये प्रवेश करणाऱ्या प्रत्येक नवीन व्यक्तीला आमची मूल्ये समजतील आणि योग्य भाषा आणि दृष्टीकोनांसह सुसज्ज असतील.

या मार्गदर्शिकेची कल्पना प्रथम २०२१ मध्ये आली जेव्हा क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स (QCC) ने त्यांचा चेन्नई क्वीअर लिटफेस्ट आयोजित केले होते. कोरोना साथीच्या रोगामुळे फेस्टची ही आवृत्ती ऑनलाइन होती आणि TNM च्या रागमालिका कार्तिकेयन या एका पॅनेलवर होत्या. मीडियाद्वारे क्वीअर समस्यांवरील बातम्या कशा प्रकारे तयार केल्या जातात हा या पॅनल चा विषय होता. या पॅनेल चर्चेच्या दरम्यान, त्यांनी TNM च्या टीमसाठी एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या समस्या कशा प्रकारे कव्हर करायला हव्यात याबद्दलच्या मार्गदर्शक तत्त्वांबद्दल सांगितले. सर्वसाधारणपणे न्यूजरूममध्ये क्वीअर समुदायास कव्हर करण्यासाठी मार्गदर्शिका आहेत का हा प्रश्न समोर आला आणि जेवढे आम्हाला माहित होते त्याप्रमाणे अशी तपशीलवार माहिती सांगणारे असे कोणतेही संसाधन नव्हते.

QCC आणि TNM ने एकत्र येवून असे तपशीलवार संसाधन तयार करणे ही पुढची पायरी समजली . आम्ही मीडिया संदर्भ मार्गदर्शकाच्या रूपरेषेसह सुरुवात केली, आणि सुरुवातीपासून आम्हाला ते इंग्रजी आणि तमिळ भाषांमध्ये करायचे होते. आम्ही ठरवले की पहिली पायरी म्हणजे शब्दकोष एकत्र करणे आणि या मार्गदर्शिकेमध्ये येऊ शकणाऱ्या प्रकरणांचा नकाशा तयार करणे.

मद्रास उच्च न्यायालयात एका लेस्बियन जोडप्याला त्यांच्या कुटुंबीयांपासून हवे असलेल्या संरक्षण खटल्याची सुनावणी सुरु असतानाच ही मार्गदर्शिका तयार होत होती. न्यायालय एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या मदतीसाठी अनेक प्रगतीशील आदेश देत होते जसे की, तामिळनाडू राज्य सरकारला न्यायालयाने माध्यमे वापरू शकतील अशा तमिळमधील प्रतिष्ठित संज्ञांची यादी तयार करण्यासाठी आदेश दिले . आम्ही त्याआधीच अशा शब्दकोशावर काम सुरु केले होते. आम्ही त्या प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय घेतला, इतर व्यक्ती आणि संस्थांसोबत एकत्र येवून संबंधित शब्दकोश तयार करून न्यायालयासमोर सुपूर्द केला. पुढील घटना थोडक्यात सांगायची झाली तर, तामिळनाडू सरकारने राजपत्राद्वारे एक शब्दकोष प्रकाशित केला, आणि त्यातील ९०% गोष्टी ह्या आम्ही - समुदायाने - तयार केलेल्या आहेत.

या वाटचालीत, आम्हाला गुगल न्यूज इनिशिएटिव्हसह आणखी साथीदार लाभले ज्यामुळे आम्हला हे स्वप्न मोठ्या स्तरावर बघता आले. इंग्रजी आणि तमिळमध्ये असलेली मीडिया संदर्भ मार्गदर्शिका आता कन्नड, तेलुगू, मराठी आणि हिंदीमध्येही तयार झाली. देशभरात तीन भाषांमध्ये प्रशिक्षण सत्रे. क्वीअर जीवनाबद्दल चांगल्या पत्रकारितेसाठी फेलोशिप. स्वप्नातील मीडिया इकोसिस्टमच्या निर्मितीस मिळालेली चालना. आम्ही सध्या हे सर्व उपक्रम राबवत आहोत.

जेव्हा आम्ही पत्रकार आणि न्यूजरूममधून क्वीअर व्यक्तींच्या आयुष्याबद्दल असणारी चुकीची माहिती निदर्शनास आणतो तेव्हा "आम्हाला माहित नव्हते." आम्हाला योग्य भाषा काय असते हे माहित नव्हते, अशा बातम्या अधिक संवेदनशीलपणे कशा सांगाव्यात हे आम्हाला कळत नव्हते. आम्ही जाणूनबुजून या चुका केल्या नाहीत - आणि आम्हाला शिकायचे आहे. असा प्रतिसाद पत्रकार आणि न्यूजरूममधून मिळत असतो.

बरं, ही एक संदर्भ मार्गदर्शिका आहे ज्याचा तुम्ही संदर्भ घेऊ शकता, अशी मार्गदर्शिका जी तुम्हाला नवीन गोष्टी शिकण्यास आणि आधी ऐकलेल्या गोष्टी नव्याने शिकण्यास मदत करेल. या मार्गदर्शिकेचा उद्देश, पत्रकारांना आणि न्यूजरूमना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि समुदायांसाठी योग्य भाषा वापरण्यासाठी शिक्षित करणे हा आहे. यामध्ये पत्रकारांच्या प्रश्नांना संबोधित करणारी वेगवेगळी प्रकरणे आहेत. सामान्य बातम्यांचे वृत्तांकन आणि संपादनापासून ते मतप्रदर्शन करणारे लेख क्रीडाक्षेत्र, गुन्हेगारी, मनोरंजन, व्यापार, राजकारण, शिक्षण याबद्दल लिहिण्यापर्यंत.... या मार्गदर्शिकेमधे जवळपास २० प्रकरणे आहेत - आणि बिंदू याद्या ज्याचा संदर्भ एखाद्या गोष्टीवर काम करताना पत्रकार त्वरीत आणि सहजपणे घेऊ शकतो.

वाचा तर मग !

## भाषेला क्वीअर करणे:
## चेन्नई क्रॉनिकल्स कडून एक टीप

क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स (QCC) हे एक स्वतंत्र प्रकाशन गृह आणि साहित्यिक मंच आहे. QCC ची सुरुवात २०१७ मध्ये एलजीबीटीक्युआयए+ लेखक आणि अनुवादकांना पुढे आणि विद्यमान साहित्यिक जागा आणि मीडिया प्लॅटफॉर्म क्वीअर समावेशक बनवण्यासाठीच्या उद्देशाने सुरु करण्यात आले होते. गेल्या काळात, QCC ची वाढ ही आमची दृष्टी आणि ध्येय पुढे नेणाऱ्या उपक्रमांद्वारे झालेली आहे. आम्ही एक स्वतंत्र प्रकाशन गृह म्हणून सुरुवात केली आणि २०१८ मध्ये भारतातील पहिले क्वीअर साहित्य संमेलन संभाषण सुरु ठेवण्यासाठी आयोजित केले.

QCC चे संस्थापक सदस्य सार्वजनिक जीवनात सक्रिय राहिलेल्या दशकांमध्ये त्यांच्या अनुभवानुसार अनेक क्वीअर व्यक्ती माध्यमांकडे त्यांची मते, हक्कांची मागणी आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे या उद्देशाने माध्यमांशी संवाद साधत असतात. तथापि, अनेक एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना माध्यमांची कार्यपद्धती माहित नसते. अशी असंख्य उदाहरणे आहेत जेथे माध्यमांशी बोलणाऱ्या क्वीअर व्यक्तींचे म्हणणे चुकीच्या पद्धतीने मांडले जाते, जेथे पूर्वनिर्धारित संपादकीय कथांसाठी आमचे अनुभव चुकीच्या पद्धतीने जुळविले जातात. आमच्यापैकी काहींनी माध्यमांशी संवाद साधणे सोडून दिले आहे कारण या श्रमामुळे अधिक मानसिक आघात होतात, व पत्रकार आणि न्यूजरूम आमच्या प्रयत्नांनंतरही त्याच चुका करत असतात.

माध्यमांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ समुदाय आणि ओळखींबद्दल मोठ्या प्रमाणावर अज्ञान आहे आणि अनेक सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे पूर्वग्रह आहेत. आपण आता एका टप्प्यावर आहोत जिथे फक्त आपल्याबद्दलच्या रूढीवादी गोष्टीच बातम्या म्हणून वापरल्या जातात - आणि बहुतेक क्वीअर व्यक्ती तुम्हाला सांगतील की, या रूढीवादी गोष्टी देखील अगदी चुकीच्या आहेत. आपल्या समाजातील विविधता पुसली जाते. जेव्हा पत्रकार आम्हाला कथांसाठी संपर्क करतात, तेव्हा आमच्या मनात नेहमीच एक शंका असते की त्यांनी त्यांना जे हवे आहे ते आधीच लिहिले आहे आणि त्यांचे लेख अधिक चांगले बनवण्यासाठी फक्त आमच्या काही गोष्टी त्यांना त्यामध्ये बसवायच्या आहेत. आम्ही त्यांच्या कथेतील 'पात्र' आहोत ज्याची कथा आधीच लिहिली गेली आहे.

गेल्या काही वर्षांत माध्यमे क्वीअर व्यक्तींच्या आयुष्याबद्दल ज्याप्रकारे लिहित आहेत त्यात लक्षणीय बदल झाले आहेत ही सुद्धा वस्तुस्थिती आहे. गोष्टी नेहमीच खूप चांगल्या होऊ शकतात. विशेषत: जेव्हा पत्रकार आणि न्यूजरूम संवेदनशीलता व त्यांच्या माध्यमांची वाचकसंख्या आणि दर्शकसंख्येच्या व्यावसायिक गरजा यामध्ये संतुलन साधले जाईल.

QCC चे नेतृत्व विविध सामाजिक-आर्थिक वर्गातील क्वीअर व्यक्तींनी केले आहे - आम्ही साहित्य, कला, जाहिरात, तंत्रज्ञान आणि विकास या क्षेत्रातील आहोत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, प्रत्येक QCC सदस्याचा एक दशकाहून अधिक तळागाळातील क्वीअर समुदायांसोबत काम करण्याचा अनुभव आहे.

जेव्हा आम्ही २०१८ मध्ये पहिल्या क्वीअर साहित्य संमेलनाची आखणी केली तेव्हा आम्ही क्वीअर समुदायाच्या समस्यांच्या मीडिया रिपोर्टिंगवरील एका पॅनेल चर्चेचे आयोजन करण्याचे ठरले. बातम्या व माध्यमांभोवतीचे संभाषण व्हावे हा आमचा उद्देश होता कारण क्वीअर आयुष्य समाजात परिभाषित आणि कथन करण्यात माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. गेल्या काही वर्षांपासून, आमचे लक्ष्य एनजीओ अहवाल, सनसनाटी बातम्या लेख आणि आमच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल चुकीची माहिती या पलीकडे जावून क्वीअर आयुष्याच्या कथांवर प्रकाश टाकणे हे आहे. २०२१ च्या चेन्नई क्वीअर साहित्य संमेलनामध्ये बातम्यांवर चर्चा करण्यासाठी पॅनेल चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. या पॅनेलमुळे अखेरीस समावेशक न्यूजरूम एलजीबीटीक्युआयए+ मीडिया संदर्भ मार्गदर्शिकेच्या स्वरूपात आम्हाला माध्यमांसंबंधी आमचे काम औपचारिकपणे सुरु करता आले. त्यावेळी आम्ही तयार केलेल्या तमिळ क्वीअर शब्दकोषाचा paalputhumai.com या आमच्या द्विभाषिक वेबझिनवर विस्तार करण्याची संधी सुद्धा मिळाली.

द न्यूज मिनिट (TNM) आणि इतर समूहांसह तयार केलेली QCC शब्दावलीचा मद्रास उच्च न्यायालयाने एस सुषमा विरुद्ध कमिशनर ऑफ पोलीस या केसमध्ये मध्ये उल्लेख केला होता. (सुषमा-सीमा प्रकरण) हायकोर्टाने तामिळनाडू राज्य सरकारला आम्ही तयार केलेल्या शब्दकोशाच्या आधारावर एलजीबीटीक्युआयए+ संज्ञांची सरकारी मान्यताप्राप्त यादी तमिळ मीडियासाठी तयार करण्याचा आदेश दिला. राज्य सरकारने याचा पाठपुरावा केला आणि २०२२ मध्ये तो शब्दकोश राज्य परीपत्राद्वारे प्रकाशित केला. त्यातील जवळपास ९०% संज्ञा ह्या QCC-TNM समुदायाने तयार केलेल्या शब्दकोषामधून घेतल्या गेल्या आहेत.

यामुळे आम्हाला एलजीबीटीक्युआयए+ मीडिया संदर्भ मार्गदर्शिकेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी आणखी प्रेरणा मिळाली. हा क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स आणि द न्यूज मिनिट यांचा स्वयंसेवी उपक्रम होता. हा उपक्रम क्वीअर व्यक्तींच्या नेतृत्वाखाली, जे QCC च्या तळागाळातील कामाचा अनुभव आणि TNM चा माध्यम क्षेत्रातील अनुभव एकत्र आणून भारतातील संपूर्ण माध्यम क्षेत्राला मदत ठरणाऱ्या संसाधनाची निर्मिती करतात.

समावेशक न्यूजरूम एलजीबीटीक्युआयए+ मीडिया संदर्भ मार्गदर्शिका सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. हे आमच्यासाठी, सर्वसमावेशक जग निर्माण करण्याच्या आमच्या प्रवासातील पुढील मैलाचा दगड आहे. या मार्गदर्शिकेद्वारे, आम्ही माध्यम क्षेत्रात एकावेळी एक न्यूजरूम या उद्दिष्टाद्वारे बदल घडवून आणण्याची आशा करतो.

क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स चेन्नईमध्ये तामिळनाडू आणि पुद्दुचेरीमधील लोकांसह सुरू करण्यात आले होते. जेव्हा आम्ही सुरुवात केली तेव्हा आमचे लक्ष तामिळ आणि इंग्रजी साहित्य आणि माध्यमांवर होते. कालांतराने, आमचे तमिळ भाषेतील काम भारतातील आणि देशाच्या सीमा पार करून भारताबाहेरील तमिळ भाषिक क्वीअर व्यक्तींपर्यंत पोहोचले आहे. या माध्यम संदर्भ मार्गदर्शिकेसह, आम्ही आमची पोहोच इतर चार भारतीय भाषांपर्यंत वाढवत आहोत- कन्नड, तेलुगु, मराठी आणि हिंदी.

आणि हा प्रवास लवकरच आणखी भाषांमध्ये सुरू राहील.

# प्रस्तावना

शब्द महत्वाचे आहेतच पण ते शब्द कोण बोलत आहे हे जास्त महत्वाचं आहे.

आम्हाला शाळेत एक बालगीत शिकवले होते - 'काठ्या आणि दगडधोंडे माझी हाडे मोडू शकतील, परंतु शब्द मला कधीही दुखावणार नाही.' आता त्याबद्दल विचार केला तर समजते की हे चुकीचे आहे. ही म्हण, कदाचित एका सिसजेंडर, उच्च-वर्गीय गोऱ्या माणसाने लिहिली असावी. शब्दांचा ऐकणाऱ्या व्यक्तीच्या मानसिकतेवर किती परिणाम होऊ शकतो याला यामध्ये कमी लेखलं आहे. उदाहरणार्थ, शाळेतील छळवणूकीच्या काही प्रकरणांमध्ये शारीरिक हिंसाचार पर्यंत पोहोचण्याआधी अनेकदा टोमणे आणि अपशब्दांनी सुरुवात होते.

ही छळवणूक, जरी त्याचे स्वरूप बदलत असले तरी अनेकदा खेळाच्या मैदानापासून वास्तविक जगापर्यंत पसरते. कितीही योग्य हेतू असलेले संपादक आणि पत्रकारही अनेकदा असंवेदनशील भाषा वापरू शकतात आणि क्वीअर व्यक्तीचा अपमान करू शकतात. हे समोरच्याला मुद्दाम दुखवायचं आहे या भावनेतून होत  नसले तरी कदाचित लैंगिक आणि/किंवा लिंग अल्पसंख्याकांमधील एखाद्या व्यक्तीच्या जगण्याच्या अनुभवाची जाणीव नसण्याने होऊ शकत असेल. जी भाषा एखाद्याला ऐकायला 'सामान्य' किंवा यात काहीही गैर नाही असं असेल, जी भाषा विविध स्वरूपाच्या भेदभावाशी अनभिज्ञ आहे ती भाषा या चर्चेत येऊन आधीपासून सुरक्षित नसणाऱ्या समूहाचे आणि विशेष करून लहान मुलांना हानी पोहोचवू शकते.

त्यामुळे प्रकाशित होत असलेल्या अशा प्रकारच्या मार्गदर्शिकेची खूप गरज आहे. जे प्रामाणिकपणे सुरक्षित रिपोर्टिंग करू पाहत आहेत आणि अशी भाषा वापरू पाहत आहेत ज्याने कोणाला हानी पोहोचणार नाही त्यांना ही मार्गदर्शिका मदतीची ठरेल.

स्तंभलेखना बाबतीत, लेख कोण लिहित आहे आणि त्यांचे ज्ञान आणि संवेदनशीलतेची क्षमता किती आहे याची जाणीव असणे आवश्यक आहे. आपण अशा काळात जगतो जिथे दूरदर्शन ज्या दराने बातमी सांगणाऱ्यांची मते पुढे मांडतो त्यासाठी ही चिंतेची गोष्ट आहे. रेटिंग साठी जी एकदम टोकाची मते मांडली जातात त्यामध्ये त्या ज्ञानाच्या शाखेतून येणारे तज्ञाचे ज्ञान बाजूला केले जाते. स्तंभलेख जे विषयाचे नेमके ज्ञान आणि विचार मांडणारे हवेत ते टिव्हीवर प्रसारित होणाऱ्या वादविवादांची प्रत बनू नये. ही मार्गदर्शीका तसे होऊ नये याची खात्री घेईल. केवळ एका दृष्टिकोनाचा प्रचार करणे हा हेतू नसावा, जे काही मत मांडले जात आहे ते न्याय्य रीतीने मांडले जाईल याची खात्री घ्यायला हवी.

शेवटी, ही मार्गदर्शिका केवळ भाषेबद्दल नसून ती वृत्तीबद्दलही आहे. ती तितकीच वृत्तीबद्दलही आहे. एकामेकांसाठी आदर आणि सन्मान जे आपलं संविधान मागणी करतं आणि जो समाजाचा हक्क आहे. मला आशा आहे की या मार्गदर्शिकेचा वापर करणे केवळ जबाबदार पत्रकारिता दाखवत नाही तर वक्ते, लेखक किंवा संपादक हे सगळे समानता या एका आपल्याला बांधून ठेवणाऱ्या धाग्यावर विश्वास ठेवतात

**सौरभ किरपाल**

अधिवक्ता, सर्वोच्च न्यायालय, भारत

# सर्वसामावेशक विचाराने गृहीतकं बदलतात

**मनीष गायकवाड**

एकदा, स्वतःची उभयलिंगी म्हणून ओळख सांगणारा एक सिस-जेंडर पुरुष पत्रकार मला अनौपचारीकपणे कॉफीसाठी भेटला आणि आम्ही गप्पा मारत असताना बॉलीवूडच्या सेलीब्रीटीचे सर्वनाम मी विनोदाने बदलल्याबद्दल तो माझ्यावर ओरडला.

तू त्याचे सर्वनाम असे कसे बदलू शकतो? असा प्रश्न त्याने मला केला.

पण ती इथे नाहीये, मला वाटलं आपण गप्पा मारत आहोत, मी म्हणालो.

त्या पत्रकाराने डोळे फिरवले.

मला असे वाटले की मी काहीतरी असंवेदनशील आणि भयानक गोष्ट केली आहे. उरलेली संध्याकाळ मी जे बोलायचे आहे ते खूप विचार करून बोलत होतो. मी माझे तोंड बंद ठेवले.

नंतर, त्या पत्रकाराने लेखकांवर आणि त्यांच्या आगामी कामांमध्ये ते लिहित असलेल्या क्वीअर थीमवर / विषयांवर एक लेख लिहिला. तो तेव्हा माझ्यासोबतही बोलला. त्याने माझ्या पहिल्या पुस्तकाचे वर्णन क्वीअर कादंबरी असे केले. मी ते शब्द पुन्हा पुन्हा वाचले आणि माझ्या कामाकडे क्वीअर कादंबरी म्हणून पाहिले जावे ही कल्पना पचवण्याचा प्रयत्न केला. मला वाटत होते की क्वीअर कादंबरी असे नाव माझ्या लिखाणाची पोहोच मर्यादित करेल. त्या पत्रकाराने ती कादंबरी वाचली देखील नव्हती. आपण याला क्वीअर थीम असलेली कादंबरी म्हणू, क्वीअर कादंबरी नाही. पत्रकाराच्या बाजूने न्याय्य विचार केला तर त्याच्या लेखाचे शीर्षक क्वीअर थीम होते. मला वाटले मी फक्त दोष दाखवत आहे. मला वाटले होते की, एक क्वीअर कादंबरी पुस्तकांच्या दुकानाच्या क्वीअर नावाच्या विभागात ठेवली जाईल आणि तिच्यापर्यंत कोणी जाणार नाही.


क्वीअर गोष्ट शोधण्यासाठी मी पुस्तकांच्या दुकानाच्या नॉन-क्वीअर विभागातील किती पुस्तके उचलली आहेत आणि रोमांचित झालो आहे? मी विशेषतः माझ्या पुस्तकाच्या माहितीमधून गे आणि क्वीअर हे शब्द काढून टाकले होते आणि माझ्या प्रकाशकाला क्वीअर/गे म्हणून त्याचा प्रचार करू नका असे सांगितले. मला माझी ओळख फक्त समलिंगी पुरुष लेखक म्हणून करायची नव्हती. अशी ओळख जी मला नेहमी गोंधळात टाकते. समलिंगी डॉक्टर किंवा समलैंगिक वकील असे काही असते का? मग माझी लैंगिकता माझ्या व्यवसायाच्या ओळखीला का जोडली जाते? मी समलिंगी लेखकाला कधीही भेटलो नाही. मी नेहमीच एका लेखकाला भेटलो जे समलैंगिक आहेत आणि त्यांच्या लैंगिकतेचा त्यांच्या लिखाणावर काही परिणाम असू शकतो किंवा नसू शकतो.

माझ्यासाठी, माझी ओळख माझ्या कामाची माहिती देत नाही आणि माझ्या कामामुळे माझ्या ओळखीला संकुचितपणा येता कामा नये. नक्कीच, असे बरेच लोक आहेत जे आपली ओळख सर्वात आधी अभिमानाने सांगतात. ज्या लेखकांना क्वीअर लेखक अशी त्यांची ओळख व्हावी असे वाटत असेल, त्यांच्या लिखाणाला क्वीअर लिखाण अशी ओळख मिळावी असे वाटत असेल, त्यांच्या मी विरोधात नाही. कदाचित मला निर्भय वाचकाचा लोभ आहे, जसा मी होतो.

मी अलीकडेच एका मित्राला जो स्वतःची ओळख सिस पुरुष अशी सांगतो त्याला टिम कुकच्या (लैंगिकतेच्या) ओळखीबद्दल सांगितले. माझा मित्र, जो एक निष्ठावान ॲपल कंपनीचा ग्राहक, अशी माहिती जी एक दशकापेक्षा अधिक काळ सार्वजनिक आहे त्याबद्दल त्याला माहिती नव्हती व त्यावर तो विश्वास ठेवू शकत नव्हता. परंतु, तो ॲपल कंपनीचा एकनिष्ठ ग्राहक आहे.

इथे मुद्दा ओळखीचा नसून सर्वसमावेशकतेचा आहे. तुम्ही माझ्या आणि माझ्या कामाबद्दल जे काही लिहिणार असाल तर त्याबद्दल मला विचारा; मला त्या प्रक्रियेत समाविष्ट करा, हा या मार्गदर्शिकेमागचा प्राथमिक उद्देश आहे. सर्वसमावेशकता तुमच्या गृहितकांना आपोआप दुरुस्त करते आणि तुमचे रिपोर्ट चांगल्या पद्धतीने तयार करते आणि कदाचित उद्धरण देण्याससुद्धा पात्र ठरू शकते. कृपया तुमचे शब्द जपून वापरा. त्यांचा अर्थ आमच्यासाठी जगासारखा आहे.

*मनीष गायकवाड लेखक आहेत*



# एलजीबीटीक्युआयए+ शब्दावली

## लिंग संबंधित व्याख्या

### १. लिंग (Sex)

व्यक्तीच्या शरीराच्या आतील (संप्रेरक-हार्मोन्स, गुणसूत्र-क्रोमोसोम आणि पुनरुत्पादनक्षम गुण- रिप्रोडक्टिव कॅरक्टरिस्टिक) व बाहेरील जननेंद्रिय-जेनिटल (उदाहरणार्थ शिस्न- पेनिस, योनी-वजायना स्तन- ब्रेस्ट आणि ह्या सगळयांच्या मिश्रित वेगवेगळ्या रचना) घटकांचा आधार घेऊन ती व्यक्ती 'स्त्री', 'पुरुष' की 'द्विलिंगी' असं जे वर्गीकरण केलं जातं, त्या वर्गीकरणाला लिंग असं म्हणतात.

### २. लैंगिक गुण वैशिष्ट्ये (Sex characteristics)

ज्या शारीरिक गुण वैशिष्ट्यांवरून व्यक्तीचे लिंग ठरवले जाते, त्यांना लैंगिक गुण वैशिष्ट्ये म्हणतात. यात व्यक्तींचे जननेंद्रिय (योनी, शिस्न, अंडकोश इत्यादी),लैंगिक गुणसूत्र (XX, XY, XXY, XYY, XO) लैंगिक संप्रेरक (इस्ट्रोजेन, प्रोजेस्टेरॉन, टेस्टोस्टेरॉन), वयात येत असताना विकसित होऊ शकणारे शारीरिक बदल (स्तन, शरीरावरील केस, आवाज इत्यादी) यासारखे घटक येतात. मुळात लिंग ठरवण्याची प्रक्रिया वैद्यकीय-म्हणून कृत्रिम असल्यामुळे या कथित लैंगिक गुणवैशिष्ट्यांचा व्यक्तीच्या लिंगभाव ओळखीवर किंवा लिंगभाव अभिव्यक्तीवर प्रभाव पडेलच असे नाही. उदा. शिस्न आणि छाती असलेली व्यक्ती स्वतःला 'पुरुष', किंवा योनी असलेली व्यक्ती स्वतःला 'स्त्री' किंवा दोन्ही लिंगांचे वैशिष्ट्ये असलेली व्यक्ती स्वतःला 'स्त्री' किंवा 'पुरुष' मानेलच असे नाही

### ३. द्विलिंगी (Intersex)

गुणसूत्र, संप्रेरके किंवा इतर काही कारणांमुळे, जन्माला आलेल्या काही बाळांची जननेंद्रिय लिंग ठरवण्याच्या वर्चस्ववादी प्रक्रियेला अपेक्षित असल्याप्रमाणे 'पुर्णपणे' 'पुरुषाची' किंवा 'स्त्रीची' म्हणून विकसित झालेली नसतात त्यामुळे त्या बाळाला स्त्रीलिंगी म्हणायचं की पुरुषलिंगी म्हणायचं हे अवघड होते. हे बाळ मोठ झाल्यावर स्वत:ला 'पुरुष', 'स्त्री', 'पारलिंगी',

‘द्विलिंगी’ किंवा इतर काही समजू शकतं, थोडक्यात द्विलिंगी व्यक्तींची लिंगभाव ओळख, अभिव्यक्ती आणि लैंगिकता ‘स्त्री’, ‘पुरुष’ साच्यात बसणारी असेलच असे नाही.

## लिंगभावासंबंधित व्याख्या

### १. लिंगभाव (Gender)

जन्माच्या वेळी एखाद्या व्यक्तीच्या ठरवून दिलेल्या लैंगिक ओळखीला अनुसरून वागण्याचे, चालण्याचे, दिसण्याचे, पोषाखाचे, अगदी विचार करण्याचे सुद्धा काही साचेबद्ध नियम संस्कृतीच्या माध्यमाने समाज ठरवून देतो, त्याला लिंगभाव असे म्हणतात. तरीसुद्धा ही लिंगभावाची निवड सामाजिक धारणांमधून तयार झालेली व आत्मसात केलेली असू शकते. मात्र आपण निवडलेला लिंगभाव आपल्याला नेमून देलेल्या लिंगानुसार असेलच असे नाही. उदा. निरनिराळ्या संस्कृतींमध्ये शौर्य, शक्ती, सामर्थ्य, निर्भीडपणा, उदरनिर्वाह, नेतृत्व इत्यादी प्रतिकं पुरुषपणाशी जोडलेली असतात. तसेच संवेदनशीलता, सौंदर्य, कुटुंबाचे संगोपन, समर्पण इत्यादी प्रतीकं बाईपणाशी जोडलेली असतात. मात्र या सामाजिक अपेक्षा आणि हे नियम काळ, संस्कृती, ठिकाण, धर्म, वर्ण आणि जातींनुसार बदलू शकतात. ‘स्त्री’आणि ‘पुरुष’ या लिंगभाव साच्याला अनुरूप किंवा या साच्याला मोडून लिंगभाव ओळखी असू शकतात उदा. ‘स्त्री’, ‘पुरुष’, ‘पारलिंगी’, ‘हिजडा’ ‘स्त्री-पुरुष’ वर्गीकरण न मानणारे (नॉन-बायनरी), लिंगभाव न मानणारे (अजेंडर) इत्यादी.

### २. लिंगभाव ओळख (Gender identity)

समाज जेव्हा एखाद्या व्यक्तीचे लिंग ठरवतो तेव्हा ‘स्त्री’ आणि ‘पुरुष’ असण्याची व्याख्याही तयार करतो. उदा. एखाद्या व्यक्तीला जन्माच्या वेळी ‘पुरुष’/’स्त्री’ असे लिंग नेमून दिले असेल तर त्याने ‘पुरुषा’/’स्त्री’ सारखे वागावे अशी अपेक्षा असते.

काही व्यक्ती समाजाच्या अपेक्षेप्रमाणे स्वतःची लिंगभाव ओळख स्वीकारतात किंवा आत्मसात करतात तर काही व्यक्ती स्वतःच्या अनुभवाचा आधार घेऊन ह्या चाकोरी बाहेर जाऊन स्वतःची वेगळी लिंगभाव ओळख निवडतात.

शेवटी ही निवड सुद्धा सामाजिक धारणांवरून प्रभावित असली तरीही प्रत्येक व्यक्तीला स्वतःची लिंगभाव ओळख निवडण्याचे स्वातंत्र्य आणि अधिकार आहे.

### ३. लिंगभाव अभिव्यक्ती (Gender Expression)

एखाद्या व्यक्तीने आपली लिंगभाव ओळख कशी व्यक्त किंवा प्रकट करायची ते ठरवणं म्हणजे लिंगभाव अभिव्यक्ती. उदा. कपड्यांची निवड, शारीरिक हावभाव, बोलण्याची पद्धत, वावर, चाल, आवाज, मेकअप इत्यादींच्या मदतीने किंवा त्यांची मदत न घेताही लिंगभाव ओळख व्यक्त केली जाऊ शकते. मात्र लिंगभाव अभिव्यक्तीचा संबंध आपल्या लिंगभाव ओळखीशी असेलच असे नाही.

प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे नाव आणि सर्वनाम (म्हणजे व्यक्तीला ‘तो, ‘ती’, ‘ते’ आणि संस्कृतीनुसार इतर काहीही म्हणून संबोधायचे की नाही) ठरवण्याचा अधिकार आहे.

### ४. लिंगभाव नियम न मानणारी व्यक्ती (Gender non-conforming person)

'स्त्री', 'पुरुष', 'पारलिंगी' इत्यादी कोणत्याही लिंगभाव ओळखींच्या सांस्कृतिक साच्यांना न मानणारी आणि स्वतःची लिंगभाव अभिव्यक्ती कोणत्याही लिंगभाव नियमाशी जुळवून न घेणारी व्यक्ती

### ५. पारलिंगी (Transgender)

जन्माच्या वेळी नेमून दिलेले लिंग आणि लिंगभावाच्या विपरीत स्वतःचे लिंग आणि लिंगभाव सांगणारी व्यक्ती. सामाजिक व्याख्येतील 'स्त्री'/ 'पुरुष'/ 'द्विलिंगी' व्यक्ती समाजाने दिलेल्या लिंगभावाला नाकारत स्वतःला हवी असलेली लिंगभाव ओळख ठरवतात, हा त्यांचा अधिकार असला तरीही ही निवडलेली ओळख समाजप्रभावित असू शकते.

### ६. पारलिंगी स्त्री (Transwoman)

'पारलिंगी' व्यक्ती ह्या वर्गातील 'पारलिंगी' 'स्त्री' म्हणजे जन्माच्या वेळी 'पुरुष'/'द्विलिंगी' ठरवली गेलेली पण स्वतःची लिंगभाव ओळख 'स्त्री' म्हणून करणाऱ्या व्यक्तीला 'पारलिंगी स्त्री' म्हणतात.

### ७. पारलिंगी पुरुष (Transman)

'पारलिंगी' व्यक्ती ह्या वर्गातील 'पारलिंगीपुरुष' म्हणजे जन्माच्या वेळी स्त्री/ द्विलिंगी ठरवली गेलेली पण स्वतःची लिंगभाव ओळख 'पुरुष' म्हणून करणाऱ्या व्यक्तीला 'पारलिंगी पुरुष' म्हणतात.

### ८. नॉन बाईनरी व्यक्ती (Non-binary person)

'स्त्री', 'पुरुष' किंवा 'पारलिंगी'अशा कोणत्याही लिंगभाव ध्रुवीकरणाच्या साच्यात स्वतःला न बसवणारी व्यक्ती म्हणजे नॉन बाईनरी व्यक्ती.

### ९. लिंगभाव डीस्फोरीया (Gender Dysphoria)

जन्माच्या वेळी दिलेल्या लिंगाला अनुसरून समाजाला अपेक्षित असलेल्या लिंगभाव ओळखीशी स्वतःला हवी असलेली लिंगभाव ओळख जुळत नसल्याने, थोडक्यात समाजाच्या नियम आणि अपेक्षांमुळे होणारी मानसिक घुसमट, न्यूनगंड किंवा अस्वस्थता याला वैद्यकीय भाषेत आजार म्हणून जेंडर डीस्फोरीया असे म्हणतात. मात्र प्रत्येक पारलिंगी, नॉन बाईनरी किंवा लिंगभाव नियमांना न मानणारी व्यक्ती अशा अस्वस्थतेतून जाईलच असे नाही.

### १०. लिंगभाव विसंगती (Gender Incongruence)

जन्माच्या वेळी नेमून दिलेले लिंग आणि त्याला अनुसरून अपेक्षित असलेला लिंगभाव, ह्या समाजाच्या नियमांमुळे स्वतःमध्ये जाणवलेली व अनुभवलेली विसंगती

### ११. लिंगभाव निश्चिती प्रक्रिया (Gender Affirmation Process)

स्वतःची लिंगभाव ओळख ठरवण्यासाठी आणि प्रकट करण्यासाठी केली जाणारी प्रक्रिया. यामध्ये सामाजिक (आपल्या लिंगभाव ओळखीशी अपेक्षित असलेली सांस्कृतिक प्रतीकं वापरणं) वैद्यकीय, (शस्त्रक्रिया, संप्रेरकसंबंधित वैद्यकीय प्रक्रिया, लेझर प्रक्रिया) आणि कायदेशीर (कागदोपत्री नाव आणि लिंगभाव ओळख बदलणे) अशा प्रक्रिया येतात.

### १२. लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया (Gender Affirmation Surgery)

स्वतःची हवी असलेली लिंगभाव ओळख प्रकट करण्यासाठी समाजाने ठरवून दिलेली लैंगिक गुणवैशिष्ट्ये दाखवणाऱ्या लैंगिक अवयवांची शस्त्रक्रिया.

### १३. जुने नाव (Deadname)

आपल्याला हवी असलेली लिंगभाव ओळख व्यक्त करण्यासाठी आपले जुने नाव सोडून एक नवीन नाव निवडले जाऊ शकते. अशा वेळी सोडून दिलेल्या पूर्वाश्रमीच्या नावाला जुने नाव म्हणतात. आपले जुने नाव सांगायचे की नाही याचा पूर्ण अधिकार त्या व्यक्तीचा आहे.

### १४. लिंगभाव प्रवाही/ लिंगभाव प्रवाहिता (Gender Fluid/Fluidity)

कोणतीही लिंगभाव ओळख स्थिर नसते, म्हणून स्वतःची लिंगभावओळख ही सतत प्रक्रियेत असून ती प्रवाही आहे असे मानणारी व्यक्ती म्हणजे लिंगभाव प्रवाही. लिंगभाव प्रवाही व्यक्तीच्या अनेक अभिव्यक्ती असू शकतात. उदा. एकाच वेळी 'स्त्री'आणि 'पुरुष' अशा दोन्ही लिंगभाव ओळखीच्या अभिव्यक्ती वापरल्या जाऊ शकतात.

### १५. सिसजेन्डर (Cis Gender)

जन्माच्या वेळी दिलेल्या लिंगाशी, स्वतःची लिंगभाव ओळख जुळत असलेली/ जुळवून घेतलेली व पारलिंगी, नॉन बायनरी, लिंगभाव प्रवाही नसलेली व्यक्ती. समलिंगी व्यक्ती सुद्धा सिसजेन्डर असू शकतात.

## लैंगिकतेसंबंधी व्याख्या

### १. लैंगिकता (Sexuality)

लैंगिकता म्हणजे लैंगिक विचार, इच्छा, आवडी-निवडी, कल, स्वभाव, वृत्ती, ओळख, फॅन्टसी, इत्यादी. ची प्रकट किंवा अप्रकट अभिव्यक्ती.

## २. लैंगिक कल (Sexual Orientation)

एखाद्या लिंग किंवा लिंगभाव असलेल्या व्यक्तीसाठी जाणवलेले प्रेम किंवा शारीरिक, भावनिक आकर्षण याला लैंगिक कल म्हणतात. उदा. लिंग आणि लिंगभाव 'पुरुष' असे मानणाऱ्या व्यक्तीला एखाद्या 'स्त्री'बद्दल प्रेम किंवा आकर्षण वाटते त्याला विरुद्धलिंगी आणि जर त्याला पुरुषाबद्दल प्रेम किंवा आकर्षण वाटत असेल तर समलिंगी पुरुष असे म्हणतात.

लैंगिक कल आणि लिंगभाव या दोन वेगळ्या गोष्टी आहेत त्यांचा एकमेकांशी संबंध असेलच असे नाही. उदा. एका सिसजेंडर स्त्रीचा किंवा पुरुषाचा समलिंगी, विरुद्धलिंगी किंवा उभयलिंगी लैंगिक कल असू शकतो तसेच एका पारलिंगी स्त्रीचा किंवा पुरुषाचासुद्धा समलिंगी, विरुद्धलिंगी किंवा उभयलिंगी किंवा इतर अनेक प्रकारचे लैंगिक कल असू शकतात.

## ३. विरुद्धलिंगी (Heterosexual)

स्वतःच्या लिंग आणि लिंगभावा विरुद्ध असणाऱ्या व्यक्तींसाठी असणारे लैंगिक आकर्षण म्हणजे विरुद्ध लिंगी कल. उदा. जसे एखाद्या सिसजेंडर/ पारलिंगी पुरुषाला एखाद्या सिसजेंडर/ पारलिंगी स्त्रीसाठी लैंगिक आकर्षण वाटू शकते.

हेटेरोरोमॅंटिक म्हणजे स्वतःच्या लिंग आणि लिंगभावा विरुद्ध असणाऱ्या व्यक्तींसाठी लैंगिक आकर्षणापलीकडे प्रेमाचे किंवा भावनिक आकर्षण वाटणे.

## ४. समलिंगी/समलैंगिकता (Homosexual/Homosexuality)

स्वतःच्याच लिंग आणि लिंगभावाच्या व्यक्तीसाठी वाटलेले लैंगिक आकर्षण म्हणजे समलैंगिक कल. उदा. समलिंगी पुरुषाला (गे) पुरुषाचे आणि समलिंगी स्त्रीला (लेस्बिअन) स्त्रीचे लैंगिक आकर्षण वाटते. होमोरोमँटीक म्हणजे स्वतःच्याच लिंग किंवा लिंगभावाच्या व्यक्तीसाठी लैंगिक आकर्षणापलीकडे प्रेमाचे किंवा भावनिक आकर्षण वाटणे.

## ५. उभयलिंगी/उभयलैंगिकता (Bisexual)

स्वतःच्या लिंग आणि लिंगभावाच्या आणि इतर लिंग आणि लिंगभावाच्या व्यक्तींसाठी वाटणारे लैंगिक, भावनिक, प्रेमाचे आकर्षण म्हणजे उभयलिंगी कल.

मुळात 'लिंग' आणि 'लिंगभाव' ही सामाजिक, सांस्कृतिक रचितं असल्यामुळे लिंग आणि लिंगभाव म्हणजे फक्त 'स्त्री'आणि 'पुरुष' नाही अशी समज जशी वाढत आहे तशी उभयलिंगीच्या व्याख्येची व्यापकता वाढत आहे. इथे स्त्री-पुरुषांसाठी ५०-५०% प्रेम किंवा आकर्षण अशा प्रमाणावर उभयलिंगीची व्याख्या अवलंबून नाही.

## ६. सार्वलिंगी (Pansexual)

सार्वलिंगी व्यक्तींना सर्व प्रकारचे लिंग आणि लिंगभाव असलेल्या व्यक्तींबद्दल लैंगिक, भावनिक आकर्षण वाटतं.

### ७. अलैंगिक (Asexual)

अलैंगिक म्हणजे अशी व्यक्ती, ज्या व्यक्तीला कोणत्याही व्यक्तीबद्दल लैंगिक आकर्षण वाटत नाही. मात्र अशा व्यक्तींना रोमँटिक भावना, आकर्षण वाटू शकतं.

### ८. रोमँटिक कल (Romantic orientation)

रोमँटिक कल म्हणजे लैंगिक आकर्षणाविरहीत/ सहित एखाद्या व्यक्तीची ओढ वाटणं. व्यक्तीच्या लिंग आणि लिंगभावाशी त्याचा संबंध असेलच असं नाही.

## सामुदायिक व्याख्या

### १. क्वीअर (Queer)

सामाजिक मान्यता असलेले लिंग, लिंगभाव, लैंगिकता उदा. स्त्री, पुरुष, सिसजेंडर, विरुद्धलिंगी अशा साच्यांच्या बाहेर जाऊन जाऊन व्यक्त होणाऱ्या आणि व्याख्येच्या प्रक्रियांना नाकारणाऱ्या लैंगिक आणि लिंगभाव अभिव्यक्तींना क्वीअर असे म्हणतात.

इंग्रजीमध्ये क्वीअर ह्या शब्दाचा मूळ अर्थ 'विचित्र' असा होता. आणि तो सिसजेंडर आणि विरुद्ध लिंगीच्या साच्यात न बसणाऱ्या लैंगिक अल्पसंख्यांकांसाठी पूर्वी शिवी म्हणून वापरला जायचा. पण, पाश्चीमात्य देशांमध्ये झालेल्या समलिंगी आणि 'पारलिंगी' लोकांच्या चळवळीमध्ये समुदायातील लोकांनी याच शब्दाला अभिमानाने वापरायला सुरुवात करून त्याला सकारात्मक अर्थ दिला.

### २. एलजीबीटीक्युआयए+ (LGBTQIA+)

लिंग, लिंगभाव आणि लैंगिकता यांच्या पितृसत्ताक आणि विरुद्धलिंगी साच्यांना नाकारणाऱ्या लैंगिक ओळखींसाठी इंग्रजीमध्ये असलेले एलजीबीटीक्युआयए+ हे अनेक शब्दांचे लघु रूप आहे. त्यामध्ये L म्हणजे लेस्बियन (समलिंगी स्त्री), G म्हणजे गे (समलिंगी पुरुष), B म्हणजे बायसेक्शुअल (उभयलिंगी), T म्हणजे ट्रान्सजेंडर (पारलिंगी), Q म्हणजे क्वीअर, I म्हणजे इंटरसेक्स (द्विलिंगी), A म्हणजे असेक्शुअल (अलैंगिक) आणि लैंगिक आणि लिंगभाव ओळखींच्या इतर अनेक शक्यतांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी अधिकचे + हे चिन्ह मांडले जाते.

### ३. लिंगभाव आणि लैंगिक ओळख जाहीर होणे (Coming out)

स्वतःच्या सोयीनुसार जवळच्या व्यक्ती, कुटुंब, समूह किंवा समाजाच्या साच्यात न बसणारी स्वतःची लिंगभाव व लैंगिक ओळख जाहीरपणे सांगणे.

विरुद्धलिंगी आणि सिसजेंडर लोकांना समाजात आधीच मान्यता असल्याने कमिंग आउटची (जाहीर होण्याची) गरज उरत नाही. मात्र क्वीअर लोकांसाठी स्वतःची ओळख जाहीर करणे ही एक महत्वाची घटना असते.

## ४. समर्थक (Aly)

कोणत्याही व्यक्ती किंवा संस्था ज्या एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील लोकांच्या हक्कांचे समर्थन करतात, आणि त्यांच्या समता आणि न्यायाच्या लढ्यात सामील होतात आणि स्वतःचे विशेषाधिकार प्रश्नांकित करण्यासाठी किंवा सोडण्यासाठी तयार होतात, त्यांना समर्थक म्हणतात.

## ५. क्वीअर अभिमान यात्रा (Queer pride parade)/सतरंगी अभिमान यात्रा (Rainbow pride parade)

क्वीअर अभिमान यात्रा/ सतरंगी अभिमान यात्रा/ एलजीबीटीक्युआयए+ अभिमान यात्रा समुदायातील लोकांची लिंगभाव आणि लैंगिक ओळख साजरी करण्यासाठी त्यांच्या हक्कांना आवाज देण्यासाठी, त्यांचा स्वाभिमान बळकट करण्यासाठी आणि त्यांची स्वतंत्र संस्कृती साजरी करण्यासाठी आयोजित केलेली यात्रा असते. ह्या कार्यक्रमामुळे समुदाय एकत्र येऊन एरवी अदृश्य ठेवलेलं, दडपलेलं त्यांचं अस्तित्व दृश्यमान व्हायला मदत होते आणि त्यांना त्यांच्या हक्कांची मागणी करण्यासाठी जागाही तयार होते.

## ६. लिंग, लिंगभाव किंवा लैंगिकता बदलण्याची उपचार प्रक्रिया (Conversion therapy)

समाजात एलजीबीटीक्युआयए+ समुदायाबद्दल असलेल्या अमान्यातेमुळे समुदायातील व्यक्तींवर त्यांचा मनाविरुद्ध लैंगिक कल किंवा जेंडर बदलून सिसजेंडर आणि विरुद्धलिंगी साच्यांमध्ये बसवण्यासाठी बेकायदेशीर, अशास्त्रीय आणि अनैतिक स्वरूपाच्या 'उपचार पद्धती' केल्या जातात. पितृसत्ताक, धार्मिक, इतर पूर्वग्रह आणि अंधश्रद्धांवर आधारलेल्या विचारसरणीचा हा परिणाम आहे. ह्या प्रक्रिया समुदायातील लोकांसाठी शारीरिक आणि मानसिक पातळीवर अतिशय हानिकारक आहेत.

## ६. सर्वनाम (Pronouns)

कोणत्याही व्यक्तीला उद्देशून बोलताना "तो, ती, तिचे, त्याचे, ते, त्यांचे" इत्यादी सर्वनाम वापरले जातात. व्यक्तीकडे बघून त्यांच्या लिंगभाव अभिव्यक्तीवरून त्यांचे लिंगभाव आपण ठरवून त्यांना संबोधित करण्यासाठी सर्वनाम निवडणे चूक आहे. त्यांना संबोधित करण्यासाठी कोणते सर्वनाम वापरावे हे त्यांना विचारणं गरजेचं असतं. आपल्याला 'पुरुष' वाटणारी व्यक्ती स्वतःसाठी 'तो' हे सर्वनाम वापरत असेलच असं नाही.

## ७. हिजड़ा वय्क्ती (Hijra Person)

भारतात 'द्विलिंगी' आणि 'पारलिंगी' स्त्रियांचा एक समुदाय आहे ज्याला हिजरा किंवा हिजडा समुदाय असे म्हटले जाते. सर्व 'द्विलिंगी' आणि 'पारलिंगी' व्यक्ती ह्या समुदायाचा भाग असतीलच असे नाही. त्यामुळे सर्व हिजडा समुदायातील व्यक्ती 'पारलिंगी' असतात पण सर्व 'पारलिंगी' व्यक्ती हिजडा नसतात. ह्या समुदायाची आपली स्वतःची ओळख, परंपरा, पद्धती इतिहास आणि संस्कृती आहे. वेगवेगळ्या जाती, धर्मातील 'पारलिंगी' व्यक्ती गुरु शिष्य परंपरेने चालणाऱ्या ह्या समाजाचा भाग होतात. असे असले तरी हा समुदाय समाजातील उपेक्षित वर्ग आहे.

हिजडा, हिजरा हे शब्द ह्या समुदायातील व्यक्ती स्वतःची ओळख करून देण्यासाठी वापरतात. कागदोपत्री तृतीयपंथी हा शब्द वापरला जातो मात्र ह्या समुदायातील सर्व लोकांना हा शब्द मान्य असेलच असे नाही.

## पत्रकारांसाठी मुख्य गोष्टी



*पत्रकारांनी एलजीबीटीक्युआयए+ समुदाय किंवा त्यामधील व्यक्तींच्या बाबत कोणतीही बातमी देताना कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत याची माहिती या भागात दिली आहे. आधीपासूनच असुरक्षित असणाऱ्या समुदयांबद्दलच्या या बातम्या लोकांच्या मनात भेदभाव किंवा राग पसरवणार नाही याची जबाबदारी पत्रकारांनी घेतली पाहिजे.*

- **नाव आणि सर्वनाम**

पत्रकारांना बऱ्याचदा खूप कडक अंतिम तारखा पाळाव्या लागतात पण मुलाखत देणाऱ्या विषयी अनादर दाखवण्याचं हे कारण असू शकत नाही. पत्रकार म्हणून तुम्ही पत्राकरितेचे नियम पाळले पाहिजेत आणि त्याचसोबत माहिती देणाऱ्या स्त्रोतांसोबत विश्वासाचं नातं बनवलं पाहिजे. पत्रकारांनी त्यांच्या गोष्टी/बातम्या नेहमी अचूकपणे, प्रामाणिकपणे लिहाव्या आणि त्यात स्त्रोतांची सुरक्षा पहिली पाहिजे. या सगळ्या गोष्टींपैकी कशातही एलजीबीटीक्युआयए+ लोकांच्या मुलाखती घेताना बदल होत नाही.

बातमी मध्ये व्यक्तीबद्दल लिहिताना, त्याचा संदर्भ देताना किंवा लोकांमध्ये बोलताना त्याचे नाव आणि सर्वनाम बरोबर वापरलं पाहिजे आणि पत्रकारांनी ते विचारणं अत्यावश्यक आहे. आशा वेळी कोणतीही गोष्ट गृहीत धरून चालू नका, त्यापेक्षा तुम्ही आदराने विचारू शकता:

- **तुमचे नाव काय आहे?** - हे नाव जरी कायदेशीर नसेल तरीही व्यक्ति जे सांगेल तेच नाव पत्रकांनी वापरायला पाहिजे.

  टीप- जर व्यक्तीला नाव जाहीर करायचं नसेल तर तुमच्या संस्थेने नाव बदलून वापरण्यासाठी काही नियम दिले असतील तर त्याचा वापर करावा, तो वापर करताना बदल केलेल्या नावाच्या लिंगभावामध्ये सातत्य ठेवावे.

- **तुम्ही कोणते सर्वनाम वापरता?** - 'पसंतीचे/आवडीचे सर्वनाम' असे काही वापरण्यापेक्षा फक्त 'सर्वनाम' वापरा. व्यक्तीचे सर्वनाम तो, ती, तिचे, त्याचे, ते, त्यांचे, झी, झीस इत्यादि असे काहीही असू शकते. जर व्यक्तीला सर्वनाम वापरणं पसंत नसेल तर रिपोर्ट मध्ये व्यक्तीचे नाव लिहा.

    - **व्यक्तीचे जूने नाव विचारू सुद्धा नका** आणि त्यांच्या परवानगी शिवाय कुठे वापरूही नका. जूने नाव हे व्यक्ती आधी ज्या नावाने ओळखली जात होती. जुन्या नावाचा वापर करणे हाअनादर आणि व्यक्तीची लिंगभाव ओळख नाकारणे असे समजले जाऊ शकते.

- **एलजीबीटीक्युआयए+ ही ओळख क्लिक-बेट नाही:** व्यक्तीची लिंगभाव ओळख किंवा लैंगिक कल बातमीची गरज असेल तरच तिथे उल्लेख करावा.
    - जसे की, एखादी चोरी झाली असेल आणि संशयी व्यक्ति जर समलिंगी असेल तर ही ओळख बातमी मध्ये लिहिण्याची गरज नाही. आपण सहसा विरुद्धलिंगी चोराच्या लैंगिकते बद्दल बातमी मध्ये लिहीत नाही, मग फक्त एलजीबीटीक्युआयए+ लोकांच्या बाबतीतच का?

- **एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती या त्यांच्या लिंगभाव आणि/किंवा लैंगिकता या पेक्षा अजून बरेच काही आहेत:** एखाद्या तज्ञ व्यक्ती बद्दल लिहीत असताना, जे एलजीबीटीक्युआयए+ आहेत तेव्हा त्यांना विचारून हुद्दा लिहावा.
    - जसे की, ABC एक लेखिका आणि समलिंगी स्त्री आहे, तिची ओळख लिहिताना
        - ABC एक लेखिका किंवा,
        - ABC एक समलिंगी स्त्री किंवा,
        - ABC, एक समलिंगी स्त्री आहेत ज्या लेखिका आहेत किंवा,
        - ABC, एक लेखिका आहेत ज्या समलिंगी स्त्री आहेत.

  जेव्हा शंका किंवा गोंधळ असेल तेव्हा शेवटचा पर्याय निवडा.

- **अल्पवयीन लोकांची ओळख संभाळा:** अल्पवयीन व्यक्ति, जी क्वीअर, लिंगभाव नियम न मानणारी किंवा पारलिंगी असेल तर त्यांच्या ओळखीची खबरदारी जशी बाकीच्या अल्पवयीन व्यक्तींची घेतली जाते तशीच घ्यावी. संबंधित भारतीय कायद्यांचा संदर्भ घ्या जसे की लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पॉक्सो) कायदा, २०१२, बाल न्याय (काळजी आणि मुलांचे संरक्षण) अधिनियम, २०१५, इ.

- **कोणाचे संदर्भ द्यायचे याचा विचार करा:** जर तुम्ही एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील मृत व्यक्तीबद्दल लिहीत असाल तर तुम्ही त्यांच्या निवडलेल्या कुटुंबा सोबत बोलण्या ऐवजी जन्मासोबत येणाऱ्या कुटुंबाशी बोलण्याला महत्व देत आहात का? कोण मृत व्यक्तीबद्दल जास्त चांगल्याने सांगू शकेल?

- **एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील गुंतागुंतीच्या अडथळ्यांबद्दल जाणीव ठेवा:** एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती त्यांची जात, धर्म, आर्थिक स्थिती इत्यादींमुळे अधिक वंचित असू शकते. तुम्ही ज्या व्यक्तीशी बोलत आहात त्या व्यक्तीच्या विशेषाधिकाराची जाणीव ठेवून कथेमध्ये कोणाला दाखवायचे हा निर्णय घेताना ते महत्त्वाचे ठरते.

- उदाहरणार्थ, जेव्हा तुम्ही सेक्स वर्कर्सबद्दल लिहिता तेव्हा या पार्श्वभूमीतून येणाऱ्या लोकांशी बोलणे आवश्यक असते, आणि जे कामगारांशी संबंधित आहेत, केवळ परदेशात राहणाऱ्या सेक्स वर्कर्सवर संशोधन करणाऱ्या व्यक्तीशी नाही. या तत्त्वाचे पालन न करणे हे वर्गाचे आणि जातीय पूर्वाग्रह आहे असं दाखवेल.

- **पारलिंगी समूहाबाबत आणि व्यक्तीं बाबत बातमी करताना:** पारलिंगी समूहाबाबत आणि व्यक्तीं बाबत बातमी करताना खालील गोष्टी लक्षात ठेवा-
    - पारलिंगी हा शब्द विशेषण म्हणून वापरला जावा. पारलिंगी शब्द हा कोणतेही नाव दाखवत नसल्याने फक्त पारलिंगी म्हणण्यापेक्षा नेहमी पारलिंगी व्यक्ती, पारलिंगी स्त्री, पारलिंगी पुरुष असे बातमीच्या गरजेनुसार वापरावे.
    - 'एक स्त्री म्हणून जन्म झालेला' किंवा 'एक पुरुष म्हणून जन्म झालेला' अशी वाक्ये वापरू नये. 'जन्माच्या वेळी ठरवले गेलेले लिंग' हे वाक्य वापरण्यासाठी बरोबर आहे.
        - उदा. 'XYZ पारलिंगी पुरुष आहे.'

          जर वाचकांना अजून स्पष्ट सांगायचं असेल तर, 'XYZ ला जन्माच्या वेळी स्त्री हे लिंग नेमून दिलं होतं आणि त्यांनी विसाव्या वर्षी लिंगभाव निश्चिती प्रक्रिया चालू केली' असं लिहू शकता.

          'XYZ एक स्त्री म्हणून जन्मलेली होती' असं लिहू नका.
    - पारलिंगी व्यक्तींच्या शरीराबद्दल किंवा लैंगिक अवयवांबद्दल प्रश्न विचारणं टाळा. तुमची बातमी आरोग्य सुविधा याबद्दल असेल तर विशिष्ट माहिती काढून घेणारे प्रश्न विचारू नका आणि पारलिंगी व्यक्तिला किती आणि कोणत्या गोष्टी सांगायच्या आहेत हे त्यांना ठरवू द्या.
    - 'लिंग बदल' किंवा 'लिंग बदलण्याची शस्त्रक्रिया' असे शब्द वापरू नका. त्यापेक्षा शस्त्रक्रिये बद्दल बोलायचे असेल तर 'लिंगभाव निश्चिती करण्याची शस्त्रक्रिया' असं वापरा. 'लिंगभाव निश्चिती करण्याची शस्त्रक्रिया' - याचा वापर वैद्यकीय, सामाजिक आणि कायदेशीर प्रक्रियेसाठी केला जाऊ शकतो.
    - पारलिंगी समुदाय आणि व्यक्तींबाबत बातमी लिहीत असताना, शस्त्रक्रिया आणि लिंगभाव निश्चित करण्याच्या प्रक्रियेच्या पुढे जाऊन त्यांचा प्रवास समजून घेणे ही महत्वाची गोष्ट आहे. वाचकांना या वरच्या गोष्टींबद्दल खूप जाणून घ्यायचे असू शकतं पण पोलिसांकडून होणारी हिंसा, भेदभाव, काम, रोजगार, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांपासून बाहेर ठेवणे, या बाबींकडे पत्रकारांनी जास्त लक्ष द्यावे.



## संपादकांसाठी मुख्य गोष्टी

*संपादकांनी (उप-संपादक, माहिती पडताळणारे आणि प्रूफरीड करणारे) एलजीबीटीक्युआयए+ समुदाय किंवा त्यामधील व्यक्तींच्या बाबत कोणतीही बातमी देताना कोणत्या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत याची माहिती या भागात दिली आहे. विशेष करून स्तंभ लेखनाच्या भागासाठी संपादकाची नियुक्ती यासाठी 'स्तंभलेखन आणि त्यासाठी निवड' या भागाची मदत घ्या.*

- **बातमीचे शीर्षक खळबळजनक पेक्षा आदरपूर्वक असावे:** वाचक सर्वात पहिली गोष्ट कोणती बघत असेल तर ती आहे शीर्षक. कदाचित काही वाचक हे फक्त शीर्षका पुरतच वाचतात. या बातम्यांच्या स्पर्धेत खूपदा संपादकांना असं काहीतरी 'लक्ष खेचून घेणारं' शीर्षक द्यायला लागतं जेणेकरून लोकं बातमी वाचतील. पण संपादकांनी त्यांची संवेदनशीलता आणि हानी न पोहोचवण्याची जबाबदारी टाळण्याचं हे कारण नाही. खळबळजनक शीर्षक आणि संवेदनशील शीर्षक असे दोन पर्याय असतील तर नेहमी दूसरा निवडा.
  - चोरीच्या बातमीमध्ये, जर चोरी एखाद्या क्वीअर व्यक्तीकडून झाली असेल तर शीर्षकामध्ये क्वीअर ह्या ओळखीवर लक्ष केंद्रित करायची गरज नाही. घडलेल्या गुन्ह्याचा आणि या ओळखीचा एकमेकांशी काहीही संबंध नाही. असं केल्याने बातमीचे मूल्य न वाढता फक्त वाचकांना मनोरंजन देण्यापलीकडे काहीही करत नाही.
- **नाव आणि सर्वनाम नीट पडताळून पहा:** मीडिया ने खूप काळापासून पारलिंगी व्यक्तींच्या गोष्टींमध्ये त्यांचे जुने नाव वापरलं आहे. पारलिंगी व्यक्तींच्या 'आधी आणि नंतरच्या' आयुष्यावर लक्ष केंद्रित करून, त्यांना 'कुतुहलाचे एक साधन' म्हणून पहिलं गेलं आहे. ही गोष्ट संपादकीय बाजूने गरजेची नाही आणि संवेदनशील पण नाही. जर पत्रकाराने एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीबद्दल लिहिले असेल तर त्यांचे नाव आणि सर्वनाम नीट तपासून, तेच पूर्ण बातमीमध्ये वापरलं गेलं आहे ना याची खबरदारी घ्यावी. लेखकाने कितीही खबरदारी घेतली तरीही आधीच्या चुकीच्या कल्पनांमुळे काही चुका होण्याची शक्यता असू शकते हे लक्षात घेऊन संपादकाने त्या नीट कराव्या.
  - टीप- काही क्वीअर व्यक्ती अनेक सर्वनाम वापरत असतील- जसे की ती/त्यांचे, तो/त्यांचे, तो/ती किंवा तो/ती/त्यांचे. संबंधित व्यक्तीशी बोलून आणि बातमी ची गरज पाहून एकतर सगळे सर्वनाम एकाच बातमीमध्ये वेगळ्या वेगळ्या जागी वापरता येऊ शकतात किंवा त्या वेळेला नेवडलेलं वापरता येऊ शकते, हा निर्णय घेता येऊ शकतो. पहिल्यांदाच जेव्हा नाव वापरलं जात आहे, तिथेच कोणते सर्वनाम वापरलं जाणार आहे हे नमूद केलं तर वाचकांसाठी स्पष्ट होईल.

- **योग्य जागी योग्य शब्द वापरण्यासाठी दिलेल्या शब्दावली ची मदत घ्या:** तुमच्या पत्रकाराने एलजीबीटीक्युआयए+ समुदाय किंवा व्यक्ती बद्दल लिहिले आहे पण कोणते शब्द वापरायचे या बद्दल पूर्ण माहिती नाही. अशावेळी सोर्स सोबत बोलून ठरवावे की त्यांना नक्की कोणते शब्द स्वतःबद्दल वापरलेले हवेत. आणि हे जर शक्य नसेल, तुम्हाला अजून काही संकल्पना मांडायच्या आहेत तर दिलेली शब्दावली पाहावी आणि योग्य शब्द अर्थ समजून घेऊन निवडावा.
    - उदा. एका अल्पवयीन व्यक्तीवर शाळेत काही लोकं व्यक्तीच्या लिंगभाव अभिव्यक्तिमुळे नेहमी दादागिरी करत आहेत आणि ही व्यक्ती स्वतःच्या बचावासाठी बोलू शकत नसेल अशावेळी 'बायकी' किंवा 'मुलीसारखं वागणारे' असे लिहिणे टाळा. त्यापेक्षा सोर्स प्रमाणे 'या व्यक्ती लिंगभाव मनात नाहीत' असे म्हणू शकता. व्यक्तीची लिंगभाव ओळख गृहीत धरू नका कारण तुम्हाला ते एलजीबीटीक्युआयए+ या मोठ्या ओळखीत स्वतःला पाहतात की नाही हे माहिती नसते
- **वापरलेली वाक्ये सोर्स कडून पडताळून घ्या:** सविस्तर मुलाखत आणि बातमी मध्ये जी वाक्ये सोर्स बोलले आहेत ते एकदा परत त्यांच्याकडून तपासून घेणे हे एक चांगले संपादन आहे. यामुळे अनुवाद करताना किंवा वाक्य वापरले असताना काही चूक तर झाली नाही ना याची खात्री करून घेता येईल. हीच गोष्ट एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीं सोबतही करावी कारण खासकरून मीडिया संदर्भात वाईट अनुभव आधीच आलेले असतात. कोणतेही ऑर्गनाइझेशन किंवा संपादक संपूर्ण बातमी सोर्स कडून पडताळून घेऊ शकत नसतील पण वापरलेली वाक्ये तर नक्कीच करून घेऊ शकतात. यामुळे एक विश्वासाचं नातं तयार होईल.
- **एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीला संवेदनशील गोष्टी पडताळून पाहायला सांगा:** जर तुम्ही कोणत्या गुंतागुंतीच्या गोष्टीवर काम करत असाल पण तुम्ही त्यातले तज्ञ व्यक्ती नसल्या कारणाने काही गोष्टी सुटून जाऊ शकतात. म्हणूनच ऑर्गनाइझेशन मधील किंवा बाहेरील तज्ञ व्यक्ती सोबत बोलून लिहिलेलं पडताळून घ्या. एलजीबीटीक्युआयए+ चळवळीतील कार्यकर्ते आणि पत्रकरांसोबत बातमीच्या संवेदनशीलतेबद्दल पडताळून पाहण्यासाठी व्यावसायिक स्तरावर नाती बनवा. मत कोणत्याही बाजूला झुकायला नको म्हणून ते स्वतः या बातमीचा हिस्सा नाहीत ना हे पहा.
- **सुरक्षिततेला प्राधान्य द्या:** खूप साऱ्या घटनांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीला स्वतःची ओळख उघडपणे सांगायची नसेल, ती खुली झाल्याने त्यांना कामाच्या ठिकाणी, घरी किंवा बाहेर भेदभाव आणि हिंसेला सामोरं जावं लागू शकेल. अशा वेळेला त्यांची ओळख नीट लपवली जात आहे की नाही याची काळजी घ्यावी. अशा असुरक्षित ठिकाणी असणाऱ्या कोणालाही हानी होणार नाही याची काळजी पत्राकरितेत घेतली जावी.
    - उदा. एखादी पारलिंगी व्यक्ती जर त्यांच्या कामाच्या ठिकाणच्या भ्रष्टाचाराला उघडकीस आणत असेल तेव्हा त्यांची ओळख उघडकीस आणणं म्हणजे ते कोण आहेत हे उघडकीस आणल्यासारखं होईल जिथे त्यांच्या कामाच्या ठिकाणी खूप कमी इतर पारलिंगी लोकं असण्याची शक्यता आहे. आशावेळी त्यांची लिंगभाव ओळख सुद्धा बाहेर येणार नाही याची काळजी घ्या.
    - समजा एखाद्या समलिंगी पुरुषाला डेटिंग ॲपवरती कोणीतरी धमकी दिली असेल. आशावेळी त्यांची ओळख उघड केल्याने त्यांच्या कुटुंबाला सुद्धा याबद्दल माहिती होईल. कुटुंबाला कदाचित लैंगितकतेची माहिती नसेल सुद्धा. आशावेळी तुमच्या सोर्स ची सुद्धा ओळख गुप्त ठेवा.

- **गोष्टीमध्ये एकसारखेच लोकं नसतील याची खबरदारी घ्या:** पत्रकार काही ठराविक दोन-तीन कार्यकर्त्यांचेच संदर्भ तर देत नाहीये ना याची नोंद संपादकाने घ्यावी. पत्रकार वेगळेवेगळे सोर्स शोधत आहेत याची संपादक म्हणून खात्री घेतली पाहिजे. वेगळया वेगळया सामाजिक ओळखींच्या एकत्रित असण्याने खूपसाऱ्या समुदायांप्रमाणेच आणि सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या चळवळीं प्रमाणे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना सुद्धा काही प्रमाणात विशेष अधिकार मिळतात किंवा अधिकार काढूनही घेतले जातात. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना जात, वर्ग, भौगोलिक स्थान, लिंगभाव, शिक्षणाच्या संधी, आणि भाषा या सगळया गोष्टी विशेषाधिकार सुद्धा देतात किंवा अजून परिघाबहेर ढकलतात. म्हणूनच मीडिया मध्ये सर्वात जास्त विशेषाधिकार असणारेच एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे संदर्भ येत नाहीत ना याची खबरदारी घेतली गेली पाहिजे.

- **संवेदनशील माहिती देण्याविषयी सूचना:** बातमी, विडिओ यांच्या मध्ये जर दृश्य स्वरूपात हिंसा, हल्ला, छेडछाड किंवा क्वीअर लोकांसंबंधी तिरस्कारची वाक्ये असे काहीही असेल, ज्याने एखाद्याला वाचताना ट्रिगर होऊ शकेल तर योग्य अशी सूचना सुरुवातीलाच द्या.




# स्तंभलेखन आणि त्यासाठी निवड

*संस्कृती, कला, न्याय आणि धोरण, राजकारण, शिक्षण, आरोग्य, मानव अधिकार, विज्ञान, क्रीडा इत्यादी आणि एलजीबीटीक्युआयए+ ओळखी आणि त्यांचे प्रश्न यामध्ये असणारी गुंतागुंत यावर असणारे स्तंभलेख याची माहिती या भागात दिली आहे.*

निवड करणाऱ्या संपादकाने पहिली गोष्ट लक्षात घेतली पाहिजे: स्तंभलेख कोण लिहिणार आहे? आणि हा लेख लिहिण्यासाठी ते कसे योग्य आहेत? लेख लिहिण्यासाठी त्यांची निवड करण्याआधी खालील प्रश्न विचारा:

- ते क्वीअर आहेत का?
- दिलेल्या विषयातील ते तज्ञ आहेत का?
- एलजीबीटीक्युआयए+ लोकांबद्दल त्यांनी आधी काही लिहिले आहे का?/ कसे लिहिले आहे?
- मानव अधिकार विषयांवर त्यांचे किती लिखाण आहे व एकूणच ते कसे लिहितात?

### जर ते क्वीअर असतील तर:

- समुदायासोबत त्यांचा कसा सहभाग आहे? ग्रासरूट ला त्यांचे काम कसे आहे?
- या विषयाबद्दल बोलण्यासाठी ते पात्र आहेत का? जसे की, जर ते मानसिक आरोग्याबद्दल तज्ञ म्हणून बोलत असतील तर ते मानसोपचार तज्ञ/ समुपदेशक/ थेरपिस्ट यापैकी कोण आहेत? त्यांची मते जर विवादित असू शकणार असतील तर विश्वासू तज्ञ व्यक्तीकडून दूसरा सल्ला घ्या.
    - उदा. जर ते एखाद्या वादग्रस्त उपचारपद्धतीला प्रोत्साहन देत असतील किंवा स्वतःला हानी पोहोचवण्यासाठी प्रवृत्त करत असतील तर हे प्रकाशित करण्यासाठी योग्य आहे की नाही याबाबत दुसरं मत घ्या.
- लिहिताना ते कोणत्याही पद्धतीची जात, वर्ग, लिंगभाव, लैंगिकता, वर्ण, धर्म, भाषा इत्यादींबाबत वर्चस्ववादी भूमिका घेत आहेत का? एखादी व्यक्ती फक्त क्वीअर आहे म्हणून त्यांना बाकीचे विशेष अधिकार मिळत नाहीत आणि त्यांची मतं चुकीची/हुकुमशाही ला समर्थक नसतील असं नाही.

- उदा. एखादी प्रबळ एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, जी बहुसंख्य लोकांवर होणाऱ्या हिंसेला पाठिंबा देत असतील तर फक्त ते क्वीअर आहेत म्हणून त्यांना जबाबदार पकडू नये असे नाही.
- अजून एक उदा. एखादी विशेषधिकार मिळणाऱ्या जातीतून येणारी क्वीअर व्यक्ती जर दुसऱ्या वंचित जातीतील क्वीअर व्यक्तीबद्दल जातीयवादी विधानं करत असेल, तर या व्यक्तीला जबाबदार ठरवण्यासाठी जर वंचित जातीतून येणाऱ्या व्यक्तीला स्तंभलेख लिहायचा असेल तर त्यात काहीही गैर नाही.

- कोणतीही क्वीअर व्यक्ती स्वतःला सगळ्या समुदायांची/लोकांची प्रतिनिधी म्हणून घोषित करू शकत नाही. म्हणूनच लेखनासाठी निवड करताना कोणीही असा दावा करत असेल तर लक्ष द्या.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती सुद्धा दुराग्रही असू शकतात आणि सोबतच्या क्वीअर तसेच बाकीच्या इतर ओळखी आहेत त्यांचे विचार ऐकून न घेणारे असू शकतात. लेख लिहायला देऊन, त्यांना दुराग्रही मते मांडायला जागा देऊ नका.
    - उदा. जर एखादी सिसजेंडर समलिंगी स्त्री, पारलिंगी स्त्रियांच्या समलिंगी असण्यावर प्रश्न उपस्थित करणारा एखादा लेख लिहू पाहत आहे, तर हा फक्त एखादा 'चर्चेचा' विषय म्हणून सुद्धा मान्य होऊ शकत नाही आणि सदर विचार चुकीचा आहे याचा विचार व्हावा. व्यक्तीची लैंगिकता आणि लिंगभाव हे स्वतःहून ती व्यक्ती ठरवत असते, आणि दुसरे कोणी ते ठरवू शकत नाही.

**जर व्यक्ती क्वीअर नसतील तर:**

- क्वीअर व्यक्तीच्या अनुभवाबद्दल ते कोणती भूमिका घेत आहे का? जर घेत असतील, तर ह्या कामासाठी त्यांची निवड करू नका.
- जर ते या विषयातील तज्ञ असतील तर ते विषयाला अनुसरून लिहीत आहेत का? किंवा अशा प्रश्नांबद्दल लिहित आहे की ज्यावर क्वीअर व्यक्ती चांगल्याने भाष्य करू शकतात?
    - जसे की, एखादा वकील लग्नाच्या समानते बद्दल लिहीत असतील तर ते कायदे, घटनात्मक व्याख्या इत्यादींबद्दल लिहीत आहेत की क्वीअर व्यक्तींच्या अनुभवांवर मते बनवत आहेत? यामध्ये पहिले ठीक असेल दुसरे नाही.
- जर ते विषयातील तज्ञ असतील तर जी भूमिका घेत आहेत ती वादग्रस्त किंवा चुकीची आहे का हे पाहण्यासाठी समुदायातील विश्वासू व्यक्तीकडून दूसरा सल्ला घ्या.
    - उदा. जर मानसिक आरोग्य या विषयातील एका तज्ञ व्यक्तीला क्वीअर असण्याविषयीची 'कारणे' याबद्दल भाष्य करायचे असेल आणि सदर भाषा वैज्ञानिक आणि अवघड असेल तर तो लेख आधी एलजीबीटीक्युआयए+ समुदायाचे मानसिक आरोग्य या विषयातील तज्ञ व्यक्तीकडून तपासून घ्यावी.
- क्वीअर लोकांसाठी असणाऱ्या जागा ही सदर व्यक्ती नेहमी व्यापून टाकते का? त्यांच्या आधीच्या कामाची पात्रता पण बघावी, त्यांचे पब्लिक सोशल मीडिया अकाऊंट आणि गतिविधी पण बघावी. क्वीअर व्यक्तींचे अनुभव सांगताना ते नेहमी स्वतःला केंद्रस्थानी ठेवतात का? जर असे असेल तर ते धोक्याचे चिन्ह आहे. हा एखाद्याच्या ओळखीचा गैरवापर करणे असून जबाबदार मीडिया ने हे करणे टाळले पाहिजे.

- एलजीबीटीक्युआयए+ या मोठ्या ओळखीबद्दल, समुदायातील दुसऱ्या ओळखीबद्दल समर्थन दाखवताना इतर ओळखीच्या व्यक्तींबद्दल संकुचित विचार आणि तुच्छता पसरवणारे लेख स्वीकारू नये.
    - जसे की, स्त्रीवादी म्हणून कारकीर्द असणारी व्यक्ती सिसजेंडर समलिंगी स्त्रियांना पाठिंबा दाखवणारा लेख लिहिताना जर पारलिंगी स्त्रियांबद्दल चुकीची माहिती पसरवत असेल तर हे धोकादायक आहे. अशा स्त्रीवाद्यांना टर्फ्स - ट्रान्स एक्सक्लुजनरी रॅडिकल फेमिनिस्ट म्हणून ओळखलं जातं. ही भूमिका चुकीची असून असे लेख न घेतलेले बरे.
- जर व्यक्ती क्वीअर समुदायासाठी काम करणाऱ्या चळवळतील कार्यकर्ता आहे असं सांगत असेल, आणि असा लेख लिहिणार असेल ज्यामुळे एखाद्या स्वयंसेवी संस्थेचे किंवा त्यांचे नाव होण्यास मदत होणार असेल तर सदर लेख प्रकाशित करण्याआधी त्या व्यक्तीची पार्श्वभूमी तपासून घ्यावी.
    - जसे की, एखादी स्वयंसेवी संस्था एक सिसजेंडर व्यक्ती चालवत आहे ज्यातून क्वीअर व्यक्तींसाठी हेल्पलाईन चालवत आहे तर त्या शहरातील/राज्यातील समुदायासोबत बोलून खात्री करून घ्यावी की ही संस्था खरोखर कार्यरत आहे की फक्त निधी मिळावा म्हणून पुढे येण्याचा प्रयत्न करीत आहे.

**याचबरोबर,**

- जे प्रमाण सिसजेंडेर स्त्रियांच्या विषयक स्तंभलेखन लिहिताना वापरलं जाते तेच प्रमाण एलजीबीटीक्युआयए+ समुदायसाठी पण वापरा.
    - जसे की, जर तुम्ही 'मी टू' मध्ये आरोप झालेल्या लोकांना निवडत नसाल तर त्याचप्रमाणे पारलिंगी/ क्वीअर/ समलिंगी समुदायाचा द्वेष करणारे किंवा तशी विधाने करणाऱ्या लोकांना सुद्धा निवडू नये.
- एखादा संपादकीय लेख जर कोणी केलेल्या विधानावर करायचा असेल तर काळजी घ्या की ते वादातील विधान लिहिताना चुकणार नाही. जो नेहमी संपादकीय दर्जा वापरला जातो तोच एलजीबीटीक्युआयए+ प्रश्नांसाठी वापरा.
- जर लेख ज्यांच्यावर टिप्पणी केली जात आहे त्यांची ओळख उघड करते असेल अश्या विधानांसाठी जे सार्वजनिक रेकॉर्डशिवाय खाजगीत केले आहेत, ते स्वीकारताना तुमचा विवेक वापरा.
- जर हा स्तंभलेख एलजीबीटीक्युआयए+ समुदायाला/लोकांना हानी पोहोचवणार असेल तर त्याला नकार द्या.



## फोटो आणि विडिओ

*एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे फोटो आणि विडिओ चित्रित करणे, ते प्रसिद्ध करणे, प्रातिनिधिक दृश्य स्वरूपातील गोष्टी (रेखाचित्र) या स्वरूपाच्या गोष्टी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आणि प्रश्नांवर स्टोरी साठी वापरणे याबद्दल या भागात लिहिले आहे.*

छायाचित्रा मार्फत केली जाणारी पत्रकारिता (फोटो जर्नलिज्म) ही वाचणाऱ्या व्यक्तीला सब्जेक्ट च्या अजून जवळ आणण्यासाठी एक महत्वाचं माध्यम आहे. हे करताना पत्रकार किंवा संस्था वाचणाऱ्याच्या मनात असंख्य भावना तयार करू शकतात. गोष्टीचा मुद्दा हा त्यातील खरेपणा टिकवून सांगणे आणि सब्जेक्ट ला फोटोमध्ये सन्मानाने दाखवणे या मध्ये एक समतोल साधणे गरजेचे आहे. जेव्हा गोष्ट एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती किंवा व्यक्तींच्या काही कार्यक्रमाचे फोटो काढण्याबाबत आहे, तेव्हा पत्रकाराने कौशल्य वापरुन सब्जेक्ट ची ओळख जपणे गरजेचे आहे.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा /समुदायाचा फोटो किंवा विडिओ काढण्याआधी, याबद्दल योग्य ती माहिती त्यांना देऊन त्यांची संमती घेण्याची खात्री करावी. तुम्ही जे फोटो/विडिओ घेणार आहात ते कसे वापरले जातील, लेखाची कल्पना काय आहे, त्यातून काय प्रकाशित करणार आहात ह्या सगळ्या बद्दल नीट माहिती द्यावी. सोर्स सोबत थोडा वेळ गप्पा मारा, खात्री करा की त्यांना अवघडल्यासारखं होत नाही आहे ना, त्यांची कॅमेरा वापरण्याबद्दल संमती आहे ना. यापुढे त्यांना प्रकाशित होऊन आल्यास येणाऱ्या संभाव्य धोके सांगावे, जसे की लोकांमध्ये प्रसिद्ध होणे, इच्छेविरुद्ध येणारे भेटीचे मेसेज, टीकेचा विषय बनणे, ऑनलाइन आणि ऑफलाइन आधी पेक्षा जास्त लक्ष मिळणे. या गोष्टीची जाणीव ठेवा की ज्यांना स्वतःची लिंगभाव आणि लैंगिक ओळख जाहीर नसेल करायची त्याची ओळख यातून जाहीर होण्याचे धोके यामध्ये आहेत.
    - उदा. व्यक्तीने कदाचित काहीच लोकांसमोर ओळख जाहीर केली असेल, जसे की त्यांची मित्रमंडळी पण कुटुंबातील किंवा ऑफिस मधल्या व्यक्तींसमोर केली नसेल. एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ कार्यक्रमात त्यांनी सहभाग घेतलेला फोटो जर तुम्ही संदर्भ देऊन किंवा न देता जर प्रकाशित केला तर ते धोकादायक ठरू शकेल.
- क्वीअर समुदायाचे कार्यक्रम जसे की अभिमान यात्रा, परिषद, नाटक, पार्टी किंवा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे संमेलन, यातील कशाचेही फोटो किंवा विडिओ त्यांच्या आयुष्याबद्दल किंवा प्रश्नांबद्दल असणाऱ्या स्टोरी साठी काढताना, कार्यक्रमाच्या संयोजकांना या बद्दल विचारावी व त्यांना पुरेशी माहिती देण्यात यावी. कार्यक्रमाचे फोटोग्राफी साठी काही नियम आहेत का आणि फोटो/विडिओ मध्ये कोणाला सहभाग घ्यायचा आहे आणि कोणाला नाही हे जाणून घेण्यासाठी

त्यांच्या कडे काही पद्धती आहेत का हे ही विचारावे. ज्यांना फोटोत येण्या मध्ये हरकत नाही त्यांना स्टिकर किंवा एखादी खूण संयोजक देऊ शकतात, ही सुद्धा एक पद्धत असू शकते.

- प्रातिनिधिक स्वरूपात असणारी चित्रं निवडताना, गोष्टीचा संदर्भ समजून घेऊन फोटो/चित्र निवडा. अभिमान पदयात्रेतील फोटो ज्यात एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती दुसऱ्या गोष्टीसाठी प्रातिनिधिक चित्र बनतील असे फोटो वापरणे टाळा. प्रथमतः व्यक्तीने एक विशिष्ट संदर्भा बाहेर सदर व्यक्तीने फोटो वापरण्यासाठी संमती दिलेली नसते. आणि दुसरं म्हणजे यामुळे वैयक्तिक/व्यावसायिक धोके ही होऊ शकतात. ज्यात चेहरे/ओळख दिसून येत नाही असे फोटो/विडिओ आपण वापरू शकता.
  - उदा. स्टोरी जर एलजीबीटीक्युआयए+ लोकांना आरोग्यविषयक सुविधा वापरताना येणारे अनुभव याबद्दल असेल तर या संदर्भातील एखादा फोटो वापरावा. जसे तो फोटो क्वीअर व्यक्ती (चेहरा आणि इतर खुणा दाखवल्या जाऊ शकतात किंवा नाही) आरोग्य सेवांचा वापर करून घेण्याचा प्रयत्न करीत आहे असा असू शकतो. जर असा फोटो नसेल तर एखादं रेखाचित्र वापरा. पण एलजीबीटीक्युआयए+ समुदायाचा झेंडा किंवा या संदर्भा बाहेर घेतलेले क्वीअर व्यक्तींचे फोटो/विडिओ वापरू नका.
- इतर लोकांसाठी कॅमेरा वापरताना तुम्ही जो मान, सन्मान देता तोच एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना द्या. एक विशिष्ट पद्धतीने कॅमेरा समोर वावरा असं त्यांना सांगू नका, कारण तुम्ही त्यांना मुळातच त्यांच्या ओळखीला 'सादर' करायला सांगत आहात आणि त्यामुळे त्यांना एक ठराविक साच्यात बसविल्या जाण्याचा प्रयत्न होईल. हेच सगळे मापदंड प्रातिनिधिक चित्रांना सुद्धा खात्रीने वापरावे.
  - उदा. सूट घातलेल्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीला टॅटू किंवा शरीरावर असणारे टोचून घेतलेले दागिने दाखवायचे नसतील तर दाखवायला सांगू नका.
- पारलिंगी किंवा नॉन बायनरी व्यक्तींचे फोटो प्रकाशित करताना, जर त्यांचा आग्रह नसेल तर त्यांचे लिंगभाव निश्चिती प्रक्रियेच्या आधीचे आणि नंतरचे फोटो वापरू नका.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना उगाच स्टोरीशी संबंधित नसेल तर नैराश्याने ग्रासलेले, हिंसक किंवा उदास दाखवू नका.
- धर्म, वय, वर्ग, लिंगभाव, शरीराचा आकार, अपंगत्व इत्यादी. गोष्टींमध्ये वेगळेपणा असणारी चित्र निवडा.
- व्यक्तीची एलजीबीटीक्युआयए+ ओळख जर स्टोरीसाठी गरजेची आणि सार्वजनिक हितासाठी असेल तर संवेदनशीलतेने आणि आदराने ती मांडा. सर्वनामाबद्दल विचारा, कोणत्या पद्धतीने फोटो किंवा विडिओ घेणे चांगलं राहील ह्याची सुद्धा चौकशी करा. जर कोणी प्रसिद्ध व्यक्ती असेल तर त्यांच्या मॅनेजर किंवा त्यांच्या लोकप्रसिद्धीसाठी काम करणाऱ्या लोकांना विचारा. रिपोर्ट मध्ये ते नमूद करा.
  - जसे की, एखाद्या द्विलिंगी व्यक्तीवर त्यांच्या इच्छेविरुद्ध झालेल्या शस्त्रक्रियेमुळे त्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम यासाठी फोटो घ्यायचे आहेत. यासाठी त्यांचा वाचताना, खेळ खेळताना, कोणाशी बोलताना किंवा त्यांच्या इतर आवडीशी निगडीत फोटो घ्या ना की असा कोणताही ज्यात त्यांच्या सन्मानाला धक्का पोहोचेल.
- फोटो/दृश्ये त्याच ठिकाणी प्रसिद्ध होतील ज्या साठी व्यक्तीने होकार दिला आहे याची खात्री बाळगा.

- जसे की तुम्ही जर 'अ' या कंपनी/ संस्थेसाठी काम करत असाल आणि त्यांच्यासाठी 'क' या व्यक्तीचे फोटो काढले असतील. नंतर 'ब' ही संस्था तो लेख काही बदल करून पुनः प्रकाशित करू इच्छित आहे. जेव्हा संस्था 'ब', 'अ' कडे याच्या परवानगी साठी येईल तेव्हा 'क' व्यक्तीकडून त्यांच्या फोटोसाठी पुन्हा परवानगी घेणे गरजेचे आहे.

- सतरंगी झेंडा हा प्रातिनिधिक चित्र म्हणून बिनधोक आहे पण खूप सपक आहे. हे चित्र वापरण्या आधी स्वतःला विचारा, की जर तुम्ही हीच स्टोरी सिसजेंडर विरुद्धलिंगी लोकांबद्दल लिहीत असाल तर कोणते चित्र वापरलं असतं? जी गोष्ट या झेंड्या बाबत नाहीये तिथे हा झेंडा वापरण्याचा काय संबंध आहे? स्टोरीच्या गाभ्यापाशी जाऊन विचार करा की सतरंगी झेंड्याच्या अतिरिक्त वापर सोडून काय वापरायला पाहिजे.

  - उदा. जर तुम्ही लिंगभाव निश्चिती प्रक्रिया आणि काळजी याबद्दल लिहीत असाल तर यात आरोग्य सेवेबद्दल बोलायला झेंडा वापरणं हे किती योग्य आहे हे स्वतःला विचारा. काही पारलिंगी व्यक्तींसाठी लिंगभाव निश्चित करणारी आरोग्य सेवा हा रोजच्या आयुष्यातला भाग आहे. याला काहीतरी गोंधळात टाकणारी गोष्ट म्हणून बघण्या पेक्षा रोजची, सवयीची म्हणून पहा. एस्ट्रॅडिओल, टेस्टोस्टेरॉन चे डोस आणि टॉप सर्जरी च्या जखमा या जर रोजच्या गोष्टी आहेत तर त्याला तुम्ही काहीतरी वेगळं किंवा खळबळजनक न दाखवता आहे तसे कसे दाखवू शकाल? जर तुम्ही शिक्षणाच्या स्टोरी करत असाल तर एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती वर्गात बसून शिकण्यासाठी, शाळेत भरती होण्यासाठी, गृहपाठ पूर्ण करण्यासाठी कसे मार्ग काढतात हे दाखवा.



इमेज 1



इमेज 2

- पर्यायी मजकूर हा दृश्यचित्राच्या जोडीने, चित्रात काय आहे हे सांगायला वापरतात. पर्यायी मजकुराचा विशेषकरून ज्यांना दिसण्याच्या बाबतीत काही अपंगत्व आहे त्यांच्यासाठी सुद्धा अनुभव घेणे सोप्पं व्हावं हा देखील आहे. प्रातिनिधिक चित्रांसाठी त्यांचे वर्णन मजकुरात करा. ज्या चित्रांमध्ये माणसं आहेत, तिथे त्यांच्या ओळखीवर जास्त भर देऊ नये.

  - उदा. पहिल्या चित्रासाठी पर्यायी मजकूर असू शकतो, "चेन्नई रेनबो अभिमान पदयात्रे मध्ये अनेक फोटो जर्नलिस्ट एकत्र येऊन, सहभागी झालेल्यांचे वार्तांकन करत आहेत याचा हा फोटो आहे. यामध्ये त्या सगळ्यांनी कॅमेरा धरला आहे आणि मध्यभागी सब्जेक्ट वरती ते कॅमेरा केंद्रित करीत आहेत." फक्त इतकंच लिहू नका की, "हा फोटो फोटो जर्नलिस्ट एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे चेन्नई रेनबो अभिमान पदयात्रेत वार्तांकन करताना आहे".

    - दुसऱ्या चित्रासाठी पर्यायी मजकूर हा असू शकतो- " या फोटो मध्ये चेन्नई रेनबो अभिमान पदयात्रे मध्ये, हातात सतरंगी झेंडे आणि फलक घेऊन मोठ्या प्रमाणात लोकं चालत आहेत." ना की "चेन्नई रेनबो अभिमान पदयात्रा मध्ये समलिंगी स्त्री, पुरुष आणि पारलिंगी एकत्र आले होते." (योग्य शब्द वापरासाठी शब्दावली पहा.)

- विडिओ ला सबटाइटल देताना, त्या भाषेतील योग्य ते शब्द वापरा. जर काही शब्द आणि ओळखी या पारंपरिक असतील आणि ज्या भाषेत तुम्ही भाषांतर करत आहेत, त्यात पर्यायी शब्द नसतील तर जो आहे तोच ठेवावा. तसंच विडिओला आवाज देताना, बोलणाऱ्या व्यक्तीच्या आवाजाची नक्कल न करता संदेशावर लक्ष द्यावे.
    - उदा. ज्या व्यक्तीला आवाज द्यायचा आहे ती व्यक्ती जर बोलताना अडखळत असेल तर ते अडखळणं जुळवायला जाऊ नका फक्त संदेश तोच ठेवावा.



# अभिमान यात्रा आणि इतर एलजीबीटीक्युआयए+ कार्यक्रम

*या भागात अभिमान यात्रा, अभिमान महिना/क्वीअर इतिहास महिना आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे या व्यतिरिक्त होणाऱ्या कार्यक्रमाच्या वार्तांकनाबद्दल माहिती दिलेली आहे.*

- 'प्राईड कार्यक्रम' हा एलजीबीटीक्युआयए+ आयुष्य, प्रश्न, साहित्य, चित्रपट इत्यादी वर लक्ष देणारा कार्यक्रम असू शकतो. हे कार्यक्रम क्वीअर इतिहास महिन्यातच (जून) घेतले जावे याची गरज नाहीये. प्राईड कार्यक्रम ही सांस्कृतिक जागा असून क्वीअर समुदायातील लोकांना एकत्र येण्यासाठी सुद्धा उपयोगी ठरते. प्राईड कार्यक्रम हे क्वीअर व्यक्ती, संस्था, गट, समूह जे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या हक्कांसाठी काम करतात त्यांनी आयोजित केलेले असू शकतात. तुम्ही प्राईड कार्यक्रमाचे वार्तांकन करणार असाल तर खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या:
    - आयोजकांना विचारावे की मीडियासाठी काही प्रेस रीलीज आहे का? याच्यामुळे आयोजक कोण आहेत, कार्यक्रमाचा हेतु काय मांडला आहे याची कल्पना देता येईल.
    - प्राईड कार्यक्रमाच्या मागे काहीतरी गोष्ट आणि कल्पना असते. कार्यक्रमाची पूर्णपणे माहिती जाणून घेण्याची खात्री करावी. उदा. मागे झालेल्या अशा कार्यक्रमाची माहिती घ्या, आलेले वक्ते, कार्यक्रमातून काय साध्य झालं, या वर्षी काय हेतु आहे या सगळ्या बद्दल माहिती विचारता येईल.
    - स्टोरी मध्ये वापरण्यासाठी चित्रांबद्दल आयोजकांना विचारावे. जर तुम्ही फोटो काढणार असाल तर कोणी कोणी फोटो मध्ये येण्यासाठी सहमती दर्शविली आहे याबद्दल विचारा. कार्यक्रम जरी सगळ्यांसाठी खुला असला तरी लोकांची एलजीबीटीक्युआयए+ ओळख कुटुंबासमोर किंवा ऑफिस मध्ये असणाऱ्या लोकांसमोर प्रदर्शित होणाऱ्या फोटों मुळे बाहेर येण्याचा धोका असू शकतो. त्यामुळे फोटो घेतांना काळजी घ्या.
    - फक्त 'क्वीअरपणा' पेक्षा कार्यक्रमाच्या विषयांवर अधिक महत्व द्यावे. उदा. जर कार्यक्रम सिनेमाशी निगडीत असेल तर एलजीबीटीक्युआयए+ दृष्टिकोनातून चित्रपटांकडे लक्ष द्या.
    - क्वीअर व्यक्तींसाठी कदाचित प्राईड कार्यक्रम ही एकच सुरक्षित जागा असू शकते. जर कोणी त्यांची वाक्ये वापरायला किंवा नावाच्या उल्लेखसाठी नकार देत असेल तर त्यांच्या निर्णयाचा आदर करा.

जेव्हा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती किंवा गट धोरणांचा विरोध, न्याय, न्यायालयाचा निकाल इत्यादीं बद्दल मागण्या पुढे ठेवण्यासाठी आंदोलन किंवा निषेध दाखवत असतील, तेव्हा याचे वार्तांकन करताना आंदोलन करणाऱ्यांच्या मागण्या आणि दृष्टिकोन यावर महत्व द्या. आंदोलन करणाऱ्यांच्या एलजीबीटीक्युआयए+ ओळखीला अवाजवी महत्व देऊ नका.

- ज्या निकाल आणि धोरणांबद्दल विरोध होत आहेत ते नीट जाणून घ्या. एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील विविध लोकांशी बोला आणि जाणून घ्या का आणि कसे सदर निकाल आणि धोरणे त्यांच्या आयुष्यावर परिणाम करतील.
- सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या आंदोलन आणि निषेधाचे वार्तांकन करताना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या गोपनीयतेची काळजी घ्या आणि त्यांचे फोटो घेण्याआधी त्यांची परवानगी घ्या. (अधिक माहितीसाठी फोटो आणि विडिओ हा भाग वाचा)

- अभिमान यात्रेचे वार्तांकन करताना त्यामागील प्रेरणा समजून घ्यावी. यात्रेचे विशिष्ट भौगोलिक स्थान आणि तत्कालीन विशिष्ट कायदा ह्याच्या संदर्भातून ही यात्रा एक विरोध, आनंदोत्सव किंवा दोन्हीही असू शकते.
    - या यात्रेचे अनेक आयोजक असू शकतात. त्यांच्याशी बोलून त्या वर्षीच्या यात्रेचा मुख्य मुद्दा आणि मीडिया साठी काही पत्रक आहे का याबद्दल विचारणा करा.
    - एलजीबीटीक्युआयए+ समुदाय हा विविध लोकांनी बनलेला असून एक व्यक्तीच्या गुंतागुंतीच्या अनेक ओळखी असू शकतात. वेगळया वेगळया ओळखी असणाऱ्या एलजीबीटीक्युआयए+ लोकांशी बोलून जाणून घ्या की ही अभिमान यात्रा त्यांच्यासाठी काय आहे, त्यांनी का सहभाग घेतला आहे.
    - अभिमान यात्रेबद्दल लिहिताना शीर्षक, स्तंभ लेखन जे फक्त यातील आनंदाच्या भागावर लक्ष देतं ते घेणं टाळा.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीं बद्दल किंवा त्यांच्या कडून आयोजित असणारे सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव किंवा सादरीकरण याबद्दल वार्तांकन करताना तुम्ही बाकीच्या कार्यक्रमांना जसे कराल तसेच इथे पण करा. या कार्यक्रमागील कारण जाणून घेण्यासाठी आयोजकांशी बोला.
    - सगळे वक्ते, लेखक , कलाकार हे एलजीबीटीक्युआयए+ आहेत असे गृहीत धरून चालू नका.
    - वक्ते, लेखक, कलाकार यांची ओळख फक्त त्यांच्या क्वीअर असण्यापूर्ती मर्यादित ठेवू नका. त्यांच्या कामाबद्दल, आयुष्याबद्दल आणि कामगिरीबद्दल अजून जाणून घ्या.
- **नोकरी मेळावे:** एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना कामाच्या ठिकाणी आणि कामात भेदभावाला सामोरे जावे लागते. याचा अर्थ असा नाही की विशेष एलजीबीटीक्युआयए+ लोकांसाठी असणाऱ्या भरती साठी कमी अपेक्षा असतात. नोकरी मेळावे जे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या कामावर, हुषारीवर लक्ष देतात ते विविध संस्था, खाजगी कंपन्या इत्यादीं कडून घेतल्या जातात जेणेकरून विविधं लोकं मेळाव्यात येतील.
    - हे मेळावे वार्तांकन करताना, नोकरी शोधणाऱ्या अनेक लोकांशी बोलून त्यांची कार्यक्रमाबद्दल मतं आणि अपेक्षा जाणून घ्या.

- मेळाव्यामध्ये नोकरी देणाऱ्यांशी बोलून बोलून एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठी कामाच्या ठिकाणी काय धोरणे/ नियम आणि सुविधा आहेत हे समजून घ्या.
- कोणत्या नेमक्या जागा भरण्यासाठी नोकरी देत आहेत हे जाणून घ्या. शक्य असेल तिथे ते नमूद करा जेणेकरून एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती त्या नोकरी देणाऱ्यांपर्यंत पोहोचू शकतील.
- या मेळाव्यांबद्दल, ते होण्याआधी बातमी करणं जरूरी आहे जेणेकरून ते अजून एलजीबीटीक्युआयए+ लोकांपर्यंत पोहोचतील.

- **पारंपरिक कार्यक्रम आणि सण:** यामध्ये धार्मिक तसेच समूहाचे काही सण येतात. जसे की कूवागम आणि कुलासेकरापट्टिनम् हे तामिळनाडू, जोगप्पा हा कर्नाटक मध्ये साजरे केले जाणारे सण. या सणांमध्ये पारलिंगी व्यक्ती, लिंगभाव नियम न मानणारे व्यक्ती तसेच क्वीअर नसणारे व्यक्ती सुद्धा सहभाग घेतात.
  - यापैकी बरेच सण जरी क्वीअर लोकांसाठी केंद्रित असतील तरी हे लक्षात घेणे गरजेचे आहे की यात क्वीअर व्यक्ती नेहमीच स्वागतार्ह नसतात. अशा सणांचा हिस्सा होण्यासाठी क्वीअर व्यक्तींना जे अडथळे येतात त्यावर लक्ष केंद्रित करा.
  - या सणांमध्ये क्वीअर व्यक्तीं बद्दल बातमी करताना त्यांच्या मर्यादा लक्षात घ्या आणि त्यांच्या खाजगी आयुष्यात जास्त लक्ष केंद्रित करू नका.
- **मुख्य प्रवाहात होणाऱ्या समारंभांमध्ये क्वीअर व्यक्तींच्या प्रतिनिधित्त्वाबद्दल:** समाजातील मोठ्या प्रमाणातील लोकांसाठी जर कुठल्या मुद्द्यावर बातमी बनवत असाल तर एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि परिघाबाहेर असणारे इतर समूह हे ही समाजाचा तेवढाच हिस्सा आहेत हे लक्षात ठेवावे. जसे की, जर एखाद्या धोरणाविरुद्ध देशभर निषेध होत असेल तर बातमी करताना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीचे पण मत घ्या.
  - जर एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती यामध्ये काही सादर करत असेल तर त्यांच्या कामावरती लक्ष केंद्रित करा ना की त्यांच्या एलजीबीटीक्युआयए+ असण्याच्या ओळखीवर.
  - आयोजकांशी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना सादर करायला आणि/किंवा दर्शक म्हणून सामीलकरून घेण्यासाठी काय गोष्टी लक्षात घेतल्या गेल्या आहेत यावर चर्चा करा.



## बातम्या आणि चालू घडामोडी

***या** भागात बातम्या करताना वापरली जाणारी भाषा, रिपोर्ट मध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा उल्लेख करणे, नेहमी बातम्या करताना येणारे अडथळे आणि बातम्या करण्याची योग्य पद्धत ज्यात एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, समुदाय किंवा प्रश्न सामील असतील या बद्दल माहिती दिलेली आहे.*

- सर्वसामान्य जनतेवर जे मुद्दे खूप परिणाम करतात त्या परिणाम होणाऱ्यांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा आणि समुदायांचा ही समावेश आहे. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती ह्या सर्वसामान्य जनतेचा एक हिस्सा आहेत. एक सर्वसामान्य विषयावरील बातमी करताना ती एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींवर कसा परिणाम करत आहे याची सुद्धा दखल घ्या आणि रिपोर्टिंग करताना विविध मतं सामावून घेण्याचा प्रयत्न करा.
    - जसे की, शहरात जर पूर आला असेल तर एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीं वर या गोष्टीचा सामान्यपणे सुद्धा आणि ठराविक पद्धतीने परिणाम होतो. पूरग्रस्तांसाठी दिलेल्या राहायच्या जागी कोणत्याही लिंगभावाच्या व्यक्तीसाठी वापरता येईल अशी प्रसाधन गृहे आहेत का? पुनर्वसनाच्या संबंधित योजनेमध्ये क्वीअर व्यक्तींसोबत भेदभाव होत आहे का? यामध्ये क्वीअर व्यक्तीकडे असणारे नेतृत्व आणि प्रतिनिधित्व याबद्दल सुद्धा पहावे- बचाव आणि मदत कामात क्वीअर व्यक्तींचा किती हिस्सा आहे? ज्या समूहाचा ते हिस्सा आहेत त्यांना मदत पोहोचवण्यासाठी कसे संघटीत होत आहे?
- बातमी करताना ही गोष्ट लक्षात घ्या की सरकारच्या सर्वसामान्यांसाठी असणाऱ्या धोरणांचा परिणाम वंचित आणि अल्पसंख्यांक समुहांवर होतो. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींशी आणि समूहाचे नेतृत्व करणाऱ्यांशी बोलून त्यांच्यावर होणारा परिणाम समजून घेऊन तो निर्देशनास आणा.
    - उदा. नोटबंदीचे परिणाम संपूर्ण देशावर झाले होते. पण वंचित समूहांवर याचा परिणाम एक विशिष्ट पद्धतीने झाला कारण त्यांच्या ओळखीमुळे अनेक आर्थिक प्रणाली पासून त्यांना दूर ठेवलं गेलं. पारलिंगी समुदाय यामध्ये काय मार्ग काढत आहेत हे पत्रकारांनी विचारले पाहिजे.
- एलजीबीटीक्युआयए+ प्रश्नांवर काम करताना, पत्रकारांनी त्यांचे चुकीचे समज बातमीमध्ये येऊ नये आणि क्लिकबेट करीता बातमी वाढवून चढवून सांगत नाही ना याची काळजी घ्यावी. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना जे सामाजिक आणि

कायद्याकडून असणारे धोके आहेत ते पत्रकारांनी लक्षात घेऊन मुलाखत देणाऱ्यांना कोणत्याही छळाला सामोरे जावे लागणार नाही यासाठी योग्य ती काळजी घ्यावी.

    - उदा. सर्वांना माहिती असणाऱ्या एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीच्या मृत्यू बद्दल जर बातमी करत असाल तर आजूबाजूला चालू असणाऱ्या काहीही तथ्य नसणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवून मृत्यूचे कारण काय असेल याचा अंदाज लावत बसू नका. ह्या गोष्टी जशा प्रसिद्ध व्यक्तीच्या बाबत आणि काही सनसनाटी गुन्ह्यांच्या बाबतही लागू होतात. क्वीअर व्यक्तींना एखाद्याचे मनोरंजन होईल म्हणून जाणून बुजून दाखवणे पत्रकारांनी टाळलं पाहिजे.
    - अजून एक उदा. एखाद्या समलिंगी पुरुषाला डेटिंग अँप्स वर होणाऱ्या फसवणुकीला किंवा जबरदस्तीला सामोरे जावे लागले या बद्दल तुम्ही बातमी करत असाल तर समलिंगी पुरुषांमधील डेटिंग कल्चर च्या पद्धती किंवा ही अँप्सच्या वापराबद्दल काही तर्क बांधू नका. या गोष्टींबद्दल जाणून घेण्याची गरज जर बातमी साठी हवीच असेल तर एक दोन जणांच्या अकाऊंट वरून समजून घेण्यापेक्षा वेगळया वेगळया लोकांशी बोलून ते ठरवा.
    - अजून एक उदा. एखादे सरकारी धोरण ज्याचा परिणाम खूप लोकांवर होत आहे, त्यासाठी होणाऱ्या निषेध मोर्च्यांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती सुद्धा असणार असतील तर. त्यांच्या सहमती शिवाय क्वीअर ओळखीबद्दल तुमच्या बातमी मध्ये लिहू नका.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीं बद्दल असणाऱ्या द्वेषातून किंवा भेदभावातून काही गुन्हा घडला आहे, याबद्दल बातमी लिहिताना पत्रकारांनी घडलेल्या घटना अमान्य आहे हे स्पष्ट करण्यासाठी योग्य त्या शब्दात वर्णन करावे. जसे तुम्ही चोरी, खून किंवा लैंगिक हिंसाचार या गुन्ह्यांमध्ये 'दोन्ही बाजू' घेण्याचा प्रयत्न करत नाहीत तसेच इथे ही करू नका.
    - उदा. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीवर त्यांच्या लैंगिक अभिव्यक्तिमुळे एखाद्या अनोळखी व्यक्तीने सार्वजनिक जागी हल्ला केला आहे, याची बातमी करताना हल्ला का केला ह्या कारणांचे स्पष्टीकरण देऊ नका. या ऐवजी हल्ला झालेल्या व्यक्तीची प्रतिक्रिया लिहा आणि नक्की कसा झाला ह्या बद्दल लिहा. "हल्ला झालेल्या व्यक्तीच्या कपड्यांमुळे आणि मेकअप मुळे झाला" असे लिहू नका. एलजीबीटीक्युआयए+ समुदायावर याचे काय परिणाम होतात यावर जोर द्या आणि या गोष्टींना विरोध दर्शवणाऱ्या समुदायातील प्रमुख व्यक्तींशी बोला.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या बातमीमध्ये उल्लेख करताना त्यांची ओळख आणि अनुभवांचा आदर करा. त्यांची ओळख चुकीची आहे किंवा समाजमान्य नाही असे दाखवणारी भाषा वापरू नका आणि योग्य नाव, सर्वनाम वापरा.
    - उदा. तुम्ही एखाद्या नॉन बायनरी व्यक्तीची मुलाखत घेत आहात, जे अर्थव्यवस्था या विषयात तज्ञ आहेत. अशा वेळी त्यांचा असणारा अनुभव यावर लक्ष द्या आणि त्यांनी दिलेलं नाव आणि सर्वनाम वापरा. तुम्हाला विनाकारण त्यांच्या ओळखीवर अवाजवी लक्ष देण्याची गरज नाही.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती या काही एकसंध समूह नाहीत आणि त्यांचे विचार आणि मतं एकामेकांपासून बरीच वेगळी असू शकतात. वेगळया वेगळया वयाचे, जातीचे, वर्गाचे आणि लिंगभाव असणारे व्यक्ती आणि त्यांचे आवाज सामील करून घेण्याचा पत्राकारांनी प्रयत्न केला पाहिजे.
    - उदा. जर शैक्षणिक धोरण या बद्दल तुम्ही बातमी बनवत असाल तर एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती जे त्यांच्या वेगळ्या क्वीअर ओळखीमुळे आणि जातीमुळे वंचित आहेत त्यांच्याशी बोला. त्यांचा अनुभव हा बाकी विशेषआधिकार असणाऱ्या किंवा वयाने मोठ्या आणि आता शिक्षण घेत नसणाऱ्या क्वीअर व्यक्तीच्या अनुभवापेक्षा वेगळा असेल.

# आरोग्य पत्रकारिता - क्वीअर व्यक्तींच्या आरोग्या बाबत होणारी हानिकारक वक्तव्य टाळण्यासाठी काही गोष्टी नव्याने शिकणे

**आजीफा फातिमा**

सर्वसामान्य लोकांच्या विचारात आणि प्रसिद्ध मीडिया मध्ये क्वीअर ओळखींना आणि लोकांना आरोग्याबद्दल असणारी भीती आणि नैतिकतेमधून येणारी मानसिक आरोग्याबद्दलची भीती या गोष्टींना एकमेकांपासून वेगळे करणे अवघड आहे. तरीपण पत्रकार म्हणून भीतीदायक आणि क्लिक बेट साठी न लिहिता भावना जाणून घेऊन प्रामाणिक बातमी लिहिणे हे महत्वाचे आहे.

समाजातील बाकीच्या घटकांप्रमाणेच एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना पण आरोग्याबद्दल चिंता असते. डॉक्टर आणि आरोग्य सेवा पुरवणाऱ्या लोकांसोबत क्वीअर व्यक्तींचा संपर्क हा त्यांच्या क्वीअर असल्याने येणाऱ्या काही गरजांमुळे होतो. क्वीअर व्यक्ती, विशेषतः पारलिंगी ओळखी बद्दल रूढ असणाऱ्या समजांचा मोठा हिस्सा हा काळाच्या मागे पडलेल्या आणि अंधविश्वासाने भरलेल्या अवैज्ञानिक निकषातून बनलेला आहे. पत्रकार म्हणून हा समज कुठून येत आहे हे समजून घेऊन, वाचणाऱ्यांना खऱ्या आणि संवेदनशील बातम्या सांगितल्या पाहिजेत.

लिंगभाव निश्चिती प्रक्रिया किंवा पारलिंगी व्यक्तींसाठी इतर वैद्यकीय क्रिया, किंवा क्वीअर व्यक्तींनी एचआयव्ही/एड्स बद्दल घ्यायची काळजी या बद्दल बातमी आहे. अशावेळी चुकीची माहिती आणि गैरसमज जे सोशल मीडिया वर फिरतात त्यावर बोलण्यासाठी पात्र असणारी आणि क्वीअर लोकांना समजून घेणारी व्यक्ती असणे गरजेचे आहे. वैद्यकीय क्षेत्रात अनेक एलजीबीटीक्युआयए+ लोक आहेत जे चांगल्या आणि योग्य रीतीने माहिती सांगू शकतात. त्यांची मतं जिथे जिथे शक्य होईल तिथे अधोरेखित करणे महत्वाचे आहे.

## एचआयव्ही/एड्स बद्दल लिहिताना

एचआयव्ही/एड्स बद्दल लिहिताना दोन महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे. पहिली म्हणजे आपण १९८० पासून बरेच पुढे आलो आहोत आणि आता एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्ती एक आरोग्यदायी जीवन जगू शकते हे माहिती असावे.

२०१२ मध्ये, युनायटेड स्टेट्स अन्न आणि औषध प्रशासन (USFDA) ने एम्ट्रिसिटाबाईन आणि टेनोफोव्हिर डिसोप्रॉक्सिल फ्युमरेटचे संयोजन प्री-एक्सपोजर प्रोफिलॅक्सिस (PrEP) औषधे म्हणून एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तींसाठी वापरण्यास मंजुरी दिली आहे. यानंतर चार वर्षांनी २०१६ मध्ये ड्रग्ज कंट्रोलर जनरल ऑफ इंडिया (DCGI) ने हे भारतात PrEP म्हणून वापरण्यास मान्यता दिली आहे. PrEP हे एचआयव्ही होण्याचा धोका कमी करण्यासाठी वापरण्यात येणारे अँटीरेट्रोव्हायरल औषध आहे. PrEP चे नियमित सेवन इतर सुरक्षित पद्धतींसह, उच्च जोखमीच्या वर्गात एचआयव्हीचा धोका लक्षणीयरीत्या कमी करण्यासाठी सिद्ध झाले आहे. हा एक प्रतिबंधात्मक उपाय आहे तरी ज्या लोकांची एचआयव्ही ची चाचणी पॉझिटिव्ह येते आणि अँटीरेट्रोव्हायरल थेरेपी सांगितली जाते ज्याने संसर्ग कमी होईल आणि सेक्स करताना सुद्धा एचआयव्ही संसर्ग होणार नाही. म्हणूनच हा आजार आता पूर्वी इतका भीतीदायक राहीला नाही.

एचआयव्ही/एड्स साठी काम करणाऱ्या लोकांकडून वापरले जाणाऱ्या संज्ञा खूप काळिमा फासणाऱ्या असतात. जिथे शक्य होईल तिथे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे म्हणणे ऐका आणि ते ज्या संज्ञा वापरतात त्या वापरा.

लक्षात घेण्यासारखी दुसरी गोष्ट म्हणजे 'MSM' ज्याचा अर्थ 'जे पुरुष पुरुषांसोबत लैंगिक संबंध ठेवतात' या शब्दाचा होणार वापर. १९८० च्या दशकात, जेव्हा यूएसने एचआयव्ही/एड्स प्रकरणे नोंदवण्यास सुरुवात केली, तेव्हा त्याला 'गे रीलेटेड ईम्युन डेफिश्यंसी (समलिंगी पुरुषांमध्ये असणारी रोगप्रतिकारक शक्तीची कमतरता) (GRID)' म्हटले गेले. कारण एचआयव्ही फक्त समलिंगी व्यक्तींना होतो असे वैद्यकीय समुदायाला वाटले. नंतर, असे आढळून आले की विरुद्धलिंगी संबंधातील महिला आणि व्यक्तींना देखील व्हायरसचा संसर्ग होऊ शकतो आणि तो गर्भधारणेद्वारे बाळाला सुद्धा संसर्ग होऊ शकतो.

'जे पुरुष पुरुषांसोबत लैंगिक संबंध ठेवतात' ही संज्ञा जवळपास १९८८ उदयास आली तर संक्षिप्त शब्द 'MSM' हा १९९४ मध्ये वापरात आला. हा संक्षिप्त शब्द व्यक्तीचा लैंगिक कल आणि लैंगिक क्रिया यांच्या मधला फरक सांगण्या साठी वापरला जातो असा वैद्यकीय समूहाचा दावा आहे. पण समुदायातील काही लोकांना हा शब्द अमानवी आणि अनादर करणारा वाटतो.

हे लक्षात घेणे देखील महत्त्वाचे आहे की आजपर्यंत एचआयव्ही प्रतिबंधक कार्यात सहभागी असलेले कामगार आणि अधिकारी 'एमएसएम' हा शब्द समलिंगी, उभयलिंगी व्यक्ती आणि अनेकांमध्ये पारलिंगी व्यक्तींचा संदर्भ देण्यासाठी काही वेळेला वापरतात. फक्त हीच लोकं अशा प्रकारच्या लैंगिक क्रिया करतात अशा चुकीच्या आणि कलंक लावणाऱ्या विचारातून तो येतो आणि हाच सामान्य लोकांचा समज आहे. म्हणून असे चुकीचे समज जे क्वीअर व्यक्तींच्या लैंगिक क्रियांवर लक्ष देतात आणि त्यांना माणूस म्हणून पाहत नाहीत, त्यांना पडताळून दुरुस्त करणे गरजेचे आहे. या पेक्षा त्यांच्या गरजा काय आहेत आणि त्या कोणत्या पद्धतीने सांगितल्या गेल्या पाहिजेत यावर जास्त लक्ष द्या.

विशेषकरून जेव्हा एचआयव्ही/एड्स बद्दल बातमी करताना आपण व्यक्तीची ओळख आणि त्याचे महत्व विचारात घेतले पाहिजे. भारतामध्ये एचआयव्ही रुग्णाची ओळख त्यांच्या संमती शिवाय सांगता येत नाही.

**ह्युमन इम्युनोडेफिशियन्सी व्हायरस आणि एक्वायर्ड इम्यून डेफिशियन्सी सिंड्रोम (प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, २०१७ (एचआयव्ही/एड्स कायदा)**

या कायद्यानुसार, एखाद्या व्यक्तीच्या एचआयव्ही आजाराची स्थिति रुग्णाच्या संमतीशिवाय कोणीही उघड करू शकत नाही, आरोग्यसेवा व्यावसायिक देखील नाही. कायदा स्पष्टपणे सांगतो की "डॉक्टर किंवा समुपदेशक वगळता कोणतीही आरोग्य सेवा देणारी व्यक्ती रुग्ण एचआयव्ही पॉझिटिव्ह आहे हे त्यांच्या जोडीदारासमोर उघड करणार नाही." विशिष्ट परिस्थितीतच अपवाद आहे. जसे की -

- जर एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तीच्या जोडीदाराला रुग्णाकडून एचआयव्ही पसरण्याचा धोका असेल
- जर रुग्णाला त्यांच्या जोडीदाराला कळवण्याचा सल्ला दिला गेला असेल
- जर हेल्थकेअर प्रदात्याला खात्री असेल की रुग्ण त्यांच्या जोडीदाराला माहिती देणार नाही
- जर रुग्णाला माहिती उघड करण्याबद्दल कळविले असेल

***म्हणून, पत्रकार या नात्याने, जर आपण आपल्या बातमी बनवण्याच्या काळात त्यांची एचआयव्ही स्थिती उघड केली तर तो गुन्हा आहे.***

## मानसिक आरोग्याबद्दल लिहिताना

मानसिक आरोग्याबद्दल लिहिताना बऱ्याच जणांच्या डोक्यात आत्महत्येबद्दल लिहिताना पाळायचे नियम येतात. तरी मानसिक आरोग्याबद्दल लिहिताना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना जे सामाजिक रचने मुळे दबावाला सामोरं जावं लागतं आणि त्यामुळे जे परिणाम होतात ते सुद्धा लिहिले पाहिजे.

मानसिक आरोग्याबद्दल लिहिताना दोन गोष्टी मुख्य आहेत- मानसिक त्रास जो लोकांना मुळात होत आहे, आणि कसे आरधकाऱ्ही क्वीअर असणे म्हणजे मानसिक आजार आहे समजून लोकांना 'बरे' करण्याचा प्रयत्न करते.

संपादन करताना किंवा बातमी करताना एक महत्वाची गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे- सगळ्या ओळखी या स्वतः ठरवलेल्या आहेत आणि यातल्या कोणत्याही मानसिक आजार नाहीत. व्यक्तीची लिंगभाव ओळख किंवा लिंगभाव अभिव्यक्ति ठरवण्यासाठी कोणत्याही चाचण्या नाहीत. व्यक्ती ओळख जी आणि जशी सांगत आहेत आपण त्यावर विश्वास ठेवला पाहिजे. जर कुणीही तज्ञ व्यक्ती जसे की डॉक्टर, मानसोपचार तज्ञ असे सांगत असतील की 'लहानपणी झालेल्या आघातां मुळे' व्यक्ती क्वीअर असते किंवा व्यक्ती समलिंगी ही 'लैंगिक हिंसेमुळे' आहे, किंवा 'समलिंगीपणा मी बरा केला आहे', तर आपल्याला माहिती हवे की हे सगळं खरं नाही. ते खोटं बोलत आहेत.

क्वीअर असणे हे व्यक्तीच्या विचारात आहे असं सांगणाऱ्या डॉक्टरला प्रसिद्ध मीडिया अशा जागा देतात, असे अनेक चित्रपट आणि भूमिका आहेत ज्या क्वीअर व्यक्तींना वाईट दाखवतात ज्यामुळे लोकांचं मत दूषित केलं जात, गैरसमज पसरविले जातात.

## डायग्नोस्टिक आणि स्टॅटिस्टिकल मॅन्युअल (DSM) कडून क्वीअरपणाचे अवर्गीकरण

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (WHO) मानसिक विकाराची व्याख्या खालीलप्रमाणे करते: "एखाद्या व्यक्तीच्या आकलन क्षमतेत, भावनिक नियंत्रण किंवा वागणूक या कशातही जर वैद्यकीय दृष्ट्या लक्षणीय बिघाड असेल तर त्याचे मानसिक विकार म्हणून वर्गीकरण होते." अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन (APA) मानसिक आजाराची व्याख्या याप्रमाणे करते: "अशी आरोग्याची स्थिती ज्यात भावना, विचार किंवा वागणूक (किंवा याच्यामध्ये एकत्र) यांच्या मध्ये बदल असतो".

अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशन आहे जी मानसिक विकारांचे डायग्नोस्टिक आणि स्टॅटिस्टिकल मॅन्युअल प्रकाशित करते - जे DSM म्हणून प्रसिद्ध आहे - जगातील अनेक भागात असणारे आरोग्य क्षेत्रातील व्यावसायिकांकडून या हँडबुक चा वापर केला जातो. काही वर्णने, लक्षणे आणि बाकी इतर घटकांवर आधारित, DSM अनेक मानसिक विकारांचे वर्गीकरण आणि निदान करते. १९५२ पासून, जेव्हा DSM-१ प्रकाशित केलं गेलं - त्यात समलैंगिकता 'मानसिक आजार' म्हणून यादीत होते. DSM-१ ने समलिंगी म्हणजे "समाजघातक व्यक्तिमत्व विकार" असं वर्णन केलं आहे. संपूर्ण तर्क या आधारावर होता की कोणतेही सेक्स ज्यातून पुनरुत्पादन होत नाही ते 'अनैसर्गिक' आहे.

१९६० पासून, एलजीबीटीक्युआयए+ कार्यकर्त्यांनी एपीएच्या वर्गीकरणाला विरोध करण्यास सुरुवात केली आणि

एपीएच्या भूमिकेला विरोध करणारे सेमिनार आणि कॉन्फरन्समध्ये भाग घेऊ लागले. एपीए अधिवेशनात

१९७२ मध्ये, डॉ जॉन फ्रायर - एक समलिंगी मानसोपचारतज्ज्ञ - एलजीबीटीक्युआयए+ समस्यांवर पहिल्यांदाच होणाऱ्या चर्चेत दिसले. ओळख लपवण्यासाठी मुखवटा घालणे आणि आवाज बदलेल असा मायक्रोफोन वापरून, डॉ फ्रायरने स्वतःला "डॉ. हेन्री अनामिक" म्हणून सादर केले आणि असे ठामपणे सांगितले की समलिंगी असणे आजार नाही.

१९७३ मध्ये, एपीएने डीएसएममध्ये समलैंगिकता असावी की नाही हे ठरवण्यासाठी सर्व अधिवेशन सदस्यांना मतदान करण्यास सांगितले. ५,८५४ मनोचिकित्सकांनी ते काढून टाकण्यासाठी आणि ३,८१० लोकांनी ते कायम ठेवण्यासाठी मतदान केले. अशारीतीने समलैंगिकतेला 'मानसिक आजार' म्हणून त्याचे अवर्गीकरण केले गेले. समलैंगिकतेला 'मानसिक आजार' यादीमधून वगळण्यात आले.

मात्र, तरीही १९८७ पर्यन्त डीएसएम मध्ये त्याला 'सेक्षुअल ओरियंटेशन डिस्टर्बंस' असे नमूद करण्यात आले होते.

डब्ल्यूएचओला १९९० मध्ये आंतरराष्ट्रीय रोगांचे वर्गीकरण (ICD) स्तरावरून समलैंगिकता काढून टाकण्यासाठी आणखी तीन वर्षे लागली. आणि २०१९ मध्ये डब्ल्यूएचओने 'पारलिंगी' म्हणजे एक "मानसिक विकार" म्हणून वर्गीकरण करणे बंद केले. ICD-11 च्या सुधारित आवृत्तीत "जेंडर आयडेंटिटी डिसॉरडर (लिंगभाव ओळख विकार)" ला "जेंडर इनकॉन्ग्रूएन्स (लिंगभाव विसंगती)" असा बदल केला गेला.

## आत्महत्येबद्दल लिहिताना

भारतात सार्वजनिक आरोग्य समस्येंपैकी आत्महत्या प्रतिबंधन ही एक प्रमुख समस्या आहे. डब्ल्यूएचओच्या मते, जागतिक स्तरावर दरवर्षी अंदाजे ८,००,००० आत्महत्या होतात आणि जागतिक स्तरावर आत्महत्येमुळे होणाऱ्या मृत्यू मध्ये भारताचा वाटा ३६.६% इतका आहे. आत्महत्या ही एक गुंतागुंतीची मानसिक, सांस्कृतिक आणि सामाजिक समस्या आहे ज्यामध्ये

कोणतेही विशिष्ट असे कारण आणि परिणाम करणारे घटक नाहीत. जोखीम/अतिसंवेदनशील घटक हे मानसिक आरोग्यापासून समस्या, आर्थिक भार, गरिबी, आघात, गैरवर्तन, बेरोजगारी, भेदभाव, भावनिक संकट, एखाद्याच्या जीवनातील संकट, दीर्घकालीन शारीरिक आजार, आधार नसणे, आरोग्यसेवा वापरण्यासाठी संधी नसणे इत्यादी असू शकतात.

जागतिक संशोधनानुसार, विशेषतः किशोरवयीन मुले आत्महत्येच्या विचारांना बळी पडतात - प्रामुख्याने समलिंगी पुरुष आणि स्त्रिया, उभयलिंगी आणि पारलिंगी तरुण. शाळेतील गुंडगिरी (रॅगिंग) वर झालेल्या अभ्यासानुसार असे आढळले की एलजीबीटीक्युआयए+ तरुणांमध्ये आत्महत्येचे वर्तन अधिक सामान्य असू शकते. याची कारणे लांच्छन, धमकी आणि वाळीत टाकण्यात येणं इत्यादी आहेत. दहा देशांतील अभ्यासाच्या मेटा-विश्लेषणात असे आढळून आले की एलजीबीटीक्युआयए+ तरुणांना त्यांच्या विरुद्धलिंगी समवयस्कांच्या तुलनेत आत्महत्येच्या प्रयत्नांचा धोका जास्त होता.

एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींमध्ये होणाऱ्या आत्महत्येचे खरे आकडे माहिती नाहीत कारण लैंगिक कल आणि लिंगभाव अभिव्यक्ति ही मृत्युपत्रात नोंदवली जात नाही. अनेक धोका वाढवणारे कारणे ही कलंक म्हणून एक समाजात जगायला लागल्यामुळे येणाऱ्या तणावातून तयार होतात असं अभ्यास दाखवून देतो.

प्रसारमाध्यमे ही व्यक्ती आणि समुदायांच्या वृत्ती, विश्वास आणि मूल्ये यावर खूप प्रभाव पाडत असल्याने आत्महत्येच्या प्रतिबंधात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. उदाहरणार्थ, आत्महत्या या विषयाला संवेदनशीलतेने हाताळणे ही आत्महत्या रोखण्यासाठी सगळ्या धोरणांपैकी एक प्रभावी धोरण आहे. सकारात्मक आणि जबाबदारीने बातमी करणे हे मदत शोधण्यासाठी प्रोत्साहन देते आणि आत्महत्या प्रतिबंधाबाबत जागरूकता वाढवते. त्याच वेळी, बेजबाबदार रिपोर्टिंग मुळे अनेक लोकं या आत्मघाती कृतीचं अनुकरण करू शकतात. एखादी खचलेली व्यक्ती जर कथा/अहवाल मध्ये दाखवलेल्या व्यक्तीशी स्वतः ला समान पाहत असेल तर त्यांच्या आत्मघातकी वर्तनाची 'कॉपी' किंवा 'अनुकरण' करू शकतात आणि शेवटी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करू शकतात.

मानसिक आरोग्य सेवा कायदा, २०१७ सांगतो की आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला ती व्यक्ती गंभीर तणावाखाली आहे असे गृहीत धरले जाईल आणि भारतीय दंड संहिता (IPC) च्या कलम ३०९,१८६० (जे आत्महत्येचा प्रयत्न गुन्हा ठरवते) अंतर्गत खटला चालवला जाणार नाही,

गंभीर तणावाखाली असलेल्या आणि आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीला आत्महत्या प्रयत्नांच्या पुनरावृत्तीचा धोका कमी करण्यासाठी काळजी, उपचार आणि पुनर्वसन देणे हे केंद्र किंवा राज्य सरकारचे कर्तव्य आहे.

भारतातील एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आत्महत्येच्या अहवाल विश्लेषणातून असे दिसून आले आहे की बहुतांश बातम्यांच्या अहवालांमध्ये लिंगभाव (९३.३%), आत्महत्येचे कारण (७३.३%) आणि जीवनातील घटना (६०.७%) यावर बातमीच्या शीर्षकात चर्चा केली आहे. बहुतेक अहवालांमध्ये व्यक्तीचे नाव, वय, लिंग, व्यवसाय, आत्महत्येची पद्धत, आत्महत्येचे स्थान आणि जीवनातील घटना याचा उल्लेख होता. आत्महत्येचे सविस्तर टप्पे याचे २३% अहवालांमध्ये वर्णन होते, तर २०% आणि २८.२% मध्ये आत्महत्या करार आणि सुसाइड नोट्सचा उल्लेख करण्यात आला आहे. याच्या तुलनेने काही बातम्यांच्या अहवालांमध्ये (<२०%) उपयुक्त अहवाल समाविष्ट आहेत. वैशिष्ट्ये इंग्रजी आणि स्थानिक भाषेतील अहवालांमध्ये, आत्महत्यांच्या अहवालासाठी डब्ल्यूएचओच्या माध्यम मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याच्या दृष्टीने स्थानिक अहवाल खूपच वाईट होते. स्थानिक भाषा अहवालात आत्महत्या-संबंधित आकडेवारी, आत्महत्येचे प्रतिबंध किंवा संपर्क तपशीलांवर चर्चा केली आहे, आत्महत्या करणाऱ्याला आधार देणाऱ्या सेवा याबद्दल काहीही लिहिलेले नाही.



# आरोग्य

*हे प्रकरण एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि समुदायांसाठी असलेल्या आरोग्य सेवेविषयक बातमी देणे आणि लिखाणाशी संबंधित आहे ज्यात लिंगभाव निश्चिती प्रक्रिया, एचआयव्ही/ एड्स इत्यादी चा समावेश होतो.*

एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आरोग्याशी निगडीत रिपोर्टींग करताना लिंगभाव निश्चिती शास्त्रक्रिये संबंधित गोष्टींवर अधिकांश भर दिला जातो. अयशस्वी शास्त्रक्रियेबद्दल लिहिणे आणि चर्चा करणे जरी महत्वाचे असले तरी एकूणच आरोग्यसेवेचे पर्याय, तयार केलेली आणि अंमलात आणलेली धोरणे तसेच समुदायाच्या सदस्यांच्या गरजांवर बोलणे तेवढेच आवश्यक आहे. जी भाषा संबंधित व्यक्ती/ व्यक्तींना योग्य आणि सोयीची असेल आपण त्या भाषेत बातमी करणे आणि लिहिणे आवश्यक आहे. एलजीबीटीक्युआयए+ समुदायासंबंधित आरोग्य विषयी बातम्या लिहिताना/ संपादित करताना लक्षात ठेवायचे काही महत्वाचे मुद्दे:

- समोरच्या व्यक्तीला पीडिता सारखे किंवा त्या विषयाबद्दल अज्ञानी असल्याचे समजू नये. जगलेले अनुभव हे ग्राह्य असतात आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना त्यांच्या आरोग्याविषयी संशोधन करण्यासाठी बराच वेळ आणि शक्ती घालवावी लागते कारण आरोग्यसेवेतील व्यावसायिकांना क्वीअर व्यक्तींच्या शरीरावर उपचार करण्याबद्दल खूप कमी ज्ञान आणि अनुभव असतो हे पत्रकारांना लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आरोग्यविषयक समस्यांबाबत आणि आरोग्यसेवांच्या उपलब्धतेबाबत रिपोर्टींग करताना पत्रकारांना अशी माहिती मिळू शकते जी त्यांना या आधी माहीत नव्हती, या विषयावर कसे लिहायचे याबद्दल तुम्हाला प्रश्न असू शकतात. अश्या परिस्थितीत थोडे थांबून, लिहिण्याआधी त्या विषयाबद्दल तुम्ही समजून घेऊ शकता, तुमच्या सोर्स आणि तज्ज्ञांकडून त्याचे स्पष्टीकरण घेऊ शकता. परंतु कोणाच्याही गोपनीयतेचा भंग न करता आदरपूर्वक प्रश्न विचारणे हे सर्वात महत्वाचे आहे.

    - एक लक्षात घेणे महत्वाचे आहे की हे प्रश्न तुम्ही करत असलेल्या बातमीविषयी निगडीत असावेत आणि सामान्य लोकांच्या क्वीअर व्यक्ती बद्दलच्या किंवा त्यांच्या वैयक्तिक नात्यांबद्दल नसावेत. कधीही खाजगी प्रश्न विचारु नयेत जे वैयक्तिकरित्या तुम्हाला देखील कुणी विचारलेले आवडणार नाहीत.

    - उदा. तुमच्या सोर्स ना त्यांच्या लैंगिक अवयवांबद्दल प्रश्न विचारू नयेत. जर एखाद्या सिसजेंडर स्त्रीला विचारलेला प्रश्न खाजगी आणि असंवेदनशील वाटत असेल तर तो एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठीसुद्धा खूप खाजगी आणि असंवेदनशील आहे.

- तुम्ही ज्या सीमांमध्ये काम करत आहेत त्याची जाणीव ठेवा. जर असे काही विषय असतील ज्यावर तुमच्या सोर्स ला बोलायचे नसेल तर ते त्यांना आधीच विचारून त्यांच्या सीमांचा आदर करावा. जर ते बोलायचे थांबले किंवा ते बोलू इच्छित नसल्याची चिन्ह दिसली तर सक्ती करू नये. आपले अनुभव सांगणाऱ्या व्यक्तीला संवादामध्ये पुढाकार घेऊ द्यावा.
    - उदा. जर तुम्ही एका पारलिंगी व्यक्तीसोबत त्यांच्या शस्त्रक्रियेतील निष्काळजीपणा किंवा निकृष्ट आरोग्य सेवे विषयीच्या अनुभवांबद्दल बोलत असाल तर त्यांना ओपन एन्डेड प्रश्न विचारा आणि तुमच्या मधील संवादामध्ये पुढाकार घेऊ द्या. जर त्या व्यक्तीला शस्त्रक्रिये नंतर आलेल्या अडचणी बद्दल तपशिलात बोलायचे नसेल तर त्यांना सक्ती न करता, त्यांना काय बोलायचे आहे आणि काय नाही याची निवड त्यांनाच करू द्यावी.
- वैयक्तिक माहिती तपशिलात लिहिताना त्या व्यक्तीची संमती घ्यावी.
    - उदा. एखादी व्यक्ती त्यांच्या व्यक्तिगत वैद्यकीय तपासणी बद्दलचा अनुभव पत्रकाराला परिस्थितीचा अंदाज देण्यासाठी सांगू शकते परंतु ती माहिती तेवढ्या तपशिलात उघड करू/ प्रकाशित करू इच्छित नसतील. प्रकाशनापूर्वी तुम्ही तुमच्या सोर्स बद्दल जे लिहीत आहात ते त्यांच्याकडून नेहमी तपासून घ्या.
- आरोग्य समस्यांबद्दल रिपोर्टींग करताना व्यक्तीच्या शरीर किंवा लैंगिक अवयवांच्या ग्राफिक प्रतिमा प्रकाशित करणे टाळा.
- वैद्यकीय छळ किंवा गैरवर्तनाची घटना नोंदवताना पत्रकारांनी संतुलन राखण्यासाठी सोर्स कडून अचूक माहिती घेतल्यावर त्यांना कुठल्याही प्रकारे हानी पोहचणार नाही याची दक्षता घ्या. बचावलेल्या व्यक्तींना असेच तपशील विचारण्याचा प्रयत्न करा जे त्यांना अस्वस्थ करणार नाहीत. आणि तुम्हाला मुलाखत देणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या शब्दांवर विचार करायला वेळ आणि जागा द्यावी. जर वैद्यकीय प्रक्रिया शस्त्रक्रिया आणि आरोग्यस्थिती चे तपशील कथेमध्ये महत्वाचे नसेल तर ते सांगण्याची सक्ती क्वीअर व्यक्तींना करू नये.
- कधीही व्यक्तीचे लिंगभाव चुकीचे समजून किंवा गृहित धरून उल्लेख करू नये. हा नियम जरी ढोबळमानाने सर्व ठिकाणी लागू होत असला तरी आरोग्याविषयी रिपोर्टिंग करताना हे लक्षात ठेवणे खूप महत्वाचे आहे.
    - उदा. जेव्हा तुम्ही एखाद्या पारलिंगी पुरुषाच्या लिंगभाव निश्चिती प्रक्रिये बद्दल रिपोर्टिंग करत असाल, तेव्हा "ती पारलिंगी पुरुष बनण्यासाठी शस्त्रक्रिया करत आहे" असे म्हणू नये.
        - टिप: एखाद्या व्यक्तीने कितीही वैद्यकीय प्रक्रिया किंवा शस्त्रक्रिया केल्या असल्या किंवा नसल्या तरीही जर ते स्वतःला पारलिंगी व्यक्ती म्हणून ओळखत असतील तर त्यांना तसेच संबोधले पाहिजे. २०१४ मध्ये नालसा (NALSA) विरुद्ध भारत सरकार (NALSA Vs Union of India) या केस मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने व्यक्तींना त्यांचे लिंगभाव ठरवण्याचा अधिकार कायम ठेवला आहे. "X ही व्यक्ती लवकरच पारलिंगी पुरुष बनणार आहे" किंवा "Y ही व्यक्ती पारलिंगी स्त्री बनणार आहे" असे म्हणू नये.
    - लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया ही फक्त वैद्यकीय प्रक्रियेचा एक भाग आहे हे लक्षात ठेवावे. आरोग्यविषयक कथा नोंदवताना ते निश्चित करू नका.
- कोणत्याही व्यक्तीचे सर्वनाम एकेरी किंवा दुहेरी अवतरण मध्ये वापरू नये. उदाहरण- "X व्यक्ती, जैविकदृष्ट्या स्त्री, पारलिंगी पुरुष बनण्याच्या प्रक्रिये मधून जात होते, आणि 'त्याने' गरोदर झाल्यावर 'त्याची' प्रक्रिया थांबवली." असे लिहू नये.

- कोणत्याही आरोग्य संबंधित समस्यांवर रिपोर्टींग करताना, जसे की नको असलेल्या किंवा चुकीच्या पद्धतीने झालेल्या शस्त्रक्रिया किंवा वैद्यकीय उपचारांमुळे झालेले मृत्युंबद्दलच्या तक्रारींमध्ये फक्त वैद्यकीय व्यावसायिकांचे म्हणणे पुढे न्यायचे टाळून समुदायातील लोक आणि परिवार/मित्र यांच्यासोबत बोलणे देखील महत्वाचे आहे. जर गरज पडल्यास अशा वैद्यकीय व्यावसायिकांना शोधा आणि त्यांचे मत विचारा जे स्वतः एलजीबीटीक्युआयए+ म्हणून स्वतःला ओळखतात. डॉक्टर वैद्यकीय समस्येबद्दल अधिक चांगले समजावू शकतात हे जरी खरे असले तरी जी व्यक्ती ज्या समुदायात राहिली आहे त्यांना नक्की काय झाले माहित असते आणि ते आपल्याला वैद्यकीय हस्तक्षेपाआधी त्या व्यक्तीच्या जगाची कल्पना देऊ शकतात.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दल बोलण्यासाठी तज्ञांची निवड करताना तुम्ही समुदायातील सदस्यांना विश्वसनीय तज्ञांबद्दल विचारू शकता. कोणताही आरोग्यसेवा व्यावसायिक तज्ञ असल्याचा दावा करू शकतो किंवा तज्ज्ञ असू शकतो पण ते समुदायाशी जोडलेले असतीलच असे नाही. म्हणून तुम्ही अश्या तज्ञांची निवड केली पाहिजे जे ग्राउंड वर काम करतात, यासाठी समुदाय सदस्यांपासून मार्गदर्शन घेतले जाऊ शकते.

  - एखादा समलैंगिक पुरुष जो त्या समाजामध्ये तज्ज्ञ मानला जात असेल पण त्याचे पारलिंगी समुदायाबद्दल मत संशयास्पद/समस्याप्रधान असू शकतात.

  - दुसरे उदाहरण, जेव्हा तुम्ही वैद्यकीय व्यावसायिकांशी बोलता तेव्हा तुम्हाला लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया करण्यात तज्ञ असणारे किंवा स्वतःला तज्ञ मानणारे डॉक्टर शोधणे सोपे वाटते पण समुदायाचे सदस्य अनेक कारणांमुळे कदाचित त्या डॉक्टरला पसंत करणार नाहीत. तज्ञ असण्यासोबतच डॉक्टरांनी समुदायातील सदस्यांसोबत संपर्कात असले पाहिजे.

- एचआयव्ही, मंकीपॉक्स सारखे लैंगिक संपर्काद्वारे पसरणाऱ्या रोगाविषयी रिपोर्टिंग करताना एलजीबीटीक्युआयए+ समुदायाला कलंकित करणे टाळा. एचआयव्हीशी जोडलेला बराच वैद्यकीय इतिहास समलैंगिक पुरुषाच्या समुदायाला दोष देतो आणि संसर्गजन्य आजारांशी संबंधित अनेक चुकीच्या समजुती आहेत. यासाठी एचआयव्ही वर वार्तांकन करताना विशेष काळजी घेणं गरजेचं आहे.

- समुदायातील सदस्यांच्या पसंतीची भाषा वापरा आणि व्यक्तींचे वैद्यकीयीकरण टाळा. इथे देखील वापरलेले बरेचसे शब्द हे एचआयव्ही/एड्स च्या इतिहासातील आहेत. (हे पहा: ‘आरोग्य पत्रकारिता - क्वीअर व्यक्तींच्या आरोग्या बाबत होणारी हानिकारक वक्तव्य टाळण्यासाठी काही गोष्टी नव्याने शिकणे’ हे प्रकरण पहावे.)



## मानसिक आरोग्य आणि आत्महत्या

*हे प्रकरण मानसिक आरोग्य आणि आजार, आत्महत्या आणि पारलिंगी आणि द्विलिंगी व्यक्तींच्या मानसिक आरोग्याशी निगडीत असणाऱ्या गरजा ज्या लिंगभाव निश्चिती प्रक्रियेसाठी पाळणे अपेक्षित आहे याबद्दल आहे.*

- आत्महत्यांचे रिपोर्टींग करताना ते एका विशिष्ट कारणापुरते मर्यादित करू नये. त्याऐवजी तुम्ही ते विस्तृत करून, व्यवस्था समुदायांशी कसे वागते आणि वर्षानुवर्षे त्यांना कसे त्रास देते हे पाहू शकता. बहुसंख्य आत्महत्या ह्या एकाच कारणामुळे होत नाहीत ही सर्वमान्य वस्तुस्थिती आहे, पत्रकारांनी व्यक्तीच्या आत्महत्येच्या निर्णयामागील विविध कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. समाज आणि व्यवस्थेमध्ये काय बदल करता येईल जेणेकरून असे मृत्यू टाळता येतील आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आयुष्यातले ताणतणाव कसे दूर करावेत हे प्रश्न विचारणे गरजेचे आहे.
    - उदा. "एका पारलिंगी स्त्री ने तिच्या प्रियकराने फसवणूक केल्यानंतर X या ठिकाणी आत्महत्या केली" किंवा "जोडीदार/ कुटुंबाशी भांडण झाल्यानंतर एक क्वीअर व्यक्ती मृत अवस्थेत सापडली" असे म्हणू नये. हे आत्महत्येचे कारण त्यांच्या मृत्यूच्या पहिले घडलेल्या घटनेपुरते मर्यादित करते. जरी ही त्यांना निर्णय घेण्यास कारणीभूत ठरू शकते, तरी त्यामागे भेदभाव, कुटुंबीयांचा आधार नसणे, छळ अशी बरीच कारणे असू शकतात जी त्यांच्या मनात तणाव निर्माण करायला कारणीभूत असेल.
- क्वीअरनेस आणि मानसिक आजाराबद्दल असलेल्या गोंधळ आणि गैरसमज ठिकवून ठेवायला ऐतिहासिकदृष्ट्या आरोग्य व्यावसायिकांची क्वीअरनेस बद्दल ची संकुचित समज ही कारणीभूत आहे. याच आधारावर एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना अनेकदा कन्व्हर्जन थेरपी (लिंग, लिंगभाव किंवा लैंगिकता बदलण्याची उपचार प्रक्रिया) सारख्या प्रक्रियेला बळी पडावे लागत. कन्व्हर्जन थेरपी हानिकारक आणि अज्ञानावर आधारित प्रथा आहे जी प्रार्थना, भूतबाधा, हिंसाचार, मूलभूत गरजांपासून व्यक्तीला वंचित ठेवणे, आणि काहीवेळा लैंगिक हिंसेसह अनेक पद्धतींद्वारे व्यक्तीचा क्वीअरनेस दाबण्याचा प्रयत्न करते.

कन्व्हर्जन थेरपी बद्दल बातम्या करताना अनेक दशकांपासून एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या शरीराचे आणि मनाचे वैद्यकीयीकरण कसे केले गेले याचा इतिहास समजून घेणे महत्वाचे आहे . कन्व्हर्जन थेरपी चा उद्देश जरी एखाद्या व्यक्तीच्या क्वीअरनेस वर 'उपचार' करणे असला तरी ती संबंधित व्यक्तीला असह्य भावनिक आणि मानसिक अस्वस्थेमधून जाण्यास

भाग पाडते. यामुळे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यातील घटनांविषयी बोलताना काळजी आणि संवेदनशीलतेचे पालन करणे गरजेचे आहे.

- उदाहरणार्थ, "X ह्या क्वीअर व्यक्तीवर कन्व्हर्जन थेरपी वापरून उपचार करण्यासाठी त्यांना डॉक्टरकडे नेण्यात आले" असे म्हणू नये. हे मान्यतादर्शक वाक्य आहे. असे वापरल्याने कन्व्हर्जन थेरपी ही कथित नसून योग्य उपचार पद्धती आहे असा समज बनतो. त्या ऐवजी आपण तथाकथित हा शब्द किंवा एकेरी अवतरण चिन्ह वापरू शकतो. ("X ह्या व्यक्तीला 'उपचार' करण्यासाठी 'कन्व्हर्जन थेरपी' साठी नेण्यात आले.")

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दल मानसिक आरोग्य समस्यांचा धोका दर्शवणारी कोणतीही आकडेवारी किंवा डेटा पाहताना हे लक्षात ठेवा की ह्या समस्या केवळ वैयक्तिक समस्यांमुळेच उद्भवत नाहीत परंतु त्यामागे अनेक गुंतागुंतीची कारणे आहेत जसे की पिढ्यांपिढ्यांचा आघात, समाजात त्यांना कलंक समजले जाणे, त्यांची ओळख पुसून टाकण्याचा प्रयत्न, समुदायाला लक्ष करून केलेली हिंसा, आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे उद्भवणाऱ्या समस्या. त्यामुळे मानसिक आरोग्य सेवा व्यवस्था आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठी उपलब्ध सुविधांचा विचार करणे महत्वाचे आहे. सोबतच योगदान देणारे इतर प्रतिकूल घटक आणि ते कसे कमी करता येतील यावर लक्ष देणे देखील महत्वाचे आहे.

- रिपोर्टिंग दरम्यान मानसिक आरोग्य व्यवसायिकांसोबत बोलताना दोन गोष्टी लक्षात ठेवणे गरजेच्या आहे, पहिले, सर्व मानसिक आरोग्य व्यावसायिक त्यांच्या क्लायंट बद्दल कायदेशीररित्या माहिती न देण्यास बांधील आहेत त्यामुळे तुम्हाला काही तपशील मिळू शकत नसेल तर त्याचा अर्थ ते गोपनीय आहेत, त्यामुळे तुमच्या स्टोरीसाठी त्याची गरज आहे की नाही यावर पुनर्विचार करणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट, मानसिक आरोग्य व्यावसायिकाने दिलेला कुठलाही तपशील संबंधित व्यक्तीची संमती घेऊनच लिहावा किंवा प्रकाशित करावा. जर आपण विविध कारणामुळे त्यांची परवानगी नाही घेऊ शकलात, तर तुम्ही ते लिहिणे टाळले पाहिजे.

## आत्महत्या बद्दल बातमी करताना

- आत्महत्यांचे रिपोर्टींग करताना एकंदर दृष्टिकोन म्हणून आत्महत्या प्रतिबंधावर लक्ष केंद्रित करावे.
- बातमी  खळबळजनक न बनवता जशी तुम्ही क्वीअर नसलेल्या व्यक्तीबद्दल कराल तशी करावी.
- सनसनाटी बनवणारी, गोष्टींना रोजची आणि अतिशय सोपी करणारी भाषा वापरू नका. आत्महत्येच्या वार्तांकनामध्ये 'आत्महत्येची साथ', 'यशस्वी आत्महत्या', 'राजकीय आत्महत्या' असे खळबळजनक वाक्य प्रयोग करणे टाळा.
- बातमीचा किंवा स्टोरीचा लोकांवर होणाऱ्या परिणामाचे मूल्यांकन करा. (संभाव्य नुकसान किंवा सकारात्मक परिणाम)
- आत्महत्या संबंधित रिपोर्टिंग केल्याने आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या आणि वाचलेले, आत्महत्येचा प्रयत्न केलेले किंवा त्यामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातले सदस्य तसेच निवडलेले कुटुंब, मित्र, आणि एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील त्यांचे सहकारी अश्या व्यक्तींवर होणारा परिणाम विचारात घ्या.
- मृत्यू झालेल्या किंवा आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीचे नाव, फोटो, पत्र, चॅट्स, लैंगिक आणि लिंगभाव ओळख किंवा कुठलाही वैयक्तिक तपशील त्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य तसेच निवडलेले कुटुंब किंवा आत्महत्येचा प्रयत्न केलेल्या व्यक्तीच्या संमती शिवाय उघड करू नका.

आत्महत्येच्या विचारांवर मात करण्याबाबतच्या वैयक्तिक कथांवर लक्ष केंद्रित करा ज्यामुळे आशा वाढेल आणि जे इतरांना मदतीसाठी प्रोत्साहित करतील.

- प्रत्येक आत्महत्येच्या बातमीत गरजू व्यक्तीने मदत घेणे आवश्यक आहे अश्या संदेशासह मदत देणाऱ्या साधनांची माहिती उपलब्ध करून देणे खूप महत्वाचे आहे. ही माहिती आत्महत्येसंबंधित रिपोर्ट च्या सुरुवातीला किंवा शेवटी ठळकपणे दिसेल अशी लिहिली पाहिजे. मदतीच्या सेवांमध्ये आत्महत्या प्रतिबंधक केंद्रे, रुग्णालयातील आपत्कालीन विभाग, २४ तास हेल्पलाइन, बचत गट, मानसिक आरोग्य व्यावसाईक, आणि पुनर्वसित केंद्रांचा समावेश असू शकतो.

- कुटुंब सदस्य तसेच निवडलेले कुटुंब किंवा मित्र जे एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीच्या आत्महत्येमुळे दुःखी आहेत ते विशेषतः दुःखाच्या काळात स्वतःला इजा करून घेण्याची किंवा आत्महत्या करण्याची भीती असते. अश्या व्यक्तींची मुलाखत अत्यंत काळजीपूर्वक आणि संवेदनशीलपणे घेतली पाहिजे. जर ते बोलू शकत नसतील तर मुलाखत नंतर घेण्याचा विचार करा.

- एलजीबीटीक्युआयए+ सेलिब्रिटीच्या आत्महत्येला अवाजवी महत्व देऊन त्याला रोमांचक बनवू नका किंवा गौरव करू नये. याचा परिणाम संवेदनशील व्यक्तींच्या आत्मघातकी मनस्थिती वर होऊ शकतो. जागा, पध्द्त असे आत्महत्येच्या बारकाईचे तपशील देऊ नका किंवा आत्महत्येपूर्वी लिहिलेले पत्र प्रकाशित करू नका. एखाद्या व्यक्तीच्या आत्महत्येचे सर्वसाधारण कारण किंवा स्पष्टीकरण देऊ नका.



## गुन्हा

*हे प्रकरण एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि समुदायांवर केलेल्या आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींनी केलेल्या गुन्ह्याबद्दल वार्तांकन, लिखाण आणि संपादन करणे याविषयी बोलते.*

- क्राईम रिपोर्टींग बद्दल लक्षात ठेवण्याची सर्वात पहिली गोष्ट म्हणजे पोलीस जे बऱ्याचदा माहितीचा प्राथमिक सोर्स असतात ते समाजाचेच सदस्य असल्याने इतरांसारखेच त्यांच्यामध्येही पूर्वग्रह, पक्षपातीपणा आणि अज्ञान असते. परंतु ते सत्तेच्या पदावर असल्याने त्यांच्या पक्षपातीपणाचा परिणाम विशेष करून उपेक्षित समुदायावर बराच दूरगामी असतो.
- क्राईम रिपोर्टिंग मध्ये एखाद्याला एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील एखादी व्यक्ती पीडित म्हणून किंवा कथित आरोपी म्हणून भेटू शकते. जर एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती गुन्ह्याचा बळी असेल तर खालील गोष्टी लक्षात ठेवा:
    - त्यांना हिंसेला बळी पडायला भाग पाडणाऱ्या त्यांच्या समाजात असलेल्या उपेक्षित भूमिकेला विचारात घ्या.
    - जरी कायदा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसोबत वेगळा वागत असला तरी फक्त पीडित एक एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आहे, याचा अर्थ त्यांच्यावर बलात्कार होऊ शकत नाही असा होत नाही.
    - पीडितांच्या ओळखीऐवजी गुन्हेगारी गैरवर्तनावर लक्ष केंद्रित करावे. विनाकारण ओळखीवर लक्ष केंद्रित करू नये.
    - पीडितांच्या ओळखीवरील प्रतिक्रियेमध्ये झालेल्या हिंसाचाराबाबत अधिकारी आणि पोलीस कारवाई करताना किती प्रतिसाद देत आहेत ते पहावे.
    - एफआयआर मध्ये जर व्यक्तीचे जुने नाव आणि चुकीचा लिंगभाव लिहिला असेल तर एफआयआर वर आधारित रिपोर्टींग करताना, पीडित व्यक्तीला जे आवडते आणि हवे आहे किंवा मृत व्यक्ती आपल्या आयुष्यात स्वतःची जी ओळख करून देत असे ते ग्राह्य धरा.
        - उदा. एका केस चा विचार करू ज्यात एका पारलिंगी स्त्रीच्या आईने कथितपणे तिचे हातपाय तोडण्याची व्यवस्था केली परंतु त्यात त्या महिलेचा मृत्यू झाला. पोलिसांनी तिचे जुने नाव वापरले आणि तिच्या जन्माच्या वेळच्या लिंगाने तिला संबोधले. जिथे पीडितेची ओळख ही तिच्या विरुद्धच्या हिंसाचाराचा महत्वाचा भाग

होती, तिथे एखादी व्यक्ती ही केस रिपोर्ट करताना तिचे निवडलेले नाव आणि तिची स्त्री म्हणून लिंगभाव ओळख नक्कीच वापरू शकते. आरोपीविषयी बोलताना "तिचा मुलगा स्त्री झाल्याबद्दल ती निराश झाली" असे म्हणण्यापेक्षा "आरोपी तिच्या पाल्याच्या लिंगभाव ओळखेबद्दल निराश होती" असे आपण म्हणू शकतो.

- जर एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीला त्यांच्या ओळखीमुळे ब्लॅकमेल केले जात असेल तर, त्यांची एलजीबीटीक्युआयए+ ओळख त्यांच्या कुटुंबासमोर किंवा नियोकत्या समोर उघड करू नये ज्यामुळे त्यांना गुन्ह्याची तक्रार नोंदवताना धोका निर्माण होईल. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तक्रारकर्त्याच्या ओळखीचे रक्षण करा आणि स्टोरी अजून आधारभूत आणि प्रामाणिक करण्यासाठी इतर तपशील जोडा.
- काहीवेळा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा त्यांच्या कुटुंबा द्वारे किंवा पोलिसांद्वारे छळ केला जाण्याच्या घटना असतात. अश्यावेळी तुमचा रिपोर्ट त्यांना मदत करेल की अजून असुरक्षित बनवेल याचा विचार करा. जर अजून असुरक्षित बनवणार असेल तर ते करणे टाळा किंवा त्या व्यक्तीसाठी गोष्टी सुरक्षित होई पर्यंत थांबा.
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती त्यांच्या ओळखीमुळे लैंगिक छळाला बळी पडू शकतात. परंतु भारतीय कायदे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींवर होणाऱ्या लैंगिक हिंसेचे काही प्रकार लक्षात घेत नाही किंवा क्वीअर नसलेल्या व्यक्तींवर तश्याच प्रकारे होणाऱ्या गुन्ह्यांपेक्षा कमी गांभीर्याने पाहतात. पत्रकारांनी सुद्धा तसेच करण्यासाठी हे कारण नसले पाहिजे.
  - उदाहरणार्थ, चेन्नई येथील एका शैक्षणिक संस्थेमध्ये लैंगिक छळ आणि हिंसेच्या घटने मध्ये, तक्रारदारांपैकी काही सिसजेंडर पुरुष होते, परंतु भारतीय दंड संहिता (३७७) सिसजेंडर पुरुषांसोबत होणाऱ्या लैंगिक छळासाठी कोणतेही साधन पुरवत नाही. पेनिट्रेटिव्ह लैंगिक अत्याचाराच्या किंवा बलात्काराच्या बाबतीमध्ये भारतीय दंड संहिता च्या ३७७ अंतर्गत गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. परंतु तक्रारदारांनी ज्याचा आरोप केला आहे त्यात लैंगिक छळाच्या आणि विनयभंगाच्या बाबतीत कायदा हा गुन्हा म्हणून लक्षात घेत नाही कारण भारतातील अनेक लैंगिक हिंसेसंबंधित कायदे हे फक्त सिसजेन्डर महिलांनाच सुरक्षितता देतात. पत्रकार या नात्याने न्यायाच्या प्रश्नाकडे पाहताना तुम्ही काहीवेळा विविध गटांच्या (जसे या घटनेत पुरुषांवर होणारा लैंगिक हिंसा आणि सिसजेंडर महिला) परस्परविरोधी गरजा संवेदनशीलपणे हाताळणे गरजेचे आहे.
  - टिप: भारतीय दंड संहिता च्या ३७६ अंतर्गत एखाद्या (सिसजेंडर) महिलेवर बलात्कार करण्यासाठी कमीत कमी ७ वर्ष ते जन्मठेपेची शिक्षा आणि काहीवेळा मृत्युदंडाची शिक्षा सुद्धा मिळू शकते, परंतु एखाद्या पारलिंगी महिलेवर केलेल्या बलात्काराच्या विरोधात ट्रान्सजेन्डर व्यक्ती (संरक्षण आणि अधिकार) कायदा २०१९ च्या अंतर्गत फक्त सहा महिने किंवा दोन वर्षाची शिक्षा लागू होते.

- जर एखादा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती संशयित आरोपी असेल तर खालील गोष्टी लक्षात ठेवा:
  - जेव्हा एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीवर गुन्हा दाखल होतो किंवा अटक होते किंवा आरोपी म्हणून घोषित होते, रिपोर्टींग करताना त्यांचे लिंगभाव ओळख आणि लैंगिक कल केससाठी संबंधित आहे की नाही हे विचारणे महत्वाचे आहे. फक्त पोलिसांनी केसची माहिती सांगताना किंवा एफआयआर मध्ये नमूद केले आहे म्हणून ते वापरण्यापेक्षा, जर ते संबंधीत नसेल तर ते रिपोर्ट मध्ये नमूद करण्याची किंवा त्यावर भर देण्याची गरज नाही.

- उदाहरणार्थ, जर एखादा साखळीचोर क्वीअर असेल तर त्याची क्वीअर ओळख त्या केसशी संबंधित नाही आणि म्हणून ती स्टोरीमध्ये लिहिण्याची सुद्धा गरज नाही.

- जर एखादी व्यक्ती समलैंगिक अल्पवयीन व्यक्तीवर लैंगिक हिंसा कारण्यासाठी संशयित आरोपी घोषित असेल तर पोलीस किंवा तुम्हीसुद्धा कदाचित त्यांची लैंगिकता इथे महत्वाची समजू शकता. असे गुन्हे अनेकदा "समलैंगिक नाती किंवा समलैंगिक सेक्स करण्याचा प्रयत्न" अशी वाक्य वापरून रिपोर्ट केले जातात. अशा केसेस मध्ये २ कारणांमुळे हे टाळणे गरजेचे आहे:

    - लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा (पॉक्सो) २०१२ अंतर्गत अल्पवयीन व्यक्ती सोबत कुठलेही लैंगिक नाते ठेवणे हा गुन्हा आहे. लहान मूल कुठल्याही प्रकारची संमती देऊ शकत नाही असे समजले गेले असल्याने संमती दर्शक भाषा (समलैंगिक सेक्स किंवा समलिंगिक नाते) असा शब्दप्रयोग करणे चुकीचे आहे.

    - व्यक्तीची लैंगिकता ही पीडितांच्या लिंगावरून ठरवली जाऊ शकत नाही. कारण एखादी व्यक्ती संधी आणि उपलब्धता, तसेच इत्यादी कारण पाहून अल्पवयीन व्यक्तीचा छळ करू शकते. समलैंगिकता ही पेडोफिलिया (बालकांविषयी लैंगिक आकर्षण) म्हणून वापरण्याचा बराच मोठा इतिहास आहे जो एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि समुदायाला नुकसान पोचवतो. गुन्ह्याबद्दलचे रिपोर्टींग करताना अशा गैरसमजुतींमध्ये भर घालू नका.

- जर सदर व्यक्तीने एका प्रौढ व्यक्तीवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप असेल आणि सदर आरोपीवर भारतीय दंड संहितेच्या ३७७ अंतर्गत जरी गुन्हा दाखल झाला असेल तरी लैंगिक छळ किंवा हल्ला अशा शब्दांचा वापर करणे गरजेचे आहे. (टीप - सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ अंतर्गत आता संमतीसह प्रौढ समलिंगी सेक्स हा गुन्हा राहिलेला नाही. लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात संबंधित कायद्याचा उपयोग केला जातो)

- त्याचबरोबर जेव्हा आरोपी आणि (पीडित) दोघे एकाच लिंगाचे व्यक्ती असतील तर "X या व्यक्तीवर समलैंगिक नात्याची जबरदस्ती केली" किंवा "X व्यक्तीसोबत समलैंगिक नाते ठेवण्याचा प्रयत्न केला" असे वाक्यप्रयोग करण्याची गरज नाही. त्याऐवजी "X व्यक्तीवर लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केला" असे म्हणू शकता.

- जरी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती संशयित किंवा आरोपी असेल तरी रिपोर्टींग करताना त्यांचा पूर्ण कार्यपद्धतीचा आणि मान राखण्याचा हक्क लक्षात घेणे महत्वाचे आहे. (हे नक्कीच प्रत्येक संशयितांबाबतीत लक्षात ठेवणे गरजेचे आहे.)

- एखाद्या सेक्सवर्क करणाऱ्या व्यक्तीबाबत रिपोर्ट करताना नैतिकतेची भाषा वापरणे टाळा. "सेक्स वर्क करण्यापासून वाचवले आणि त्यांना इतर काम दिले" अशी भाषा वापरण्यासाठी पोलीस/स्वयंसेवी संस्था ओळखले जातात. लोक वेगवेगळ्या कारणांसाठी सेक्स वर्क करतात परंतु जे एकाबाजूने त्यातून त्यांची सुटका म्हणून पहिले जाते तेच दुसऱ्या बाजूने छळ/ हिंसा आणि बंदीचे वातावरण तयार करू शकते. अशा वेळी नैतिक भाषेपेक्षा तटस्थ भाषेचा वापर करावा.



# कायदा आणि न्यायालय

*सदर प्रकरणात न्यायालयातील निर्णय, वादविवाद/ चर्चा/ युक्तिवाद, यासह जनहित याचिका आणि हेबियस कॉर्पस याचिका तसेच महत्वाचे निकाल, ठराव आणि अधिवेशने या विषयांची माहिती एलजीबीटीक्युआयए+ मुद्द्यांवर बातमी करणाऱ्या पत्रकारांसाठी दिलेली आहे.*

- कुठलेही अधिकृत निर्णय किंवा कायदेशीर वादविवाद जे एलजीबीटीक्युआयए+ समुदाय/व्यक्तीबद्दल किंवा त्यांचा समावेश असणाऱ्या घटनेमध्ये झाले असतील, त्या बाबत रिपोर्टींग करताना योग्य भाषेचा वापर केला गेला पाहिजे. भाषा हे एक शक्तिशाली आणि प्रभावी साधन आहे, ज्यामुळे समाजातील सत्तेवर आधारित नाती निर्माण होतात तसेच लादली जातात. त्यामुळे मीडियाने न्यायव्यवस्थेने वापरलेली भाषा विचार करून वापरली पाहिजे जी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना त्यांचे हक्क व आदर मिळवण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडते. जरी तुम्ही अधिकृत न्यायालयीन कागदपत्रांमधून आहे तसेच म्हणणे मांडत असाल तरी पुढील मुद्दे लक्षात ठेवा.
    - जर कुठलाही निर्णयामध्ये जुना/ कालबाह्य आणि चुकीच्या भाषेचा वापर असल्यास त्यांना तुमच्या रिपोर्ट मध्ये योग्य भाषेचा वापर करून मांडा.
        - उदा. जर एखादे अधिकृत न्यायालयीन कागदपत्रात लिहिले असेल की, "याचिकाकर्ता मुलगा जन्माला आला होता आणि परत लिंग निश्चित करण्यासाठी शस्त्रक्रिया करण्यात आली". तुम्ही कागदपत्रातील हे वाक्य संपूर्णपणे टाळून उलट ते दुरुस्त करून असे म्हणू शकतो, "याचिकाकर्त्यास जन्माच्यावेळी मुलगा ठरवण्यात आलं होतं आणि नंतर त्यांच्यावर लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया करण्यात आली." (योग्य अर्थ समजून घेण्यासाठी शब्दावली पहा.)
    - जर पारलिंगी हा शब्द नाम म्हणून वापरला असेल तर त्यापुढे 'व्यक्ती', 'पुरुष', 'स्त्री', 'लोकं' किंवा 'समुदाय' वापरणे योग्य असेल.
        - उदा. जर न्यायालयीन निर्णयामध्ये वाक्य असेल, "पारलिंगींना आरक्षण देण्यासाठी काही निर्देश जाहीर केले होते", तर ते बदलून असे म्हणा- "पारलिंगी व्यक्तींना आरक्षण देण्यासाठी काही निर्देश जाहीर केले होते."
    - व्यक्तीची लिंगभाव ओळख अमान्य ठरेल असे विधान जसेच्या तसे वापरू नका.

- उदा. जर एखाद्या कागदपत्रात म्हटले असेल, "याचिकाकर्ता पारलिंगी व्यक्ती असल्याचा दावा करीत आहे", एखाद्या व्यक्तीची लिंगभाव ओळख स्पष्ट नसेल आणि त्याचा केस शी थेट संबंध नसल्यास, अशा वाक्यांची पुनरावृत्ती टाळा. असे वाक्यप्रयोग हे सूचित करतात की, संबंधित व्यक्ती खोट्याप्रकारे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती म्हणून स्वतःची ओळख सांगत आहे ज्यामुळे धोकादायक परिणाम होऊ शकतात.

  - जरी अधिकृत कागदपत्रात व्यक्तीचे जुने नाव किंवा त्यांचे चुकीचे लिंगभाव लिहिले असेल तरी तुम्ही ते तुमच्या रिपोर्ट मध्ये लिहू नये. कदाचित शासकीयरित्या त्यांचे नाव बदलण्याची मान्यता त्यांना अजून मिळाली नसेल, म्हणून तुम्ही त्यांनी निवडलेले नावच लिहिले पाहिजे. जर तुम्ही संबंधित व्यक्तीच्या संपर्कात असाल तर थेटपणे त्यांचे नाव आणि सर्वनाम विचारणे योग्य असते. दुसरा पर्याय, समुपदेशक किंवा जवळच्या लोकांना संपर्क करणे. हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की, जन्मासोबत आलेल्या कुटुंबातील सदस्य हे अनेकदा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना आधार द्यायला तयार नसतात, त्यामुळे तपशीलवार माहितीसाठी कदाचित ते योग्य लोक नसतील. जर तुम्ही तुमच्या रिपोर्टमध्ये व्यक्तीचे जुने नाव वापरले असेल तर कृपया ती चूक बरोबर करून संबंधित व्यक्तीची माफी मागावी.

- जे ऐतिहासिक निर्णय किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही ज्यामुळे एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या मोठ्या गटावर परिणाम होणे अपेक्षित आहे त्या बद्दल बातमी करताना निर्णयाचा सर्व बाजूने विचार करून ते तपासून पहा. ते करताना फक्त लगेच उपलब्ध असलेल्या क्वीअर कार्यकर्त्यांच्या मतावर अवलंबून राहण्यापेक्षा संपूर्ण एलजीबीटीक्युआयए+ स्पेक्ट्रम मधील व्यक्तींच्या मतांचा समावेश करण्याचा प्रयत्न करा.

  - उदा. नालसा (NALSA) विरुद्ध भारत सरकार केसचा निकाल- या ऐतिहासिक निर्णयाने संविधान अंतर्गत अखेर पारलिंगी व्यक्तींना सुद्धा मूलभूत हक्काची हमी दिली, पण हिजरा, कोथी, आरावनी, द्विलिंगी अश्या विविध ओळखी "पारलिंगी" या एकाच छत्री खाली आणल्याने त्या निर्णयावर टीका करण्यात आली.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसंबंधात गुन्ह्याच्या घटना ज्यामध्ये ते तक्रारदार किंवा आरोपी आहेत त्याबद्दल बातमी करताना पत्रकारांनी ती कुठल्या दृष्टिकोनातून करत आहेत त्यावर नीट विचार करायला पाहिजे. अशा बातम्या सनसनाटी पद्धतीने केल्या तर त्यांचा लगेच गैरवापर होऊ शकतो ज्याचा परिणाम हानिकारक आणि दूरगामी असू शकतो जसे की बहिष्कार टाकणे, क्वीअर व्यक्तींविरोधात शारीरिक हिंसा इ. (पुढील मुद्द्यांसाठी 'गुन्हा' प्रकरण पहावे .)

- नागरी वादावर बातमी करताना जर संबंधित व्यक्तींना हवे असेल किंवा ते वादाशी संबंधित असेल तरच त्या व्यक्तीच्या लैंगिकतेचा उल्लेख करा.

  - उदा. जर एखाद्या जमीन मालकीच्या केस मध्ये एक पक्ष समलिंगी पुरुष असेल, तर जोपर्यंत ती व्यक्ती हा मुद्दा उचलत नाही की त्यांच्या लैंगिकतेमुळे त्यांच्यासोबत भेदभाव होत आहे आणि त्यांना यावर बोलायचे आहे तोपर्यंत त्यांच्या लैंगिकतेचा या केस मध्ये तसा संबंध नाही आणि म्हणून त्याचा उल्लेख करण्याची गरज नाही.

- जर व्यक्ती त्यांच्या जोडीदारासोबत विरुद्धलिंगी नसणाऱ्या नात्यामध्ये आहेत हे माहित असून सुद्धा अनेकदा पालक प्रौढ मुलाचे 'अपहरण' झाले आहे असा आरोप करून न्यायालयात हेबियस कॉर्पस ची केस दाखल करतात. अशाही बऱ्याच घटना आहेत ज्यामध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीने जोडीदाराच्या कुटुंबा विरोधात याचिका दाखल केली कारण त्यांच्या नात्याबद्दल कळल्यानंतर कुटुंबीयांनी जबरदस्तीने त्यांच्या जोडीदाराला ताब्यात घेतले. उदाहरणार्थ, केरळ उच्च न्यायालयातील अधिरा आणि नूरा या समलैंगिक जोडप्याच्या संदर्भातील केस. जर अशा केस मध्ये न्यायालयाने

समलैंगिक जोडप्याच्या बाजूने निकाल दिला तर हे एक महत्वाचे उदाहरण म्हणून नोंदवणे महत्वाचे आहे. पण हाच जर त्या जोडप्याच्या विरोधात निकाल लागला तर ते नोंदवणे त्याहूनही महत्वाचे आहे जेणेकरून त्याविरोधात कारवाईची मागणी करता येईल किंवा आवाज उठवता येईल. पण कोणत्याही प्रकारे अशा बातम्या करताना जोडप्याच्या बाजूची गोष्ट ऐकल्याशिवाय बातमी करू नका.

- जर तुम्ही अशी एखादी न्यायालयीन केस कव्हर करत असाल ज्यात एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती संबंधित असेल तर त्यांच्या गोपनीयतेचा आणि सुरक्षिततेच्या हक्काचा आदर करा. जरी त्यांचे नाव किंवा कुठलेही वैयक्तिक माहिती जाहीरपणे उपलब्ध असलेल्या न्यायालयीन कागदपत्रात लिहिली असली तरी त्यांना विचारल्याशिवाय ती माहिती वापरू नका ज्याने त्यांची ओळख धोक्यात जाईल. हे प्रसिद्ध व्यक्तींबद्दल तसेच ज्या व्यक्तींचा तुम्ही पूर्वीच्या रिपोर्ट्स मध्ये उल्लेख केला आहे अश्या व्यक्तींबद्दल सुद्धा लागू होते.

- जर एखाद्या केसमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती संबंधित पक्ष असेल तर वकील/ फिर्यादी किंवा न्यायाधीश प्रश्नांच्या पाठपुरावा करत आहेत की निरीक्षणाच्या आधारावर व्यक्तीच्या लिंगभावाला, शरीराला, लैंगिकतेला टार्गेट/लक्ष करीत आहेत हे पाहण्यासाठी न्यायालयीन रेकॉर्डस् तपासून पहा. ते आक्षेपार्ह/चीड आणणारे/ किंवा लैंगिकतेच्या नजरेने व्यक्तीच्या शरीरावर किंवा आवडीनिवडीवर प्रश्न विचारत आहेत का? त्यांच्या नात्यांवर आधारित नैतिकतेने भरलेले प्रश्न आणि टीका करून त्यांचे अमानवीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे का? जर तसं असेल तर त्यांच्याबद्दल तुमच्या रिपोर्ट मध्ये लिहिणे गरजेचे आहे.

- निकाल आणि युक्तिवाद तपासून पाहताना, चुकीचे, दिशाभूल करणारे आणि रूढीवादी विधानांकडे लक्ष ठेवा.

    - उदा. आंतरराष्ट्रीय कायदे तज्ज्ञांच्या आयोगाच्या अहवालात एक कार्यकर्ता एका न्यायालयीन सुनावणी बाबत सांगतात ज्यात केरळ मध्ये दोन समलैंगिक महिलांनी एकत्र राहण्याचा प्रयत्न केला. वकील पुन्हा पुन्हा विधान करत होता की , "केरळ राज्यामध्ये एकही समलैंगिक महिला नाही" आणि कार्यकर्त्यांनी सांगितले, "न्यायाधिशांनी या दाव्याला विरोध दाखवायचा काहीच प्रयत्न केला नाही."

- एलजीबीटीक्युआयए+ मुद्द्यांवर काम करणाऱ्या कुठल्याही पत्रकाराला देशातील क्वीअर व्यक्तींचे हक्क तसेच आंतरराष्ट्रीय उदाहरणे आणि तत्त्वे यांची जाणीव असली पाहिजे. इथे थोडक्यात काही महत्वाचे निकाल आणि कायदे आणि त्यांचा एलजीबीटीक्युआयए+ हक्कांच्या चळवळीवर काय परिणाम झाला ते दिले आहे:

    - **नाझ फौंडेशन विरुद्ध दिल्ली सरकार:** २००९ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने केलेली सुनावणी ही 'नाझ फौंडेशन विरुद्ध दिल्ली सरकार' भारतातील पहिल्या काही केसेस मधली एक केस आहे ज्यात प्रौढ व्यक्तींच्या खाजगी आणि संमतीची समलैंगिक लैंगिक क्रिया हा गुन्हा नाही असे ठरविले गेले. सदर क्रियेला जर गुन्हा ठरविले गेले तर त्यामुळे त्यांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन होईल. २००१ मध्ये नाझ फौंडेशन नावाची स्वयंसेवी संस्था आणि लॉयर्स कलेक्टिव्ह संस्था यांनी सोबत भारतीय दंड संहितेच्या कलम ३७७ जे 'नैसर्गिक नियमाविरुद्ध केलेल्या सेक्स/ संभोगला गुन्हा मानतो' त्याच्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणारी जी याचिका दाखल केली त्यासंबंधित हा निकाल आहे.

    - **सुरेश कुमार कौशल विरुद्ध नाझ फौंडेशन:** ११ डिसेम्बर २०१३ ला सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालयाचा निकाल रद्द करून पुन्हा समलैंगिकतेला गुन्हा समजले. हा निकाल देताना खंडपीठाने असा दावा केला

की, “समलैंगिक महिला, पुरुष, उभयलिंगी, पारलिंगी हे देशाच्या लोकसंख्येचा अतिशय लहान भाग आहेत आणि म्हणून या मुद्द्यासाठी न्यायायालयीन हस्तक्षेसपाची गरज नाही.” एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या मुख्य मानवी हक्काकडे दुर्लक्ष केल्याने या निकालाचा सगळीकडे मोठ्या प्रमाणात विरोध झाला.

- **नालसा विरुद्ध भारत सरकार:** २०१४ च्या नालसा चा निकाल ज्यात व्यक्तीला त्यांच्या महिला किंवा पुरुष या द्वंद्वाच्या च्या पलीकडे जाऊन लिंगभाव ओळख ठरवण्याचा हक्क दिला गेला तो भारतातील पारलिंगी व्यक्तींच्या लढ्यासाठी अत्यंत महत्वाचा होता. महिला, पुरुष किंवा तृतीय लिंग अशी स्वताःची ओळख ठरवण्याचा आणि दाखल करण्याचा घटनात्मक अधिकार देण्याबरोबरच या निकालाने पारलिंगी व्यक्तींना लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया न करता त्यांचे कागदपत्रांवर लिंगभाव बदलण्याची परवानगी दिली. परंतु यामुळे महिला आणि पुरुष हे दोनच प्रमुख लिंगभाव अस्तित्वात आहेत असे सुचवले गेल्याने ‘तृतीय लिंग’ ह्या शब्दावर टीका झालेली आहे. (शब्दावली पहा.)

- **नवतेज सिंग जोहर विरुद्ध भारत सरकार:** ६ सप्टेंबर २०१८ ला सर्वोच्च न्यायालयाने एकमताने भारतीय दंड संहितेचे कलम ३७७ हे असंविधानिक आहे असे जाहीर केले. त्याचे कारण असे दिले की ते व्यक्तींच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन करते तसेच एकमेकांच्या संमतीने होणाऱ्या प्रौढ व्यक्तींमधील समलैंगिक सेक्स (संभोग) हा गुन्हा नाही असे जाहीर केले. न्यायालायने असे विधान केले की व्यक्तीचा लैंगिक कल हा त्यांच्या ओळखीचा महत्वाचा भाग असतो आणि याकडे दुर्लक्ष केले तर ते त्यांच्या जगण्याच्या अधिकाराला नाकारण्यासारखे होईल.

- **ट्रान्सजेन्डर व्यक्ती (संरक्षण आणि अधिकार) कायदा २०१९:** रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा इ. संदर्भात पारलिंगी व्यक्तींसोबत होणाऱ्या भेदभावाला थांबवण्यासाठी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने ५ ऑगस्ट २०१९ ला लोकसभेमध्ये ट्रान्सजेन्डर व्यक्ती (संरक्षण आणि अधिकार) विधेयक मंजूर झाले. परंतु यामुळे पारलिंगी व्यक्तींना संस्थात्मक दडपशाहीला अजून बळी पडायला भाग पाडले असा आरोप करून देशातील पारलिंगी समुदायाने या विधेयकाविरोधात जोरदार विरोध केला. प्रशासकीय सोयीसाठी द्विलिंगी आणि पारलिंगी व्यक्तींच्या ओळखी एकत्रितपणे पाहण्याच्या प्रयत्नावरही टीका करण्यात आल्या.

  लोकांच्या जीवनात लक्षणीय बदल घडवून आणण्याची क्षमता असलेला कायदा मंजूर करताना केंद्र सरकारने लोकसहभागाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले, अशी काळजी सुद्धा व्यक्त करण्यात आली. पहिल्या ड्राफ्टवरील सूचना देण्यासाठी जेव्हा मोठ्या प्रमाणातील विरोधामुळे अंतिम तारीख पुढे ढकलली गेली तेव्हा सुद्धा समुदायातील फक्त काहीच सदस्य आणि समर्थक सूचना देण्यासाठी सज्य होते. (कोविड १९ पँडेमिक मध्ये उपलब्ध असलेल्या कमी वेळामुळे). पुढे वेगवेगळ्या आंदोलनानंतरही ट्रान्सजेन्डर व्यक्ती (संरक्षण आणि अधिकार) नियम २५ सप्टेंबर २०२० मध्ये अंमलात आणले गेले.

- **संयुक्त राष्ट्राचे ठराव आणि अधिवेशन:** संयुक्त राष्ट्र, मानवाधिकार परिषद आणि जनरल असेम्ब्ली लैंगिक कल, लिंगभाव ओळख आणि लैंगिक गुण वैशिष्ट्ये यावर आधारित भेदभाव व हिंसा याबद्दल बरेच ठराव मंजूर केले आहेत. यामध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या संरक्षणासाठी स्वतंत्र तज्ञांचा, त्यांच्या मानवी हक्कांसंबंधित मानवाधिकार परिषदेचा ठराव आणि लैंगिक कल किंवा लैंगिक ओळखीच्या आधारावर न्याय बाह्य किंवा अनियंत्रित फाशीच्या विरोधात संयुक्त राष्ट्राच्या आमसभेतील अनेक ठरावांचा यामध्ये समावेश होतो.

- **योग्यकर्ता प्रिंसिपल्स:** इंडोनेशियातील योग्यकर्ता मध्ये २००६ मध्ये जगभरातील मानवी हक्क तज्ञांच्या एका गटाने लिहिलेल पुस्तक, "द योग्यकर्ता प्रिंसिपल्स" हे एक लैंगिक कल आणि लिंगभाव ओळख या संदर्भात आंतराष्ट्रीय मानवाधिकार कायद्याच्या वापराबद्दल एक सर्वसमावेशक गाईड आहे. २०१७ मध्ये लिंगभाव अभिव्यक्ती आणि लैंगिक वैशिष्ट्यांचे वेगळे आणि गुंतागुंतीचे संदर्भ लक्षात घेण्यासाठी तत्वे वाढवण्यात आली ज्याला म्हणले गेले, "योग्यकर्ता प्रिंसिपल्स प्लस १०".

- पत्रकारांनी हे लक्षात घेतले पाहिजे की एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना न्यायालयीन आणि इतर न्यायिक मंचावर तितकेच बहिष्कारास आणि भेदभावास सामोरे जावे लागते जितके इतर कुठल्याही संस्थानिक जागेवर जावे लागते. न्यायालयीन जागा ही एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठी सर्वसमावेशक आणि सुरक्षित व्हावी यासाठी पत्रकार मदत करू शकतात. जर न्यायालयीन आवारात एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीसोबत झालेला भेदभाव किंवा छळाची कोणतीही घटना तुमच्या पाहण्यात आली तर ज्या व्यक्ती सोबत ते झाले आहे त्यांना त्यांची गोष्ट इतरांना सांगायची आहे का हे विचारा. समुदायातील असे अजून कोणी व्यक्ती आहे का ज्यांच्या सोबत अश्याच प्रकारची घटना घडली आहे हे तपासून पहा. आंतरराष्ट्रीय कायदेतज्ञांचा आयोग केरळ मधील दोन व्यक्तींच्या, एक पारलिंगी पुरुष आणि एक पारलिंगी महिला यांच्या विधानाबद्दल बोलताना ते म्हणाले, "जेव्हा ते न्यायालयात त्यांच्या केससाठी आले तेव्हा न्यायाधीशासह सगळे जण त्यांच्यावर हसायचे". अशा घटना छोट्या वाटू शकतात पण ते एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना संस्थात्मकरित्या दूर ठेवण्यासाठी मदत करतात.

- बाकी सगळ्याच रोजगाराच्या जागांप्रमाणे न्यायालयीन कामगारांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश अत्यंत कमी आहे. पत्रकारांनी न्यायालयीन संस्थांमधील, विशेषतः निर्णय घेण्याच्या क्षमतेमध्ये लोकांमधील विविधतेची नोंद ठेवली पाहिजे. केरळमधील जाहीरपणे आपली ओळख सांगणारी पहिली पारलिंगी महिला वकील, पद्म लक्ष्मी ज्यांची बार कौन्सिल मध्ये नोंद झाली त्यांना एक उदाहरण म्हणून पहिले पाहिजे.

- न्यायालयीन संस्थांच्या आवारात एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या समावेशासाठी गरजेच्या आधारभूत सोयीसुविधा आणि प्रशासकीय उपाय यांच्या अभावासाठी न्यायालयीन संस्थांना कारणीभूत ठरविले गेले पाहिजे. २०२३ च्या फेब्रुवारीत तामिळनाडूतील अपंग व्यक्तींसाठीची सार्वजनिक स्वच्छतागृहे जेन्डर न्युट्रल म्हणून बदलण्यात आली. मद्रास उच्च न्यायालयाने निदर्शित केले की त्यांच्या स्वतःच्या न्यायालयीन आवारात सुद्धा अजूनपर्यंत जेन्डर न्युट्रल स्वच्छतागृह नाही. याची सुद्धा नोंद घ्यावी.

- जेव्हा न्यायालयीन संस्थांकडून अनुकूल कृती केल्या जातात तेव्हा त्याची नोंद घ्यावी पण दुसऱ्या बाजूला टीका करण्याची जागासुद्धा ठेवावी. या उपायांचा परिणाम ज्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींवर होण्याची शक्यता आहे त्यांना त्यांच्या सूचना विचारा. उदाहरणार्थ, २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एलजीबीटीक्युआयए+ समुदायावर आधारित न्यायालयीन संवेदीकरण मोड्यूल प्रकाशित केले. अशा कार्यक्रमांची बातमी करताना हे सुद्धा तपासून पहा जर कुठली समुदायातील व्यक्ती त्या पॅनल चा भाग होती का? ज्यांनी हे मोड्यूल लिहिले आणि त्यात काही सुधारणांसाठी जागा आहे का?



## राजकारण

*हे प्रकरण राजकीय पक्षांचे एलजीबीटीक्युआयए+ मुद्द्यांवर असलेल्या भूमिका, राजकारणामध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश, राजकीय मोहीम ज्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठी त्रासदायक किंवा मदतीच्या ठरू शकतात आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबाबत राजकीय संदेश याबाबत विचार मांडते. प्रत्येक भागाखाली मीडिया ने कोणते मुद्दे/ घटनांकडे लक्ष दिले पाहिजे त्याची यादी केली आहे तसेच ते कसे कव्हर केले पाहिजे किंवा कसे कव्हर करू नये ते तपशिलात सांगितले आहे.*

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या सरकारी संस्थांमध्ये झालेल्या नियुक्त्या कव्हर करणे हा पत्रकार किंवा मीडिया हाऊसेसचा हेतू असावा. तो एक ऐतिहासिक दस्ताऐवज रेकॉर्ड बनेल आणि सरकार किती प्रगतिशील किंवा सर्वसमावेशक आहे यासाठी मापक म्हणून काम करू शकतो.
    - उदाहरण: एखाद्या पारलिंगी व्यक्तीची सरकारसाठी सल्लागार म्हणून झालेली नियुक्ती.
- जेव्हा तुम्ही एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींविषयी कायदे, विधेयके, अध्यादेश, सरकारी आदेश आणि नियम याबाबत लिहिता तेव्हा खालील गोष्टी लक्षात ठेवाव्या:
    - हे कायदे, नियम तयार करण्यापूर्वी समुदायाशी चर्चा करून त्यांचा सल्ला घेतला जातो का
    - फक्त कुठल्याही टीके विना किंवा मता विना सरकारचे फक्त कौतुक करण्यापेक्षा याचा समुदायावर कसा परिणाम होईल याबबाबत विचार केला गेला पाहिजे. असे कायदे आणि नियमांवर एलजीबीटीक्युआयए+ समुदायांचा बातम्यांच्या माध्यमातून आवाज उठवला पाहिजे.

      उदा. काही सरकारे जे "तृतीय लिंग" ह्या शब्दाचाच वापर करतात ते पहिल्यांदा "सर्वसमावेशक" वाटू शकते परंतु ते पारलिंगी समुदायाची आयुष्य, भूमिका आणि भाषा यावर प्रामाणिकपणे बोलू शकत नाही तसेच ते लिंगभाव मध्ये उच्च-निचतेचा क्रम सुचवते.

- सरकार जिथे गरज आहे तिथेच पैश्याचा वापर करत आहे का? उदाहरणार्थ, जर एखाद्या मंत्र्याने जाहीरपणे एलजीबीटीक्युआयए+ समुदायाचे समर्थन दाखवणारी विधाने केली तर ती एलजीबीटीक्युआयए+ समुदायांच्या आणि व्यक्तींच्या हक्कासाठी सरकारे खरंच जे काम करत आहेत त्यात दिसून येत आहे की नाही?

  उदाहरणार्थ: काही मंत्री मुलाखतींमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या समर्थनाबद्दल मत मांडतात परंतु जेव्हा समुदायासाठी महत्वाच्या मुद्द्यांचा प्रश्न येतो तेव्हा ते सरकारचा भाग असले तरी मौन राखतात.

- जेव्हा धोरणांची/ कायद्यांची/ योजनांची अंमलबजावणी करण्याचा मुद्दा येतो तेव्हा पुढील गोष्टी विचारात घ्या:

- ही अंमलबजावणी एलजीबीटीक्युआयए+ समुदायाचे प्रमुख/ संस्था/ गट यांच्यासोबत मिळून, चर्चा करून, सल्ला घेऊन केली आहे का?

- पुरेसा निधी/आर्थिक मदत या धोरणासाठी आणि योजनांसाठी राखीव ठेवला आहे का? की फक्त ती एक पेपर वर चांगले दिसणारी धोरण म्हणून पाहिले जात आहे?

- सरकारने जाहीर केलेल्या धोरणांवर आणि योजनांवर खरंच कितपत काम केल जात आहे याचा पत्रकारांनी पाठपुरावा केला पाहिजे.

  उदाहरण: अनेक राज्यांनी पारलिंगी व्यक्तींसाठी धोरणे जाहीर केले आहेत, ज्यांचे मीडिया ने मोठ्या उत्साहात स्वागत केले. पण त्याचे त्यावरचा अभ्यास आणि अनेक पाठपुरावा असे सांगतात की ही धोरणे योग्य रित्या काम करत नाहीत किंवा दुर्लक्षित आहेत.

- हेच एखाद्या राजकीय पक्षाचा जाहीरनामा संदर्भात तुम्ही बातमी करत असाल तेव्हा पुढील गोष्टी विचारात घ्या:

  - जाहीरनामा तयार करणाऱ्या समितीमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश होता का?

  - राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती/समुदायाच्या हक्क आणि हितासाठी काही विशिष्ट तरतुदींचा उल्लेख आहे का? उदाहरणार्थ: घरकुल योजना, आरक्षण, किंवा इतर विशेष अधिकारांची खात्री देत आहेत का?

  - एकूणच संपूर्ण जाहीरनामा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या/समुदयाचा आणि त्यांच्या मुद्द्यांचा समावेश करणारा आहे का? उदाहरणार्थ: लिंग भेदावर आधारित भेदभाव करणारी, समलैंगिक व्यक्ती आणि पारलिंगी व्यक्तींबद्दल तिरस्कार दाखवणारी, भाषा आहे की सर्वसमावेशक भाषा आहे?

  - त्या जाहीरनाम्यात एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती/ समुदायांसोबत भेदभाव करणारे किंवा त्यांच्या अधिकारांविरोधात जाणारे कुठले मुद्दे आहेत का? उदाहरणार्थ: ते समुदायाने एकत्र राहण्याच्या विरोधात आहे का? ते एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींकडून येणाऱ्या धोरणांवरील टिका विचारात घेते की सिसजेन्डर विरुद्धलिंगी लोकांच्या मतांची पोपटपंची करते?

- शेवटी जाहीरनाम्यात कागदावर जे लिहिले आहे ते पक्ष आणि पक्षाच्या सदस्यांना मीडिया आणि लोक जसे समोर ठेवतात हे एकमेकांना जुळणारे आहे का?
- ज्या पत्रकारांना एलजीबीटीक्युआयए+ नजरेतून राजकारण कव्हर करायचे आहे त्यांनी संघटनांचे जाहीरनामे, राजकीय चळवळी, इत्यादी तसेच ते एलजीबीटीक्युआयए+ संदर्भात कसे वाटत आहेत याकडे पहिले पाहिजे.

- जेव्हा तुम्ही राजकीय नेत्यांची भाषणे आणि मुद्दे कव्हर करता:
  - पत्रकारांनी राजकीय नेत्यांची एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबाबत केलेली अडचणीची भाषणे तसेच त्यांची विधाने का अडचणीची आहेत याची कारणे ठळकपणे मांडली पाहिजे. या भाषणांवर रिपोर्ट करताना क्वीअर व्यक्तींचे म्हणणे लक्षात घेतले पाहिजे. यामध्ये टीव्ही पॅनलमधील चर्चा किंवा मुलाखती, विधाने, बाइट्स, राजकारणी आणि नेत्यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदा यांचाही समावेश असला पाहिजे.
  - जर एखाद्या राजकारण्याने किंवा नेत्याने सोशल मीडिया वरून एखादे चुकीचे विधान केले तर त्यालासुद्धा एखाद्या जाहीर भाषणासारखेच समजा. जर एखाद्या नकारात्मक विधानाला खूप पाठिंबा मिळत असेल तर राजकीय नेते कसे एलजीबीटीक्युआयए+ समुदाय आणि व्यक्तींविरोधात भेदभाव आणि तिरस्कार निर्माण करतात या बद्दल बोला. प्रतिक्रियांकडे दुर्लक्ष करू नका.
  - जर एखाद्या राजकारण्याने किंवा नेत्याने एखादे भाषण किंवा विधान सार्वजनिक किंवा खाजगी जागे मध्ये केले असेल तर त्याच्या कव्हरेज चा उद्देश काय आहे, हे विचारात घ्या. ते टीआरपी किंवा फोटो मिळवण्यासाठी भाषणे देताना किंवा विधाने करताना अपेक्षित नसलेले कव्हरेज घेत आहेत का जे त्यांना आधीपेक्षा जास्त लोकप्रिय बनवेल? की ही पत्रकारिता यासारख्या नेत्यांना जबाबदार धरण्यासाठी केली जात आहे?
    - उदाहरणार्थ: एका राजकीय नेत्याने एका लग्नात उपस्थित असताना एक समलैंगिक व्यक्तीबद्दल तिरस्कार दाखवणारे भाष्य केले. काही मीडियाने हे ठळकपणे सांगितले पण त्यांना कधीच त्यावर पाठपुरावा करणारा प्रश्न विचारण्यात आला नाही, त्याचे स्पष्टीकरण मागितले नाही किंवा त्या गोष्टीला कुठल्याही प्रकारे जबाबदार धरले नाही.
  - नेते किंवा राजकारण्यांनी केलेले भाषण किंवा एखादे भाष्य क्वीअर व्यक्तीचा तिरस्कार करणारे आहे का, आणि इतके की ते त्यांच्या इतर सर्व राजकारणाच्या विरोधात आहे?
    - उदाहरणार्थ: जर एखादा बुद्धिवादी राजकारणी ज्याने आतापर्यंत आयुष्यात कधीच 'संस्कृती' आणि 'धर्म' याबद्दल बोलले नाहीत, जर ते एकदमच 'एलजीबीटीक्युआयए+ नाती संस्कृतीच्या विरोधात जाणारी आहेत' असे वक्तव्य करू लागले तर ते किती अडचणीचे आहे हे बातमी रूपाने सगळ्यांसमोर आणणे गरजेचे आहे.
    - अशी वक्तव्ये क्वीअर व्यक्तींचा तिरस्कार करणारी आहेत हे बातमी मध्ये सांगणे महत्वाचे आहे. कुठल्याही राजकारण्यांची किंवा नेत्यांची तिरस्काराच्या वक्तव्याची नोंद करणे गरजेचे असले तरी त्यासोबत ते वक्तव्य एखाद्या गटाचा तिरस्कार आणि विरोध करणारे आहे ह्याची नोंद केली पाहिजे.

- जेव्हा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती एखादी राजकीय संस्था किंवा चळवळ सुरु करत आहेत किंवा चालवत आहेत, त्याबद्दल लिहिताना किंवा बोलताना:
    - कोणत्याही पक्षाबद्दल, संस्थेबद्दल, चळवळीबद्दल लिहिताना, त्यांच्या ओळखेवर भर देण्यापेक्षा त्यांची भूमिका, काम, आणि राजकारण यावर वर भर द्यावा.
    - एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती जे फक्त एलजीबीटीक्युआयए+ हक्कांशी संबंधित नसून "मुख्यप्रवाहातील" राजकीय चळवळींचे नेतृत्व करत आहेत त्यांच्यावर भर द्या.
        - उदाहरणार्थ: दलित पारलिंगी कार्यकर्ती ग्रेस बानू तामिळनाडू मधील जल्लीकट्टू चळवळीचा भाग होती पण तिला त्या चळवळीची प्रमुख जी पारलिंगी महिला सुद्धा आहे असे कधीच ओळखले गेले नाही/ श्रेय दिले गेले नाही.
        - दुसरे उदाहरण: अनेक क्वीअर गट आणि व्यक्ती नागरिकत्व दुरुस्ती विधेयक (CAA- (Citizenship (Amendment) Act) आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (NRC- National Register of Citizens) कायद्याच्या विरोधातल्या संपूर्ण भारतातल्या आंदोलनांचा भाग होते पण त्यांच्या क्वीअर व्यक्ती म्हणून असलेल्या नेतृत्वाला फारसे महत्व दिले गेले नाही.
    - पक्ष किंवा चळवळ चालू करणारी 'पहिली' व्यक्ती म्हणून कोणालाही श्रेय देताना काळजीपूर्वक द्या. एकूणच कुठलीही गोष्ट जी निश्चित माहीत नसताना किंवा तपासलेली नसताना ती 'पहिल्यांदा' होत आहे असे म्हणताना सावध रहा.
- निवडणूक लढणाऱ्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दल बोलताना/ लिहिताना:
    - जेव्हा एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती निवडणूक लढत असते तेव्हा त्यांच्या फक्त ओळखेवर लक्ष केंद्रित करू नका; त्यांचे पूर्वीचे काम, ते निवडून आल्यावर काय काम करण्याची खात्री देत आहेत, त्यांचे राजकारण काय आहे इत्यादी गोष्टी सुद्धा विचारात घ्या. फक्त राजकीय काम आणि महत्त्वाकांक्षा कव्हर करण्याच्या हेतूने त्यांच्या वैयक्तिक आयुष्याची आणि पूर्वीच्या आयुष्यातले आत्ता संबंधित नसलेल्या कामांची तपासणी करू नका.
        - उदाहरणार्थ: जर एखादी पारलिंगी महिला निवडणूक लढत असेल आणि त्यांनी आधी सेक्स वर्क केले असेल तर नैतिकतेच्या नजरेतून ते काम बघणे योग्य ठरणार नाही. पण त्यांचा पोलीस, पितृसत्ता, लिंगभावावर आधारित भेदभाव, असंघटित कामाचे क्षेत्र यांसोबतच अनुभव त्यांची प्रमुख म्हणून असलेली कामासाठीची योग्यता आणि ज्ञान यासाठी महत्वाचे आहे.
    - मीडिया रिपोर्ट्स जसे मोठ्या पक्षांमधून किती सिसजेंडर महिला निवडणूक लढवतात ते तपासतात तसे जेव्हा राजकीय पक्ष जाहीरपणे एलजीबीटीक्युआयए+ हक्कांबद्दल समर्थन दाखवतात, तेव्हा ते निवडणुकीमध्ये एलजीबीटीक्युआयए+ उमेदवारांना संधी देतात की नाही हे तपासून पहा
        - जर एखादा पक्ष एलजीबीटीक्युआयए+ उमेदवारांना तिकीट देत असतील तर त्या उमेदवारांना अशा जागी तिकीट दिले जात आहे का जिथे त्यांची निवडून येण्याची शक्यता आहे की फक्त अशा जागी जिथे ती

जिंकण्याची शक्यता नाही आणि फक्त त्याचा फायदा होत असल्या कारणाने ते दिले जात आहे ते पाहणे गरजेचे आहे.

- तसेच एलजीबीटीक्युआयए+ उमेदवारांना बाकी उमेदवांसारखाच वाव, पैसे, मोहिमांना मदत इत्यादी सारखा पक्षाकडून पाठिंबा आणि मदत मिळत आहे का हे पाहा.

- उमेदवाराला आरक्षित मतदार संघाअंतर्गत (महिला, अनुसूचित जाती, जमाती इ.) तिकीट मिळाले आहे की सामान्य प्रवर्गात मतदारसंघात मिळाले आहे? आणि का? त्यासाठीची स्थानिक राजकीय कारणे काय आहेत?

- बाकी कुठल्याही उमेदवारासारखे, जेव्हा एलजीबीटीक्युआयए+ उमेदवार त्यांच्या मतदारसंघातून लढताना मतदारसंघातील महत्त्वाचे रिपोर्ट करा. लोकांची उमेदवाराबद्दल आणि त्यांनी पूर्वी त्या मतदारसंघात जी कामे केली आहेत याबद्दल काय मतं आहेत आणि एकूणच त्यांच्या कामाबद्दल त्यांना काय माहिती आहे हे विचारा. लोक एलजीबीटीक्युआयए+ उमेदवाराकडे कसे पाहतात याचे हे एक ऐतिहासिक रेकॉर्ड बनेल आणि भविष्यात त्यांना त्यांचा दृष्टिकोन आणि पोहोच यावर कसे काम करता येईल यासाठी मदत होईल.

- विरोधी पक्ष/उमेदवार एलजीबीटीक्युआयए+ उमेदवारांबद्दल त्यांच्या मतदारसंघात कसे बोलतात? ते त्यांच्यासोबत भेदभाव करत आहेत की त्यांना त्यांच्या समान पाहत आहेत?

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींनी राजकारणाबद्दल काय विधाने केली आहेत ते कव्हर करताना पुढील गोष्टी लक्षात ठेवा:

  - काहीवेळा एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती एखाद्या पक्षाचे किंवा राजकारण्याचे समर्थन करू शकते. पण याचा अर्थ असा नाही की देशातील सर्व एलजीबीटीक्युआयए+ समुदाय त्या पक्षाला किंवा उमेदवाराला पाठिंबा देईल. एक व्यक्ती किंवा एक संस्था देशातील/ राज्यातील सगळ्या क्वीअर व्यक्तींच किंवा समुदायांच प्रतिनिधित्व करू शकते असे समजू नका. अश्या पाठिंब्याला विशेषकरून श्रेय द्या. "भारतीय एलजीबीटीक्युआयए+ समुदाय Y राजकारण्याला पाठिंबा देतात" हे म्हणणे चुकीचे आहे "X व्यक्ती Y राजकरण्याला पाठिंबा देतात" हे म्हणणे योग्य आहे.

  - सिसजेन्डर विरुद्धलिंगी व्यक्ती प्रमाणे क्वीअर व्यक्तींचे सुद्धा वेगवेगळे राजकीय कल आणि विचार असतात. एका व्यक्तीची विधाने आणि मते ही एकत्रित सगळ्यांचीच आहेत हे समजणे चुकीचे आहे.

  - जेव्हा एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती किंवा गट एखाद्या राजकीय पक्षाला पाठिंबा देतात तेव्हा ते त्या पक्षाच्या एलजीबीटीक्युआयए+ मुद्द्यावरच्या भूमिकेसाठी पाठिंबा देत आहेत की त्यांच्या इतर मुद्दे/ भूमिका जे त्यांच्या ओळखीच्या वेगळ्या मुद्द्यांवर परिणाम करतात त्या आधारावर देतात ते पहा.

    - उदाहरणार्थ, एखादी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीचा पक्षासाठीचा पाठिंबा हा त्यांच्या लिंगभाव/ लैंगिकतेवर आधारित आहे की त्यांच्या धार्मिक ओळख किंवा जातीच्या ओळखीवर आधारित आहे ?

  - एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि गट अनेक ओळखी लक्षात घेऊन पक्षाला पाठिंबा देत आहेत की नाही याचा शोध घेणे सुद्धा महत्वाचे आहे. - जरी एखाद्या पक्षाच्या बाकी मुद्द्यांवरील (रोजगार, धर्म, जात इ.) भूमिका

अडचणीच्या आहेत/ असतील तरी ते फक्त त्या पक्षाला त्यांनी दिलेल्या एलजीबीटीक्युआयए+ हक्कांबद्दलच्या आश्वासनांमुळे पाठिंबा देतात का?

- पत्रकारांनी खालील गोष्टी सुद्धा कव्हर केल्या पाहिजेत:
    - सरकारच्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना टार्गेट करणाऱ्या मोहिमा, उदा. मतदार नोंदणीसाठीची मोहीम.
    - एलजीबीटीक्युआयए+ समुदायांना मदत कारण्यासाठी असलेल्या मोहिमांवर सरकारसोबत काम करणारे क्वीअर व्यक्ती. उदा. गृहनिर्माण आणि कल्याणकारी योजना.
    - एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आणि समुदायांनी केलेल्या राजकीय मोहिमा. उदा. आरक्षणाच्या मागणीसाठी केलेली मोहीम.
    - पक्षाकडून एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठी घेतलेले राजकीय पुढाकार. उदा. एखाद्या पक्षामधील एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसाठीचा व्यावसायिक मंच.
    - राजकीय पक्ष जे एलजीबीटीक्युआयए+ हक्कांच्या विरोधात कार्यक्रम आणि मोहीमा चालवतात. उदा. लग्नाच्या हक्काविरोधात पोस्टर मोहीम.
    - एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींविषयी राजकीय संदेश पसरवणे. हे करताना नेते आणि राजकारण्यांची भाषा ही 'परोपकारावर' आधारलेली आहे की 'हक्कांवर' ते पहा.



# शिक्षण

***या*** *प्रकरणामध्ये शैक्षणिक धोरण, आरक्षण, अभ्यासक्रम (लैंगिक शिक्षणासह), संधी आणि भेदभाव (स्वच्छतागृह, शाळेचे गणवेश, पोषण, शिक्षण चालू ठेवणे, प्रवेश प्रक्रिया तसेच त्यामधील नाव आणि लिंगभाव बदल, एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे शैक्षणिक यश, आणि शिक्षक म्हणून काम करत असलेले एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती यासर्वांचा समावेश होतो.*

- सरकार किंवा सरकारी संस्था एखादे विशिष्ट नवीन शैक्षणिक धोरण घेऊन आले, तर जे पत्रकार हे कव्हर करत आहेत त्यांनी ते धोरण किंवा त्यातील भाग हे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश करणारे आहे की नाही हे पाहिले पाहिजे.
    - उदाहरणार्थ, जर एखादे सरकार विद्यार्थीनींसाठी बस पास ची योजना घेऊन येत असेल तर ती योजना पारलिंगी व्यक्ती आणि लिंगभाव नियम न पाळणारी व्यक्ती यांचासुद्धा समावेश करून घेत आहे का?
- राष्ट्र किंवा राज्यस्तरीय असलेल्या व्यापक धोरणांमध्ये, ही धोरणे बनवणाऱ्यांनी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना आणि समुदायांना त्यांचे सहभाही म्हणून पाहिले आहे का?
    - उदाहरणार्थ, जर केंद्र सरकार नवीन शैक्षणिक धोरण घेऊन येत असेल तर, त्यांनी धोरणातील मुद्दा म्हणून एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती व समुदायासाठी आरक्षण आणि संधीचा प्रश्न लक्षात घेतला आहे का? धोरण निश्चित करण्यापूर्वी त्यांनी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, संस्था आणि समुदायाचा खुल्या आणि पारदर्शकपणे सल्ला घेतला आहे का?
- सरकारने जाहीर केलेल्या शैक्षणिक निधीमध्ये एलजीबीटीक्युआयए+ समुदाय ज्याला विशेष लक्ष देण्याची गरज आहे असा वंचित गट म्हणून लक्षात घेतला जातो?
    - उदाहरणार्थ, शिक्षण मंत्रालयासाठी केंद्रीय अर्थसंकल्पामध्ये अनुसूचित जाती आणि जमातींच्या समुदायांकरता शैक्षणिक उपक्रम आणि पुढाकारांसाठी स्वतंत्र निधी राखीव असतो. एलजीबीटीक्युआयए+ समुदायांसाठी अशा प्रकारच्या काही योजना अवलंबल्या आहेत का आणि त्यासाठी पुरेसा निधी पुरवलेला आहे का हे पत्रकार पाहू शकतात आणि विचारू शकतात.

- शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी असलेली धोरणे आणि योजना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश करणारी आहेत का? भरतीच्या नोटीस विशेषतः एलजीबीटीक्युआयए+ अर्जदाराचे स्वागत करतात की नाही आणि त्या प्रक्रिया त्यांच्यासाठी योग्य त्या सोयी करतात का हे पहा.

- शैक्षणिक संस्थांची गणवेश/ कपडे यावरील धोरणे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या अभिव्यक्तीचा विचार न करता बनवली आहेत का? लिंगभावावर आधारित कपडे घालणे सगळ्या विद्यार्थ्यांवर लादले जाते का आणि विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक आवडीनिवडी नुसार त्यात काही बदल केला जातो का ?

- अनेक पारलिंगी व्यक्तींना त्यांच्या उच्च शिक्षणासाठी नाव आणि लिंगभाव बदलण्यासाठी खूप अडचणींना सामोरे जावे लागते. शैक्षणिक संस्था आणि अधिकाऱ्यांकडे प्रवेश प्रक्रिया आणि अर्जासंदर्भात देखील ही प्रक्रिया सोपी करण्यासाठी धोरणे आहेत का हे पत्रकारांनी पहिले पाहिजे. याकडे फक्त एखादी घटना म्हणून पाहण्यापेक्षा व्यवस्थेचा प्रश्न, मुद्दा म्हणून पहा.

    - उदाहरणार्थ, जर तुम्ही शाळा/ महाविद्यालयीन दाखल्यावरचे एखाद्या व्यक्तीचे नाव आणि लिंगभाव बदलण्याच्या त्यांच्या वैयक्तिक लढ्याबद्दल स्टोरी लिहीत असाल तर या मुद्द्यावरील न्यायालयीन निर्णय आणि धोरणांचा आधार घ्या तसेच कार्यकर्ते आणि समुदायातील सदस्यांशी ही अडचण पुन्हा पुन्हा कशी येते याबद्दल बोला.

- स्वतंत्र सुविधा किंवा विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे कुठलेही स्वच्छतागृह वापरण्याची मुभा देणारे धोरण बनवून शैक्षणिक संस्था लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छतागृहाच्या सुविधा पुरवतात की नाही यावर सुद्धा शैक्षणिक जीवनावर बातमी करताना लक्ष दिले गेले पाहिजे. ही धोरणे आणि सुविधा राबविताना विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना संवेदनशील करण्याचे प्रयत्न देखील व्हायला हवे. जेणेकरून लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना अजून कुठल्या छळवणुकीला सामोरे जावे लागणार नाही.

- जेव्हा शाळेतील माध्यान्ह भोजनाला असलेल्या विरोधाबद्दल कव्हरेज देताना, लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना सुद्धा ते मिळत आहे की नाही हे पाहा.

- किती विद्यार्थी शाळा सोडत आहेत, किती शाळा सुरु ठेवत आहेत याबद्दल च्या बातम्या करताना पत्रकारांनी हा मुद्दा सुद्धा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबाबतच्या दृष्टिकोनातून पाहिला पाहिजे. लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या कारणांमुळे शाळा सोडू नये याची शैक्षणिक संस्था खात्री घेत आहेत का? ह्या मुद्द्यांकडे संस्थेची धोरणे लक्ष देत आहेत का? की फक्त काही विशिष्ट घटनांमध्ये तात्पुरते उपाय केले जात आहेत?

- निवासी शैक्षणिक संस्थांनी वसतिगृहे बांधताना आणि खोल्या वाटताना लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थी, एलजीबीटीक्युआयए+ विद्यार्थी आणि जे विद्यार्थी त्यांच्या लिंगभावाला प्रश्न करीत आहेत त्यांना सुद्धा विचारात घेतले पाहिजे. जे पत्रकार शैक्षणिक संस्थांमधील राहण्याच्या जागेबद्दलच्या समस्यांकडे पाहत आहेत त्यांनी हे पाहिले पाहिजे की कोणत्या धोरणांचे पालन केले जात आहे, लिंगावर आधारित आणि जेन्डर न्युट्रल जागा बरोबरीने आहेत का जेणेकरून सगळे विद्यार्थी त्यांच्या वैयक्तिक निवडीनुसार सुरक्षित जागा शोधू शकतील. जर लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांना एखादी सुरक्षित जागा हवी असेल तर वैयक्तिकरित्या मिळणाऱ्या खोल्या त्यांच्यासाठी कमी पैशात उपलब्ध आहेत का?

- जे पत्रकार विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या राहण्याची जागेबद्दल विचार करत आहेत त्यांनी ह्या जागा लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुद्धा तरतुदी करतात का हे पाहिले पाहिजे.
  - उदाहरणार्थ, जर एखादा लिंगभावाचे नियम न पाळणारे विद्यार्थी अनुसूचित जाती जमातींसाठी असलेल्या वसतिगृहाच्या सुविधा वापरत असतील तर त्यांना दिलेली जागा कशी आहे ?
- संस्थेच्या छळवणूक आणि रॅगिंग विरोधातले धोरण, लिंगभावावर आधारित छळ, समलिंगी, पारलिंगी आणि क्वीअर व्यक्तींचा तिरस्कार करणे इ. याचा समावेश करतात का? ही धोरणे सरकारच्या कायद्याला अनुसरून आहेत का? जे पत्रकार शैक्षणिक संस्थेमधील छळ आणि रॅगिंग किंवा लिंगभावाचे नियम न पाळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वतःला इजा करून घेण्याच्या घटनांबद्दल बातम्या करतात त्यांनी फक्त एखाद्या वैयक्तिक घटनेकडे न बघता त्यापलीकडे जाऊन प्रश्न विचारणे गरजेचे आहे.
- एखाद्या छळाबद्दलची घटना कव्हर करताना, ज्याच्यासोबत ती घटना घडली आहे ते स्वतःची ओळख जशी करतात त्याचा आदर करण्याची खबरदारी घ्या. त्यांच्या लिंगभावाबद्दल किंवा लैंगिकतेबद्दल गोष्टी गृहीत धरू नका, आणि जर ते बोलण्यासाठी तयार असतील तर त्यांना स्वतःबद्दल कसे बोललेले आवडेल याबद्दल विचारून त्यांची संमती घ्या.
- शैक्षणिक संस्थेमधील एखाद्या छळाबद्दल किंवा रॅगिंग च्या घटनेबद्दल बातमी करताना, ती लैंगिक छळाची घटना आहे म्हणून ज्याने छळ केला आहे त्याची लैंगिकता गृहीत धरू नका.
  - उदाहरणार्थ, एखादा स्वतःला पुरुष समजणाऱ्या विद्यार्थ्याने दुसऱ्या पुरुष विद्यार्थ्याचा लैंगिक छळ केला असेल तर त्याचा अर्थ असा नाही की छळ करणारा विद्यार्थी समलैंगिक असेल .
- समलैंगिकता, क्वीअर, पारलिंगी व्यक्तींबद्दलच्या तिरस्कारामुळे कर्मचाऱ्यांची कामे त्यांच्या हातातून जातात या विषयावर जे पत्रकार बातमी करत आहेत त्यांनी त्या शैक्षणिक संस्थेने एलजीबीटीक्युआयए+कर्मचारी आणि विद्यार्थी यांच्या सुरक्षेसाठी काय पाऊले उचलली आहेत, आणि लिंगभाव आणि लैंगिकतेवर आधारित छळवणूक आणि भेदभावाच्या तक्रारी सोडवण्यासाठी संपूर्ण मंडळामध्ये त्याबाबाबत संवेदनशीलता आणि योग्य धोरणांचा वापर केला जात आहे का असे प्रश्न विचारायला पाहिजेत.
- शैक्षणिक क्षेत्रामधील मुद्द्यांबद्दल बातम्या करत असताना, हे लक्षात ठेवा की काही शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी एलजीबीटीक्युआयए+ ओळख असलेले असू शकतात, काही विद्यार्थी सुद्धा लिंगभावाचे नियम न पाळणारे असू शकतात जरी ते दिसायला इतरांसारखेच दिसत असले तरी. शैक्षणिक संस्था किंवा शैक्षणिक क्षेत्रावर परिणाम करणाऱ्या व्यापक मुद्द्यांवर काम करताना त्यांची मते मांडली जात आहेत का याची खात्री करा.
  - उदाहरणार्थ, एखाद्या शैक्षणिक संस्थेमधील संस्थात्मक हिंसेच्या घटनेमध्ये जर लैंगिक छळाच्या उदाहरणात फक्त सिसजेंडर महिलाच त्या हिंसेला बळी पडत नाहीत तर लिंगभावाचे नियम न पाळणारे आणि एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीना सुद्धा लक्ष केले जातात. परंतु तुम्ही हा छळ लिंगभाव किंवा लैंगिकतेशीच संबंधित आहे असा गोंधळ तर करत नाही ना याची खात्री करा. एखादी व्यक्ती जी एखाद्या पुरुषाचा किंवा क्वीअर लिंगभाव असलेल्या व्यक्तीचा छळ करते ती व्यक्ती आपोआप समलिंगी पुरुष बनत नाही आणि इथे त्यांची लैंगिकता हा मुद्दा नसून सत्तेचा गैरवापर ही समस्या आहे.

- कॅम्पस मधील राजकारण कव्हर करत असताना, एलजीबीटीक्युआयए+ नेत्यांनी कॅम्पस मधील चळवळीमध्ये केलेल्या योगदानाला अधोरेखित करा.

- विद्यार्थी संघटनांबद्दल बातमी करताना ते त्यांच्या नेतृत्वामध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसह सर्वसमावेशक आणि अनेक ओळखींची गुंतागुंत लक्षात घेणारे आहेत का हे पहा. त्यांच्या मोहीम ह्या समलिंगी, पारलिंगी आणि इतर क्वीअर व्यक्तींचा तिरस्कार करणारे आहे का ?

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना, समुदायाला पाठींबा देण्याचा दावा करण्याऱ्या विद्यार्थी संघटना, कॅम्पस ग्रुप, समर्थन देणारे गट आर्थिक मदत करत आहेत का? ते एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, समुदायांचे प्रश्न प्राधान्याने घेत आहेत का? त्यांच्या नेतृत्वात एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती आहेत का ? किंवा ते फक्त समर्थन करत आहोत असा पवित्रा घेत आहेत? पत्रकारांनी अशा गोष्टींचे परीक्षण कॅम्पसच्या आत असणाऱ्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींसोबत बोलून माहिती केले पाहिजे.

- हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की, पारलिंगी समुदायासाठीच्या आरक्षणाविषयीच्या बातम्या करताना, विविध राज्यांमध्ये खूप आधीपासूनच पारलिंगी समुदाय भारताच्या वेगवेगळ्या राज्यांमधून कोणत्या मागण्या मांडत आहे याबद्दल पत्रकारांना जाणीव असली पाहिजे. भारतीय राज्यघटनेनुसार केंद्र सरकार, राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांतील सरकारांना सामाजिकदृष्ट्या वंचित आणि मागास गटांसाठी शिक्षणात प्रवेश, रोजगार, इत्यादी मध्ये आरक्षण देण्याची परवानगी आहे.

  ऐतिहासिकदृष्ट्या, भारतातील पारलिंगी समुदाय त्यांच्या प्रस्थापित प्रवर्गानुसार शिक्षण व रोजगार इत्यादींमध्ये आरक्षणाची मागणी करत आहेत. म्हणजेच अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC) आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) या समुदायातील पारलिंगी व्यक्तींसाठी त्यांच्या संबंधित प्रवर्गामध्ये आरक्षण आणि सामान्य प्रवर्गात वेगळे पारलिंगी आरक्षण अशी मागणी आहे. २०१४ च्या नालसा (NALSA) निकालाने पारलिंगी व्यक्तींना ओबीसी प्रवर्गात आरक्षण दिले जावे असे सुचविले आहे. परंतु पारलिंगी व्यक्ती ह्या वेगवेगळ्या जाती , समुदायातून येत असतात आणि केवळ त्यांच्या लिंगाच्या आधारावरच नाही तर ज्या जातीमधून ते येतात त्यामुळे सुद्धा त्यांना भेदभावाला सामोरे जावे लागते, त्यांना उपेक्षित ठेवले जाते. त्यामुळे नालसा (NALSA) निकालाचा सदर भाग हा असमानता पसरवणारा आहे अशी टीका केली जाते.

  - उदा. सप्टेंबर २०२१ मध्ये अशी बातमी आली होती की , केंद्र सरकार उच्च शिक्षण आणि नोकरीमध्ये आरक्षणासाठी ओबीसी प्रवर्गाअंतर्गत पारलिंगी व्यक्तींना आरक्षण देण्याचा विचार करत आहे. ह्या बातमीवर फक्त एक विधान ह्या अर्थाने बघितली तर असे वाटते कि, पारलिंगी समुदायाला हक्क प्रदान करण्यासाठी हे महत्वाचे पाऊल होते , ज्याचे पारलिंगी समुदायाने स्वागत केले. परंतु वर सांगितल्याप्रमाणे आरक्षणामधील आरक्षण न दिल्याने अनुसूचित जाती (SC) व अनुसूचित जमाती (ST) प्रवर्गातील पारलिंगी व्यक्तींना त्यांच्यापेक्षा सामाजिकदृष्ट्या वरचढ असणाऱ्या इतर मागासवर्ग (OBC) प्रवार्गाशी स्पर्धा करत बसावी लागणार आणि उच्च जातीय पारलिंगी व्यक्तींना ओबीसी प्रवर्गाअंतर्गत असणाऱ्या जागा खुल्या केल्या तर तिथेही स्पर्धा करावी लागणार असा त्याचा अर्थ होतो.

- अभ्यासक्रमातील बदल व त्याबद्दलच्या प्रस्तावावर बातमी करताना सर्वसमावेशक दृष्टीकोन बाळगणे महत्वाचे आहे. तसेच, एलजीबीटीक्युआयए+ समुदाय, कार्यकर्ते, शिक्षणतज्ञ आणि साहित्यिक यांच्याकडून अधिक माहिती मिळवली गेली पाहिजे.

- उदा. जानेवारी २०२३ मध्ये नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग (NCERT) यांनी लिंग समावेशी प्रशिक्षणासाठी एक मार्गदर्शिका प्रकाशित केली होती. बऱ्याच न्यूज रुममधून ही बातमी एलजीबीटीक्युआयए+ समुदाय व समुदायातील कार्यकर्त्यांसोबत सल्ला न घेता प्रसारित करण्यात आली. एलजीबीटीक्युआयए+ समुदायाकडून संबंधित मार्गदर्शिकेमधे बरीच माहिती ही चुकीची आणि पारलिंगी व द्विलिंगी व्यक्तींबद्दल गैरसमज पसरवणारी आहे अशी टीका करण्यात आली होती. पत्रकारांसाठी ही महत्वाची गोष्ट आहे की , अभ्यासक्रम किंवा त्यातील बदल याबद्दल बातमी करत असताना फक्त त्यातील माहिती पुन्हा पुन्हा देण्यापेक्षा त्यातील चुकीच्या गोष्टींबाबत बोलले पाहिजे.

- विविध शैक्षणिक संस्थाद्वारे लैंगिक शिक्षणाभोवतीच्या अभ्यासक्रमाविषयी बातमी करत असताना, त्या अभ्यासक्रमात विविध लिंग व लैंगिकता विषयांचा समावेश आहे की नाही हे तपासून पहा. लैंगिक अभ्यासक्रमाविषयी बोलत असताना हेटरोनॉरमेटीव  (विरुद्धलिंगी समाजाच्या नियम व पद्धतींना प्रमाण मानणारी विचारधारा) दृष्टीकोनाच्या पुढे जाऊन विचार करा.

- एलजीबीटीक्युआयए+ विद्यार्थ्यांनी किंवा शिक्षकांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल बातमी करत असताना ती बातमी फक्त त्यांच्या लैंगिक ओळखीपर्यंत मर्यादित ठेवू नका. एखाद्याच्या यशाची किंवा कामगिरीची कथा फक्त त्यांच्या लिंग व लैंगिकतेपर्यंत मर्यादित ठेवू नका. लैंगिक ओळख त्यांच्या व्यक्तिमत्वाचा फक्त एक भाग आहे.

    - उदा. एखादी क्वीअर व्यक्ती केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) परीक्षा चांगल्या गुणांसह पास झाली असेल तर त्यांना त्या ह्या क्षेत्रातील पहिल्या क्वीअर व्यक्ती कशा आहेत याबद्दल हेडलाईन तयार करणे टाळा. अनेक एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती मीडियासमोर आपल्या क्वीअर या ओळखीतून आल्या नसतील आणि त्यांनी तीच परीक्षा उत्तीर्ण केली असण्याची शक्यतासुद्धा आहे. एका क्वीअर व्यक्तीने मीडियासमोर आपली क्वीअर ओळख सांगून वेगवेगळया क्षेत्रात यश मिळवल्याने क्वीअर समुदायातील इतर व्यक्तींना त्याची मदत होते व समाजात क्वीअर असणे ही ओळख सुद्धा दाखवून देते. परंतु, त्यांच्या कौशल्याऐवजी फक्त त्यांच्या क्वीअर असण्याबद्दल बोलत राहणे चुकीचे आहे.

# ऐतिहासिक क्वीअरफोबिया आणि विज्ञान क्षेत्रातील एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे कमी प्रतिनिधित्व

व्यापक जनमतानुसार विज्ञान व अकादमी ही क्षेत्रे निपक्षपाती आहेत. परंतु अनेक संशोधकांनी असे दाखवून दिले आहे की , असे नेहमीच होत नाही. कारण वैज्ञानिक कामे ही माणसाद्वारेच केली जातात. आणि माणूस हा जाणीवपूर्वक किंवा अजाणतेपणामुळे पक्षपाती असू शकतो. एलजीबीटीक्युआयए+ शास्त्रज्ञांसाठी असुरक्षित वातावरण तयार करणाऱ्या वैज्ञानिक संस्थांमधे ऐतिहासिकदृष्ट्या खोलवर रुजलेल्या क्वीअरद्वेषा व्यतिरिक्त संशोधकांचे पक्षपाती पूर्वग्रहसुद्धा वैज्ञानिक अभ्यासात आढळून येतात.

मानव आणि इतर प्राण्यांमधील लिंग आणि लिंगभाव बद्दलच्या आतापर्यंत झालेल्या अभ्यासातील मोठा भाग हा पक्षपाती म्हणून ओळखला जात आहे. ज्यामुळे काही संशोधकांना या समस्येबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रयत्न सुरु करावे लागले आहे. एलजीबीटीक्युआयए+ विषयाबद्दल संशोधनासाठी सकारात्मक दृष्टीकोन आवश्यक आहे जो लिंग आणि लैंगिकतेच्या विविध पैलूंना स्वीकारणारा आहे. लिंग, लिंगभाव आणि लैंगिकतेच्या सनातनी खोक्यांमध्ये माणसांना बंदिस्त करणे हे विज्ञान आणि सामाजिक न्याय या दोन्हीसाठी हानिकारक आहे.

उदाहरणार्थ, २०२१ मध्ये जर्नल ऑफ एन्व्हायरमेंटल मॅनेजमेंटमध्ये प्रकाशित केलेल्या अभ्यासावर तो अभ्यास क्वीअरद्वेषी असल्याने टीका करण्यात आली होती. ज्यामध्ये पर्यावरणीय नुकसान समलिंगी लोकांमुळे झाले आहे व त्यांच्यामधील संबंधांना स्पेनमधील ड्युन क्षेत्रासाठी जबाबदार ठरविण्यात आले. सोशल मिडीयावर याविरुद्ध उठविलेल्या आवाजामुळे हा अभ्यास मागे घेण्यात आला.

अनेक वैद्यकीय अभ्यासाच्या पुस्तकांमध्ये अजूनही समलैंगिकतेचे वर्णन लैंगिक विचलन (मुळच्या लैंगिकतेपासून वेगळे ) किंवा दंडनीय गुन्हा असे केलेले असते. १९७४ पर्यंत अमेरिकन सायकियाट्रिक असोसिएशनच्या पाठ्यपुस्तकांमध्ये समलैंगिकतेचे वर्णन "सोशियोपथिक पर्सनॅलिटी डिस्टर्बन्स" असे केलेले होते. वैद्यकीय साहित्यातील क्वीअरद्वेष काढून टाकण्यासाठी जगभर संघर्ष सुरु आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये भारताच्या नॅशनल मेडिकल कमिशनने जारी केलेल्या मार्गदर्शिकेमध्ये वैद्यकीय विद्यापीठे, महाविद्यालये आणि संस्थांना अभ्यासक्रम आणि पुस्तकांमध्ये वर्जिनिटी किंवा एलजीबीटीक्युआयए+ समुदाय व लैंगिकतेबद्दल अवैज्ञानिक, अपमानास्पद किंवा भेदभाव करणारी माहिती असल्यास त्यांना मान्यता देवू नये असे निर्देश दिले होते. या मार्गदर्शिकेमध्ये मद्रास उच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ देण्यात आला आहे, ज्यामध्ये वैद्यकीय शिक्षणामध्ये

मोठ्या प्रमाणात क्वीअरद्वेष असल्याचे न्यायालयाने नमूद केले होते. हा एक स्वागतार्ह आणि चांगला बदल असला तरीही वैद्यकीय व वैज्ञानिक अभ्यासांमध्ये क्वीअरद्वेष अजूनही कायम आहे.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाविषयी बातमी करताना न्युजरूमने वैज्ञानिक व तत्सम साहित्य क्षेत्रात एलजीबीटीक्युआयए+ समुदायाबद्दल असणारे पूर्वग्रह व क्वीअरद्वेष याबद्दल सावध असायला पाहिजे.



# विज्ञान

***हा** भाग एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या संदर्भात वैज्ञानिक संशोधने, प्रकाशने, शोध आणि निर्मिती याच्या संदर्भात आहे.*

- विज्ञान आणि तंत्रज्ञानासंबंधी संबंधित एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा समावेश असलेल्या गोष्टींचे रिपोर्टिंग करताना खळबळ उडवणारी भाषा वापरणे टाळा. बातमीचे शीर्षक, 'पुरुष झाला गरोदर' आणि ' ज्या पुरुषाला मासिक पाळी येते' अशी वापरणे फक्त चुकीचीच नाहीत तर क्वीअर व्यक्तींबद्दल द्वेष पसरवणारी आहेत तसेच बातमी खळबळ उडवणारी करण्यासाठी क्वीअर व्यक्तींचे आयुष्य वापरण्यासारखे आहे.
- बातमी ही क्वीअर व्यक्तींबद्दलच्या तिरस्कारासंबंधित नसेल तर कन्वर्जन थेरपी बद्दलचे बोलणे टाळा.
- आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की , आपण वाचत असलेले लेख स्युडोसायन्स वर (खोट्या विज्ञानावर) आधारित असू शकतात जिथे वैज्ञानिक शब्दांचा वापर क्वीअर व्यक्ती आणि लिंग व लिंगभावाबद्दलची अवैज्ञानिक माहिती लपवण्यासाठी केला जातो. या लेखांचा उल्लेख करण्यापूर्वी ते लेख एखाद्या क्वीअर व्यक्तीकडून किंवा एखाद्या क्वीअर संशोधक व्यक्तीकडून तपासून घ्यावेत,
- तृतीय लिंग, पारलिंगी व्यक्तीचे जुने नाव घेणे आणि हेटरोनॉरमेटीव दृष्टीकोन या गोष्टी वैज्ञानिक लेखांमधील छुपा क्वीअरद्वेषी आणि पूर्वग्रह ओळखण्यासाठी वापरले जाऊ शकतात. (शब्दांच्या योग्य अर्थासाठी शब्दावली पाहा)
- काही वैज्ञानिक जर्नल आणि वैद्यकीय पुस्तकांमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दल क्वीअरद्वेषी किंवा नकारात्मक संकल्पना मांडलेल्या असू शकतात. अशा प्रकारच्या गोष्टी किंवा व्हिडीओ माहिती म्हणून वापरण्यापूर्वी एखाद्या क्वीअर संशोधक व्यक्तीकडून तपासून घ्यावेत.
- काही वैज्ञानिक किंवा वैद्यकीय पाठ्यपुस्तकांमध्ये 'कन्व्हर्जन थेरपी, समलैंगिक प्रवृत्ती, क्वीअर लोकांमध्ये विशिष्ट वर्तणूक गुणधर्मांचा प्रसार, इत्यादी विषय पक्षपाती किंवा क्वीअरद्वेषी स्वरूपाचे असतात. अशा मजकुरांचा आपल्या बातम्यांमध्ये संदर्भ देणे टाळा.
- तुम्ही तुमच्या बातम्यांमध्ये ज्या व्यक्तीचा संदर्भ देणार आहात अशा व्यक्तीचे क्वीअर मुद्यांसंदर्भातील राजकीय विचार तपासून पहा. आपल्याला माहित आहेत की राजकीयदृष्ट्या बरोबर व्यक्ती किंवा परिपूर्ण व्यक्ती शोधणे अवघड आहे परंतु

अशा व्यक्तीचे क्वीअर व्यक्तींचे अधिकार व ओळखींच्या मध्ये असणाऱ्या गुंतागुंती बद्दलची समज या बद्दलचे विचार तपासणे अतिशय महत्वाचे आहे. जेणेकरून क्वीअर व्यक्तींबद्दलचे सामाजिक पूर्वग्रह टाळण्यास मदत होईल.

- एखाद्या संसाधने असलेल्या व्यक्तीने एखाद्या वैज्ञानिक लेखात किंवा वैज्ञानिक भाषणात क्वीअर व्यक्तींबद्दल मांडलेले विचार आपोआप वैज्ञानिक किंवा सर्वसमावेशक असू शकत नाहीत.
    - उदा. "लैंगिक शोषण झालेल्या महिला ह्या पुरुषांबद्दल द्वेष निर्माण करतात व समलिंगी स्त्रिया बनतात." हे वाक्य काही लोकांना तर्कसंगत किंवा बरोबर वाटू शकते. परंतु, ही कल्पना अवैज्ञानिक, चुकीची आणि क्वीअर किंवा समलिंगी स्त्रियांबद्दल चुकीची माहिती पसरवणारी आहे.
- हे समजून घ्यायला पाहिजे की , लिंग आणि पुरुषत्व/ स्त्रीत्वाचे नियम हे अनियंत्रित सामाजिक रचना आहेत. शब्दांद्वारे किंवा दृष्यांद्वारे त्यांना कायम ठेवल्याने लिंग हे फक्त स्त्री किंवा पुरुष याच दृष्टीने बघण्याच्या भूमिकेला बळकटी मिळते. त्यामुळे इतर लिंगांचे अस्तित्व व त्यांचे महत्व कमी केले जाते.
- प्राणी, नैसर्गिक घटक, आणि मानवनिर्मित वस्तू यांसारख्या लिंग नसलेल्या घटकांना विशिष्ठ लिंग वापरणे टाळा.
- लेख क्वीअरद्वेषी आहे की नाही हे ओळखण्यासाठी वैज्ञानिक लेख वाचताना क्वीअर सिद्धांत किंवा त्याबद्दल अस्तित्वात असलेली माहिती वाचण्याचा विचार करा.

## विज्ञानावरील संवेदनशील बातमी तयार करण्यासाठी संदर्भ/ संसाधने:


- क्वीअर थिअरी: ॲन इंट्रोडक्टशन , अन्नामेरी जागोस, १९९७
- ईवोलुशन्स रेनबो- डाइवर्सिटी, जेंडर एंड सेक्सुअलिटी इन नेचर एंड पीपल, जॉन रोगहगार्डेन २००९
- क्वीअरफोबिक इम्मुनोपॉलिटिक्स इन द केस ऑफ़ एचआयव्ही/एड्स: पोलिसिअल इकॉनमी, द डार्क लिगेसी ऑफ़ ब्रिटिश कोलोनिअलिस्म, एंड क्वीअरफोबिआ इन सब-सहारन आफ्रिका, लिंडा रोनाल्ड दानील, २०२१, सेक्शुआलिटी एंड कल्चर



# मनोरंजन

***हा** भाग सिनेमा, संगीत, नाट्य, कला, नृत्य, लोककला, दूरदर्शनवरील कार्यक्रम आणि साहित्य इत्यादी संबंधित बातम्या करणाऱ्या पत्रकारांसाठी आहे.*

क्वीअर व्यक्तींसंबंधित असणाऱ्या मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे दोन भाग करता येऊ शकतात:

- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या पूर्ण सहभागासह त्यांनी केलेली निर्मिती
- एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या बद्दल इतरांनी केलेली निर्मिती

या भागातील इतर प्रकरणांप्रमाणे, लक्षात घ्यायचा महत्वाचा मुद्दा म्हणजे क्वीअर व्यक्तींना त्यांच्या हक्काची प्रतिष्ठा देणारी आणि त्यांच्याबद्दल न्याय्य आणि निष्पक्ष बातमी करणे महत्वाचे आहे.

- **एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या पूर्ण सहभागासह त्यांनी केलेली निर्मिती:**

  एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींनी केलेली मनोरंजन निर्मिती क्वीअर व्यक्ती किंवा इतरांबद्दलसुद्धा असू शकते. अशा निर्मितीबद्दल टीका करत असताना किंवा त्याबद्दल बातमी तयार करत असताना इतर कलात्मक किंवा सर्जनशील निर्मितीच्या बरोबरीचा विचार करावा. बातमी किंवा टीका ही निर्मात्याच्या स्वतःच्या ओळखीपलीकडे जाऊन करायला पाहिजे. त्याप्रमाणेच आपण हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे की , क्वीअर व्यक्तींना एखाद्या मनोरंजन प्रकल्पाच्या निर्मितीसाठी अधिक तीव्र संघर्ष करावा लागतो आणि म्हणूनच त्यांच्या चिकाटीचे आपण कौतुक करायला पाहिजे.

  - जर निर्मात्याने त्यांच्या ओळखीमुळे कलात्मक क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवला असेल , ही महत्वाची गोष्ट असेल तर त्याचा उल्लेख आपल्या बातमीमध्ये करण्यापूर्वी तुम्ही त्यांची तशी परवानगी घेतल्याची खात्री करा.
  - एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींनी केलेल्या निर्मितीमध्ये कला ही कलाकारापासून वेगळी करावी. उदा. जसे विरुद्धलिंगी दिग्दर्शकाची निर्मिती ही त्याच्या लैंगिकतेपेक्षा वेगळी मानली जाते हाच प्रोटोकोल (नियम) एलजीबीटीक्युआयए+ दिग्दर्शकांसोबत वापरला जावा.

- ○ जर एखाद्या एलजीबीटीक्युआयए+ लेखकाने एखादी काल्पनिक गोष्ट लिहिली असेल ज्यामधील मुख्य पात्र हे क्वीअर असेल तर ते पात्र काल्पनिक मानले पाहिजे. त्या पात्राच्या प्रवासाची तुलना लेखकाच्या प्रवासाशी करणे टाळा आणि संबंधित निर्मितीवर अशा प्रकारच्या गृहितकावर आधारित टीका करू नका.

- ○ जर काम हे आत्मचरित्र किंवा नाटक/चित्रपट हे लेखकाच्या जीवनावर आधारित असेल तर निर्मात्याची लैंगिक ओळख किंवा लैंगिकता यावर लिहिणे मान्य करता येईल. इतर सर्व गोष्टींमध्ये निर्मात्याची परवानगी आवश्यक व महत्वाची आहे. त्याबरोबरच, अशी माहिती अपमानास्पद शब्द न वापरता , संवेदनशीलतेने व सहानुभूतीने सर्वांसमोर आणणे महत्वाचे आहे. ( शब्दांच्या योग्य अर्थासाठी शब्दावली पाहा) आपल्या बातमीमध्ये अशा प्रकारची माहिती आहे हे निर्मात्याला सांगणे ही सुधा चांगली गोष्ट आहे.

- **एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या बद्दल इतरांनी केलेली निर्मिती**

  एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना मनोरंजन क्षेत्रात कमी प्रमाणात संधी मिळते. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दलची बहुतेक निर्मिती ही ज्या व्यक्ती एलजीबीटीक्युआयए+ समाजाचा भाग नाहीत अशांकडून केली जाते.

  - ○ केवळ एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील व्यक्तींच्या निर्मितीमध्ये इतर सहभाग असेल तर ती निर्मिती अचूक असेलच असे नाही.

  - ○ जेव्हा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या असभ्य किंवा अप्रामाणिक चित्रणाबद्दल चिंता व्यक्त करतात तेव्हा त्यांच्या दृष्टीकोनातून संबंधित निर्मितीवर टीका करणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे.

  - ○ एखाद्या निर्मितीमध्ये क्वीअर ही ओळख खऱ्या अर्थाने गरजेची आहे का? की ती ओळख फक्त टोकनिजम किंवा वरवर दाखविण्यासाठी वापरली गेली आहे हे तपासून पाहणे पत्रकाराचे किवा विडिओ निर्मात्याचे काम आहे.

  - ○ एखाद्या निर्मितीमधे क्वीअर व्यक्तीची देहबोली, हावभाव किंवा मेकअप हे अपमानास्पद पद्धतीने दाखविले असतील तर त्याबद्दल लिहिणे किवा बातमी करणे ही सुद्धा पत्रकारांची महत्वाची जबाबदारी आहे.

- **लोककला**

  - ○ मुख्य प्रवाहातील सिनेमा, दूरदर्शन कार्यक्रम आणि साहित्य या व्यतिरिक्त क्वीअर समुदायाचे लोककलांमध्ये महत्वाचे योगदान आहे. बऱ्याच काळापासून अनेक लोककला जसे की थेरूकुत्ठू , कराकत्तम आणि इतर नृत्य यांसारख्या लोककलांचे सादरीकरण लहान शहरे आणि खेड्यांमध्ये क्वीअर समुदायांनी केले आहे.

    - ○ हे सादरीकरण इतर कोणत्याही लोककलांच्या सादरीकरणाप्रमाणेच पाहिले पाहिजे आणि तसाच प्रतिसाद दिला पाहिजे, तसेच या संबंधीच्या बातम्यांमध्ये तटस्थता असावी.

    - ○ जर हे बातमी संबंधित असेल आणि उपयुक्त असेल तर, तुमच्या वाचकांना किंवा श्रोत्यांना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचा लोककलांमधील सहभागाचा इतिहास आणि लोककलांच्या विकासासाठीचे त्यांचे योगदान याबद्दल माहिती द्या.

- काही वेळा, अपुऱ्या कायदेशीर संरक्षणामुळे क्वीअर व्यक्तींचा सहभाग असलेल्या कला प्रदर्शनावेळी गुन्हे घडतात. यावेळी इतर कोणत्याही गुन्ह्यांप्रमाणे याचीसुद्धा नोंद घ्यायला पाहिजे. (अधिक माहितीसाठी क्राईम प्रकरण पाहा )

- मनोरंजन क्षेत्रातील क्वीअर व्यक्तींसंबंधित माहिती गोळा करत असताना संबंधित जमा केलेल्या माहितीचा आणि माहिती जमा करण्याच्या पद्धतीचा क्वीअर कलाकाराच्या उपजीविकेवर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.

# पारलिंगी आणि द्विलिंगी ॲथलीट्स बद्दल विज्ञान काय सांगते

**सायंतन दत्ता**

**सन** १९८५ मध्ये, स्पॅनिश ॲथलीट मारिया जोस मार्टिनेझ-पॅटिनो जागतिक विद्यापीठातील खेळांमध्ये भाग घेण्यासाठी कोबे, जपान येथे गेली होती. तेथे तिची दुसऱ्यांदा "स्त्रीत्वाची चाचणी" झाली. तिच्या गुणसूत्रांच्या रचनेची पुष्टी करण्यासाठी तिच्या गालाच्या आतल्या भागामधून काही पेशी स्वॅब केल्या गेल्या ज्यातून तिच्याकडे दोन X गुणसूत्र आहेत का याचे विश्लेषण केले जाणार होते. तिच्या शर्यतीच्या आदल्या रात्री डॉक्टरांनी तिला तिथे कळवले तिच्या चाचणीमध्ये एक "समस्या" होती, ज्यामुळे तिला दुसऱ्या दिवशी शर्यतीत भाग घेण्यास प्रतिबंध केला जाणार होता.

दोन महिन्यांनंतर, तिच्या चाचणीचे निकाल स्पेनमधील क्रीडा महासंघापर्यंत पोहोचले ज्यामुळे तिचे जग कोसळणार होते. तिने घोषित केल्याप्रमाणे XX ऐवजी, तिचा कॅरिओटाइप XY असल्याचे आढळून आले.

१९८६ मध्ये, जेव्हा ती अडथळा शर्यतीत प्रथम आली, तेव्हा तिची गोष्ट माध्यमांमधून पसरली. मार्टिनेझ पॅटिनोला भविष्यात रेसिंग करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले, तिची क्रीडा शिष्यवृत्ती रद्द करण्यात आली आणि तिचे धावण्याच्या वेळेचे रेकोर्ड ॲथलेटिक रेकॉर्डमधून काढून टाकण्यात आले. या सर्वामागे एक समज होती की, तिच्या गुणसूत्रांच्या रचनेने तिला इतर स्त्रियांपेक्षा अवाजवी फायदा दिला (ज्यांचा अर्थ कॅरिओटाइप XX असा आहे)

## टेस्टोस्टेरॉन कुठे आहे?

मानवातील Y गुणसूत्र हे "Y चे लिंग-निर्धारित क्षेत्र" नावाच्या जनुकाचे ठिकाण आहे: अनेकदा याला sry (sex-determining region of Y/Y चे लिंग-निर्धारित क्षेत्र) म्हणून ओळखले जाते. विकसनशील गर्भामध्ये, हे जनुक प्रथिनासाठी साहाय्यकारक ठरते ज्यामुळे अंडकोषांचा विकास होतो, त्यानंतर जे तयार होते त्याला बहुधा "पुरुष हार्मोन" टेस्टोस्टेरॉन असे म्हणतात

तारुण्यात वृषणात तयार होणारे लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारी संप्रेरक पातळी वाढते आणि त्यामुळे "मोठी आणि मजबूत हाडे, स्नायूंची शक्ती, आणि उच्च हिमोग्लोबिन तसेच संभाव्य मानसिक (वर्तणूक) फरक हे बदल होतात" . प्रत्यक्षात, पुरुषांच्या शरीरात टेस्टोस्टेरॉनची पातळी वाढणे म्हणजे ॲथलीट व खेळांसाठी त्यांच्या शरीरात स्त्रियांच्या शरीरापेक्षा जादाचा स्पर्धात्मक फायदा असतो असे म्हणतात.

परंतु, या गृहीतकामध्ये एक समस्या आहे. टेस्टोस्टेरॉन, इतर अनेक जैविक रेणूंप्रमाणे , कार्य करण्यासाठी प्रथिनांचा दुसरा संच आवश्यक असतो - ज्याला रिसेप्टर्स म्हणतात. असे नोंदवले गेले आहे की ज्या पुरुष शरीर असलेल्या लोकांचे स्नायू स्ट्रेंथ ट्रेनिंग मुळे १२ आठवड्यांनंतर सर्वात जास्त वाढतात ते म्हणजे ज्यांच्याकडे टेस्टोस्टेरॉनची पातळी जास्त आहे म्हणून नाही, तर ज्यांच्याकडे या रिसेप्टर्सची उच्चतम पातळी आहे ज्याला टेस्टोस्टेरॉन बांधले जाते (ज्याला "एंड्रोजन रिसेप्टर्स" म्हणतात).

मार्टिनेझ-पॅटिनोकडे याउलट, एन्ड्रोजन असंवेदनशीलता नावाची स्थिती होती, म्हणजे, तिचे एंड्रोजन रिसेप्टर्स टेस्टोस्टेरॉनला प्रतिसाद देत नाहीत. अशा प्रकारे, वैद्यकीय अहवालावरील पत्रे वगळता, तिचे क्रोमोसोमल कंपोझिशनचा अर्थ तिचे लिंग निश्चित करण्याच्या दृष्टीने कमी होता. शास्त्रज्ञ, कार्यकर्ते आणि पत्रकार यांच्या समर्थनामुळे तिची परिस्थिती दोन वर्षांनी बदलली जेव्हा १९८८ मध्ये, तिला आंतरराष्ट्रीय ॲथलेटिक्स फेडरेशनने पुन्हा धावण्याची परवानगी दिली.

परंतु, अजूनही एक गोष्ट मात्र बदलली नव्हती: टेस्टोस्टेरॉन त्यांना त्यांच्या शरीरात स्पर्धात्मक खेळांमध्ये एक अन्यायकारक फायदा मिळवून देते असा समज. हा समज अजूनही पारलिंगी स्त्रिया, आंतरलिंग भिन्नता असलेले लोक आणि सिसजेंडर महिला ज्यांच्या टेस्टोस्टेरॉनची पातळी स्वीकृत श्रेणीच्या बाहेर येते अशा सर्वांना ॲथलेटिक कार्यक्रमांमधून वगळतो.

मार्टिनेझ-पॅटिओच्या प्रकरणाने २००६ मध्ये भारतीय धावपटू संथी सौंदर्यराजन यांची आठवण करून दिली. दोहा आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला. मात्र ती "लैंगिक चाचणीमध्ये अयशस्वी झाल्याने अखेरीस तिचे पदक काढून घेण्यात आले आणि क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्यास बंदी घातली.

मार्टिनेझ-पॅटिनो यांच्याप्रमाणेच सौंदर्यराजन हे अँड्रोजन-संवेदनशील होते.

## विज्ञान काय म्हणते?

सौंदर्यराजन आणि मार्टिनेझ- पॅटिनो यांच्या प्रमाणेच इतर व्यक्ती जसे की पिंकी प्रामाणिक आणि दुती चंद यांना देखील यासारख्या अवघड प्रसंगातून जावे लागले. याला कारणीभूत दोन वादग्रस्त तरीही प्रचलित अशा धारणा आहेत. पहिली धारणा- की एखाद्या व्यक्तीचे लिंग केवळ पुरुष किंवा स्त्री असते. दुसरी धारणा -पुरुषत्व किंवा स्त्रीत्वाचे परिमाण क्रोमोसोमल आणि हार्मोनल रचनेच्या बाबतीत स्पष्टपणे केले जाऊ शकते.

जीवशास्त्रज्ञ आणि स्त्रीवादी ॲनी फॉस्टो-स्टर्लिंग त्यांच्या सेक्स/जेंडर: बायोलॉजी इन अ सोशल वर्ल्ड (२०१२) या पुस्तकात, चिकित्सक आणि १९५० आणि ६० च्या दशकात सेक्सोलॉजिस्ट जॉन मनी यांनी मांडल्याप्रमाणे, जैविक लिंगाच्या विविध स्तरांचे विघटन करतात. या मॉडेलनुसार, त्याला "लिंगाचे स्तर" म्हणतात, प्रत्येक व्यक्ती आपले जीवन "क्रोमोसोमल लिंग" ने सुरू करते: म्हणजे, 'लिंगाची' विशिष्ट रचना गुणसूत्र' (X आणि Y). परंतु, त्यांच्या गर्भाच्या आयुष्याच्या सुमारे 8-12 आठवड्यांपर्यंत, व्यक्तीचे "तटस्थ लिंग" असते, आणि जेव्हा लैंगिक गुणसूत्रांवर विशिष्ट जनुकांची अभिव्यक्ती सुरू होते, त्यानंतरच त्याच्या शरीरात गोनाड्स (जनेंद्रीय) तयार होतात. फॉस्टो-स्टर्लिंगच्या मते, हे "भ्रूण गोनाडल लिंग" आहे.

गोनाड्स त्यानंतर "लिंग हार्मोन्स" तयार करतात, जे गर्भाला "गर्भ हार्मोनल लिंग" देतात. ज्यामुळे, अंतर्गत पुनरुत्पादक अवयवांची निर्मिती होते (उदा., फॅलोपियन नलिका, अंडाशय, गर्भाशय, सेमिनल नलिका इ.), तेव्हा गर्भाने "अंतर्गत प्रजनन लिंग" प्राप्त केले असे म्हटले जाते. गर्भाच्या विकासाच्या चौथ्या महिन्याच्या जवळपास, जननेंद्रिये तयार होतात, अशा प्रकारे गर्भाला "भ्रूण जननेंद्रियाचे लिंग" प्रदान करते.

तशाच प्रकारे, यौवनकाळात लैंगिक (हार्मोन्स) संप्रेरकांची पातळी जसजशी वाढत जाते, तसतसे व्यक्तीला "प्युबर्टल हार्मोनल लिंग" मिळते , जे त्यांच्या शरीराला आकार देण्यात भूमिका बजावते ("प्युबर्टल मॉर्फोलॉजिकल सेक्स': फॉस्टो-स्टर्लिंग).

फॉस्टो-स्टर्लिंगने हे काळजीने नमूद करतात की हे स्तर सांगितल्याप्रमाणे नेहमी जुळतातच असे नाही आणि ते एकमेकांपासून स्वतंत्रपणे सुद्धा विकसित होऊ शकतात. एंड्रोजन असंवेदनशीलता ही अशीच एक गोष्ट आहे, जिथे व्यक्तीमध्ये क्रोमोसोमल लिंग आणि गर्भाचा हार्मोनल लिंग इतर लैंगिक स्तरांशी जुळत नाही.

अशा प्रकारे, जैविक लिंग स्पष्टपणे गुणसूत्राद्वारे किंवा गोनाड्सद्वारे निर्धारित केले जात नाही आणि हार्मोन्स जेव्हा सर्व लैंगिक स्तर एकमेकांसोबत एकत्र येतात, तेव्हा व्यक्तींना पारंपारिकपणे "पुरुष आणी स्त्री" म्हटले जाते. परंतु, जेव्हा हे स्तर पारंपारिक नसलेल्या मार्गांनी एकत्र होतात, तेव्हा परिणामी इंटरसेक्स व्यक्तींचा जन्म होतो.

अंदाजानुसार, तीस पेक्षा जास्त वेगवेगळ्या प्रकारचे द्विलिंगी फरक नोंदवले गेले आहेत. एंड्रोजन असंवेदनशीलतेच्या बाबतीत, एखाद्या व्यक्तीचे क्रोमोसोमल लिंग सामान्यतः XY असते. परंतु, ते टेस्टोस्टेरॉन, गर्भाच्या जननेंद्रियाच्या लिंगासाठी किती असंवेदनशील/प्रतिकारक्षम आहेत यावर अवलंबून असते, अंतर्गत पुनरुत्पादक लिंग आणि यौवन भौतिक लिंग यामध्ये व्यक्तींमध्ये लक्षणीय बदल असू शकतात.

एप्रिल २०२३ मध्ये, अमेरिकेतील कॉंग्रेसमध्ये रिपब्लिकन पक्षाच्या लोकांनी ॲथलेटिक इव्हेंटमध्ये सहभागी होणाऱ्या पारलिंगी महिला व मुलींवर बंदी घालण्यासाठी मतदान केले. "महिलांसाठी राखीव", द न्यूयॉर्क टाइम्सने त्यावेळी अशी बातमी दिली होती. बातमीमध्ये असा दावा केला गेला आहे की हे विधेयक सिनेटद्वारे मंजूर होण्याची किंवा राष्ट्रपतींद्वारे मंजूर होण्याची "कोणतीही शक्यता नाही". हा पारलिंगी महिलांबद्दलच्या लिंग ओळखीप्रमाणे असणाऱ्या श्रेणीतील सहभागाभोवतीच्या विवादांमधील एक विवाद आहे.

हे समजणे गरजेचे आहे की, पारलिंगी महिला ज्या हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी घेतात - जे सामान्यतः वृषणात तयार होणारे लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारे संप्रेरक ब्लॉकर आणि इस्ट्रोजेन सप्लिमेंटेशन असे असते. त्यांच्याकडे प्रसारित टेस्टोस्टेरॉनची पातळी अत्यंत खालच्या पातळीवर स्थिर होते (आणि अनेकदा सिसजेंडर महिलांसाठी क्लिनिकल श्रेणी), आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती (IOC) ने २००४ मध्ये एक महत्त्वाचा निकाल दिला होता ज्याने पारलिंगी ॲथलीट्सना ऑलिम्पिकमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली गेली.

सहभागी होऊ पाहणाऱ्या पारलिंगी महिलांसाठी, मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे होती: त्यांच्याकडे असणे आवश्यक आहे, त्यांनी लिंग पुष्टीकरण शस्त्रक्रिया केलेली असावी, "अधिकृत अधिकाऱ्याद्वारे " त्यांच्या लिंगभावाची कायदेशीर मान्यता प्राप्त केली असावी. आणि त्यांनी किमान दोन वर्षे "वेरीफाएबल हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी' पार पडलेली असावी. सायन्स ने विज्ञानने २०१८ मध्ये बातमी दिली होती.

मार्गदर्शक तत्वे असून सुद्धा, पारलिंगी महिलांकडे त्यांच्या सिसजेंडर सहकाऱ्यांच्या शरीरापेक्षा जादाचा स्पर्धात्मक फायदा असतो असा समज अजूनही आहे. अगदी हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी सोबत सुद्धा.

२०२१ मध्ये, अमेरिकेतील दोन रुग्णालयांमधील डॉक्टरांनी एक अभ्यास प्रकाशित केला ज्यामध्ये असा दावा केला गेला आहे दोन वर्षांच्या "फेमिनायसिंग थेरपी" नंतर (म्हणजे, हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी), पारलिंगी महिला त्यांच्या सिसजेंडर सहकाऱ्यांच्या

तुलनेत पुश-अप्स आणि सिट-अप्स करण्यात अधिक "ऍथलेटिक फायदा" दाखवत नाही. परंतु, दोन वर्षांच्या टेस्टोस्टेरॉन ब्लॉकर्स आणि इस्ट्रोजेन पूरके असूनही त्या १२% जास्त वेगवान असल्याचे दिसून आले.

जरी हा अभ्यास असा निष्कर्ष काढू शकतो की टेस्टोस्टेरॉनमुळे खरोखरच ॲथलेटिक खेळांमध्ये पारलिंगी महिलांना स्पर्धात्मक फायदा आहे. परंतु या निष्कर्षांमधे अनेक मर्यादांची शक्यता आहे, जे लेखक स्वतः त्यांच्या अभ्यासामध्ये कबूल करतात. यापैकी सर्वात महत्वाची मर्यादा म्हणजे संशोधकांकडे हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीवर नसणाऱ्या पारलिंगी ऍथलीट्सचा गट नव्हता; अशा प्रकारे, त्यांचे निष्कर्ष केवळ वेळेनुसार कार्यप्रदर्शनातील बदल प्रतिबिंबित करू शकतात, पारलिंगी महिलांच्या शरीरावर टेस्टोस्टेरॉनचे प्रभाव नाही.

२०२१ च्या एका पुनरावलोकन अभ्यासानुसार, ज्याच्या मुख्य लेखिका जोआना हार्पर आहेत, त्या एक पारलिंगी महिला ऍथलीट देखील आहेत. त्यांनी सांगितले की पारलिंगी महिलांमध्ये सिसजेंडर महिलांच्या तुलनेत हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी हे हिमोग्लोबिनची पातळी कमी करते जो रक्तातील रेणू ऑक्सिजन वाहून नेतो. तरीही, हार्मोन रिप्लेसमेंट थेरपी नंतरसुद्धा सिसजेंडर महिलांपेक्षा, शरीराचे वस्तुमान आणि स्नायूंचे क्षेत्र, ताकद जास्त असते असे हार्पर सांगतात.

महत्त्वाचे म्हणजे, एप्रिल २०२३ मध्ये सायन्समध्ये प्रकाशित झालेल्या अहवालानुसार सुरू होण्यापूर्वी नोंदवलेल्या मूल्यांमधील घट.,, "...ऍथलीटसवरील प्रयोगशाळेतील अभ्यास पारलिंगी स्त्रिया वेगाने धावू शकतात की नाही, उंच उडी मारू शकतात की नाही, दूर फेकू शकतात की नाही याबद्दल ऍथलीट्स चे हिमोग्लोबिन आणि स्नायू वस्तुमान काहीही सांगत नाहीत.

काही वर्षांपूर्वी, २०१५ मध्ये, हार्परने पारलिंगी महिला ऍथलीट्स कामगिरीवर पहिला अभ्यास प्रकाशित केला होता. त्या अभ्यासानुसार, त्यांना आढळले की ज्या पारलिंगी महिला हार्मोन रिप्लेसमेंट घेत आहेत त्यांनी "[सिसजेंडर महिला] विरुद्धच्या विविध शर्यतींमध्ये पूर्वीपेक्षा चांगले केले नाही जे पूर्वी पुरुष धावपटूंविरुद्ध केले होते."

म्हणजेच, हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीमुळे पारलिंगी महिलांना त्यांच्या सिसजेंडर सहकाऱ्यांपेक्षा कोणताही स्पर्धात्मक फायदा मिळत नाही.

वृषणात तयार होणारे लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारे संप्रेरक ऍथलीट्स यांना खेळांमध्ये स्पर्धात्मक फायदा देते तर मग ट्रान्सजेंडर पुरुष जे टेस्टोस्टेरॉन त्यांच्या हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीचा एक भाग म्हणून घेतात त्यांचे काय??

वृषणात तयार होणारे लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारे संप्रेरक सेवन असूनही, पारलिंगी पुरुषांना त्यांच्या सिसजेंडर सहकाऱ्यांपेक्षा कोणताही विशेष शारीरिक फायदा नसतो असे मानले जाते. असे २०१५ मध्ये , IOC कडून जरी केलेल्या सुधारित मार्गदर्शक तत्वांमध्ये दिसते. ज्यामध्ये पारलिंगी पुरुष "जे स्त्रीपासून पुरुषात संक्रमण करतात ते पुरुष गटातून निर्बंधाशिवाय स्पर्धा करण्यास पात्र आहेत."

हे वर नमूद केलेल्या 2021 अभ्यासाद्वारे प्रदान केलेल्या पुराव्याच्या विरुद्ध आहे, ज्यामध्ये असे आढळले की वर्षभर लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारे संप्रेरक सेवनानंतर पारलिंगी पुरुष सरासरी सिसजेंडर पुरुषांपेक्षा चांगले प्रकारे उठाबशा काढतात.

अशाप्रकारे, टेस्टोस्टेरॉन किंवा वैज्ञानिक माहिती- सध्या स्वतःमध्येच एक विवादित गोष्ट आहे. आपल्या मनात एक कमकुवत मादा शरीर आणि पुरुषाचे मजबूत शरीर असे वाटणे. आणि अधिक महत्त्वाचे म्हणजे, टेस्टोस्टेरॉन आणि स्पर्धात्मक फायदा याविषयीचे धारणा जैविक आणि म्हणूनच नैसर्गिक म्हणून दृढ करण्याचा प्रयत्न करायला हवा.

खरं तर, जैविक प्रक्रियांतून मिळवलेल्या माहितीव्यतिरिक्त इतर माहितीचे स्रोत पारलिंगी ऍथलीट्सना त्यांच्या सिसजेंडर काही विशिष्ट स्पर्धात्मक फायदा आहे का हे समजण्यास मदत करू शकतात. उदाहरणार्थ, एखादा असा युक्तिवाद करू शकतो की जलतरणपटू लिया थॉमस - एक पारलिंगी महिला ऍथलीट जिने २०२२ मध्ये, युनिव्हर्सिटी स्पोर्ट्समध्ये अमेरिकेची सर्वोच्च ट्रॉफी जिंकली - कदाचित तिच्या सिसजेंडर प्रतिस्पर्ध्यांपेक्षा तिच्याकडे स्पर्धात्मक फायदा होता, हे पूर्वी नोंदवले गेले आहे की तिने पोहण्याच्या वेळी, प्रभावी असतानासुद्धा, कोणत्याही प्रकारे रेकॉर्डब्रेक केला नव्हता.

त्याचप्रमाणे लॉरेल हबर्ड, एक वेटलिफ्टर जी एक पारलिंगी महिला आहे आणि जिने २०२० टोकियो ऑलिम्पिकमधील महिला वर्गातून भाग घेतला होता. ती शर्यतीच्या सुरुवातीलाच बाहेर होती, जेव्हा ती तीन पैकी कोणतीही लिफ्ट पूर्ण करू शकली नाही.

जर ही दोन प्रकरणे पुरेशी नसतील, तर अलीकडील लंडन मॅरेथॉनकडे देखील पाहू शकता, जेथे ग्लेनिक फ्रँक- एक पारलिंगी महिला जिने महिला वर्गात स्पर्धा केली. तिला ६१५९ क्रमांक मिळाला. फ्रँकची कामगिरी सरासरी असूनही बऱ्याच माध्यमांनी ज्या ६००० महिला पुढे होत्या त्या ऐवजी मागे राहिलेल्या -१४००० महिलांबद्दल बोलणे निवडले.

खेळांमध्ये पारलिंगी व्यक्तींचा समावेश करत असताना विशेषतः जेव्हा ते स्वतःला जसे ओळखतात त्या लिंग श्रेणीमध्ये स्पर्धा करतात तेव्हा ही गोष्ट त्यांच्या सिसजेंडर सहकाऱ्यांसाठी अन्यायकारक आहे असा समज आहे. ही गोष्ट पारलिंगी व्यक्तींसाठी भेदभाव करणारी व दिशाभूल करणारी असल्याचे दिसून येते.

एखाद्याच्या जैविक लिंगासाठी निर्धारक म्हणून परिसंचरण टेस्टोस्टेरॉन पातळीचा वापर ऍथलेटिक खेळांच्या संदर्भात स्पर्धात्मक फायद्यावर कोण आहे ते दर्शवण्यासाठी केल्याने सिसजेंडर महिलांसह अनेक लोकांना अन्यायकारक गैरसोयीला सामोरे जावे लागते.

२०२१ मध्ये, नामिबिया मधील क्रिस्टीन म्बोमा आणि बीट्रिस मासिलिंगी या दोन १८ वर्षीय धावपटूंना "नैसर्गिक उच्च टेस्टोस्टेरॉन पातळी" मुळे ऑलिम्पिकमध्ये धावण्यास बंदी घालण्यात आली होती. अमेरिकन सिव्हिल लिबर्टीज युनियनच्या एका अहवालानुसार, त्यांच्या बंदीमुळे "कठोर वास्तवाला बळकटी मिळते 'स्त्री' म्हणून कोणाची गणना होते याचा निर्णय नेहमीच खोलवर रुजलेल्या वांशिकीकरणाद्वारे केला जातो.

अशी प्रचलित धारणा आहे की कृष्णवर्णीय (काळया) स्त्री-पुरुषांमध्ये त्यांच्या श्वेत प्रतिस्पर्धी यांच्या तुलनेत टेस्टोस्टेरॉन ची पातळी अधिक असते. परंतु २०१३ च्या कर्करोग कारणे आणि नियंत्रण जर्नलच्या अभ्यासात असे आढळून आले की किमान कृष्णवर्णीय पुरुषांच्या बाबतीत हे खरे नाही.

अशाप्रकारे, टेस्टोस्टेरॉन हा केवळ एक संप्रेरक नाही, तर एक डायनासोर आहे जो जातीय आणि लिंगभेद करतो. कदाचित म्हणूनच तत्वज्ञानी कॉर्डेलिया फाईनने तिच्या तिसऱ्या पुस्तकाद्वारे टेस्टोस्टेरॉन हे पुरुषत्वाचे सार आहे या विश्वासावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. टेस्टोस्टेरॉन रेक्स हा फक्त डायनासोर नाही, परंतु एक जो शिकारी आहे.

जर टेस्टोस्टेरॉनची पातळी स्त्रीत्वाची व्याख्या करण्यासाठी वापरली जात राहिली, तर आम्हाला एक व्याख्या दिली जाईल ज्यामध्ये फक्त एका प्रकारच्या महिलांचा समावेश आहे: ज्या सिसजेंडर आणि गोऱ्या आहेत. इतर सर्व प्रकारच्या स्त्रीत्वाचे पोलिसिंग केले जाईल आणि कृष्णवर्णीय आणि पारलिंगी महिलांना यापुढेही स्त्री कोण आहे या संकुचित व्याख्येमध्ये बसण्यासाठी त्यांचे शरीर बदलत राहावे लागेल.

## आशेचा किरण

२०१५ मध्ये, IOC ने पारलिंगी असलेल्या ॲथलीट्सच्या सहभागासाठी त्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा केली. दोन वर्षांच्या हार्मोन रिप्लेसमेंट थेरपीऐवजी, नवीन नियमांनुसार पारलिंगी स्पर्धकांनी केवळ एक वर्ष थेरपी घेतली असावी. याव्यतिरिक्त, यापुढे लिंगभाव निश्चितीकरण शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता नाही, ही पण सुधारणा केली.

याआधी, त्याच वर्षी धावपटू द्युती चंदने कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट (CAS), स्वित्झर्लंड येथे ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया विरुद्ध ऐतिहासिक खटला जिंकला होता. कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्ट (CAS), स्वित्झर्लंड ही खेळाशी संबंधित विवादांमध्ये मध्यस्थी करणारी स्वतंत्र संस्था आहे. याप्रकरणी चंद यांनी २०१४ मध्ये कथित "हायपरएंड्रोजेनिझम"(म्हणजे, वाढलेली टेस्टोस्टेरॉन पातळी आणि इतर "पुरुष" हार्मोन्स) मुळे तिच्या झालेल्या निलंबनाला आव्हान दिले. CAS ने २०१५ मध्ये चंद यांच्या बाजूने निर्णय दिला आणि दोन वर्षांच्या कालावधीसाठी क्रीडा क्षेत्रातील सर्व हायपरअँड्रोजेनिझम नियम निलंबित केले.

वृषणात तयार होणारे लैंगिक वैशिष्ट्यांचे वाढ करणारे संप्रेरकांचा ॲथलेटिक कामगिरीवर परिणाम यावर वैज्ञानिक एकमताचा अभाव ओळखून गेल्या वर्षी, IOC ने मार्गदर्शक तत्त्वांचा आणखी एक संच जारी केला ज्याने पुढील गोष्ट घोषित केली: "ॲथलीटचे लिंग पडताळण्याचे उद्दिष्ट असलेल्या धोरणांमुळे सर्व खेळाडूंना गैरवर्तनाचा सामना करावा लागतो आणि हे सर्व महिलांवर परिणाम करते" (जोर राखून ठेवला). "खेळाडूंच्या शरीराचे पोलिसिंग" करण्याऐवजी IOC ने सांगितले की, नियामकांनी चांगला मार्ग ओळखण्याची शिफारस "सर्व महिला" आणि ॲथलीट्सची "अयोग्य गैरसोय" होणार नाही याबद्दल शिफारस केली.

तरीही, पारलिंगी असलेल्या खेळाडूंवर बंदी कायम आहे. विज्ञान जे त्याच्या चांगल्या स्थितीत डळमळीत आणि वाईट स्थितीत अंधुक असते त्याचा वापर महिला आणि पुरुषांबद्दलच्या पितृसत्ताक मिथकांना कायम ठेवण्यासाठी ट्रोजन हॉर्स म्हणून केला जात आहे जेणेकरून अश्या अनेक व्यक्तींना ॲथलेटिक्स आणि खेळापासून दूर ठेवले जाते जे पारंपारिक सिसजेंडर पद्धतींमध्ये बसत नाहीत. त्यांच्या शरीराचे आणि गोपनीयतेचे उल्लंघन केल्यामुळे, पारलिंगी असलेले ॲथलीटचा केवळ त्यांच्या सहकाऱ्यांशीच नव्हे तर त्यांना बदलण्याचे आवाहन करणाऱ्या खोल रुजलेल्या पद्धतींशीही संघर्ष सुरूच आहे. सर्व समस्यांच्या शक्यतांविरुद्धही, पारलिंगी असलेले ॲथलीट त्यांच्या स्वप्नांच्या दिशेने धावतात, स्पर्धा करतात.

**सायंतन दत्ता** (ते) हे *एक क्वीअर - पारलिंगी सायन्स पत्रकार आहेत. विज्ञान, आरोग्य, लिंगभाव, लैंगिकता आणि जात या विषयांच्या गुंतागुंतीमधील रचनेवर ते लिहितात. ते सध्या क्रिया विद्यापीठ येथील लेखन आणि अध्यापनशास्त्र केंद्रात प्राध्यापक आहेत.*



# क्रीडा

*भाग क्रीडा क्षेत्रातील क्वीअर व्यक्तींच्या संदर्भातील बातम्यांबद्दल आहे.*

- खेळातील विसंगती म्हणून क्वीअर किंवा पारलिंगी असण्याबद्दल समज निर्माण करू नका. क्वीअर, किंवा पारलिंगी खेळाडूचे शरीर हे तथाकथित वस्तूनिष्ठतेशी झुंज देण्यासाठीचा मुद्दा नाही. आपण किती वेळा खेळातील सिस खेळाडूंच्या सिस असण्याबद्दलच्या ओळखीबद्दल बोलतो?
- ट्रान्झिशन बद्दल आक्रमक किवा चुकीचे प्रश्न विचारू नका.
    - उदा. खेळाडूला ते हार्मोन थेरपी किवा लिंगभाव निश्चिती शस्त्रक्रिया सुरु करणार आहेत की नाही याबद्दल विचारू नका. आपल्याला एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या शरीराविषयीच्या अनावश्यक आकर्षणाच्या वेडेपणापासून दूर झाले पाहिजे.
- एखाद्याच्या ओळखीला ग्राउंडब्रेकिंग किंवा सनसनाटी बातमी मानू नका. व्यक्तीसाठी हे दररोजचे वास्तव आहे. “ऑलिम्पिकमध्ये सहभागी होणारी पहिली पारलिंगी महिला” अशा प्रकारचा मथळा हा व्यक्तींना मुख्य प्रवाहातून कायमस्वरूपी दुर्लक्षित करणारा असतो.
    - उदा. जेव्हा न्यूझिलंडची वेटलिफ्टर लॉरेल हबर्ड ऑलिम्पिकमध्ये भाग घेणारी पहिली पारलिंगी महिला बनली, तेव्हा हे स्पष्ट होते की तिला तिच्या पारलिंगी असण्याचा गौरव होणे अपेक्षित नव्हते. तरीही, बहुतेक बातम्या ह्या तिच्या पारलिंगी असण्याच्या ओळखीबद्दलच्याच होत्या. त्यांना ब्रेकिंग न्यूज चे स्वरूप देण्यात आले होते. आणि त्यामुळे हबर्ड एक ॲथलीट म्हणून कोण आहे किंवा तिच्यासाठी वेटलिफ्टिंगचा अर्थ काय आहे हे आपल्याला फारसे शिकायला किवा समजून घ्यायला मिळाले नाही. पारलिंगी असणे ही ब्रेकिंग न्यूज असू शकत नाही.
- एलजीबीटीक्युआयए+ ॲथलीट्स या सिस- हेटरोनॉर्मेटीव संकुचित जागेत स्वतःला कसे पाहतात, कसे जगतात, काम करताना या दृष्टीकोनाला केंद्रस्थानी ठेवत क्वीअर आणि पारलिंगी नजरेतून टीका करायला पाहिजे.
- क्रीडा संस्कृती किंवा क्रीडा विश्व व्यक्तीच्या ओळखी कशा मिटवून टाकते आणि ही संस्कृती, लिंग निकषामध्ये कशी अडकलेली आहे याबद्दल संभाषण साधण्यासाठी, बोलण्यासाठी किती कमी जागा उपलब्ध होते हे समजून घ्यायला पाहिजे.

- स्वतःची ओळख जाहीर करणाऱ्या व्यक्तींच्या गोष्टीपलीकडे गेले पाहिजे. लोक कसे खेळतात किंवा ॲथलीट्स क्षेत्रात कसे जातात या गोष्टींबद्दलच जास्त बोलल्याने क्वीअरनेस क्रीडा क्षेत्रामध्ये कशा प्रकारे बदल आणू शकते याबद्दल कमी बोलले जाते. याबद्दल अतिशय कमी बातम्या केला जातात.
- क्रीडा क्षेत्र ॲथलीट्सच्या आयुष्यावर कशा प्रकारे प्रभाव करते व त्यातून क्वीअर ॲथलीट्स स्वतःला कसे समजतात , आकार देतात, स्वतःच्या लैंगिक ओळखीपलीकडे जाऊन स्वतःला कसे समजतात यावर लक्ष दिले पाहिजे.
- काही एलजीबीटीक्युआयए+ ॲथलीट्स त्यांची ॲथलीट ही ओळख त्यांच्या इतर ओळखींपेक्षा वेगळी म्हणून पाहू शकतात. लिंग आणि लैंगिकता या मुद्यांपेक्षा त्यांच्यासोबत खेळाबद्दल संभाषण साधले पाहिजे.
- खेळ ही एक समाधानाची, दिलासा देणारी जागा मानून जिथे एखाद्याचे खेळाशी असलेले नाते साजरे केले जाऊ शकेल यावर विचार केला पाहिजे ना की, वंचित समुदायांमधून येणाऱ्या ॲथलीट्सची हिंसक व अनावश्यक स्वरुपाची चौकशी करत बसले पाहिजे.
- तुम्ही कोणासोबत खेळता, तुम्हाला किती मोबदला मिळतो, तुमची किंमत काय अशा गोष्टी तुमच्या कपड्यांखाली काय आहे ते ठरवत नाही. अशा प्रकारच्या चर्चेपासून खेळाला दूर नेण्यासाठी विचार केला पाहिजे
- क्रीडा क्षेत्र हे विषारी किंवा आक्रमक पुरुषत्व आणि पितृसत्ताक व्यवस्थेच्या अधीन असलेले स्त्रीत्व अशा गोष्टींना प्रोत्साहन देणारी जागा बनण्यापेक्षा अशा गोष्टी संपविणारी जागा कशी बनेल याबद्दल लिहिले पाहिजे.
- तुमच्या रिपोर्टिंगमधे क्रीडा क्षेत्र हे लिंग समानतेसाठी महत्वाची जागा कशी बनू शकते याबद्दल विचारले गेले पाहिजे.



## व्यवसाय

*हा भाग विविध व्यापार, व्यवसाय आणि कामाच्या ठिकाणी एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील व्यक्तींच्या समावेशाबद्दल आहे.*

अतिशय शांत स्वरूपाच्या उद्योगक्षेत्रामध्येही, कामाचे किंवा व्यवसायाचे ठिकाणी विविध आव्हाने, तणाव, त्रास किंवा अगदी धोक्यांनी भरलेले असू शकते. एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील कामगार किंवा व्यावसायिक जे आपल्या कामामधून किंवा व्यवसायामधून आपली उपजीविका चालवत आहेत, त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित राहण्यासाठी आणि आपल्या रोजगाराची प्रक्रिया शांततेत सुरु ठेवण्यासाठी स्वतःची ओळख लपवावी लागते.

तर मग व्यवसाय म्हणजे काय? असा विचार जेव्हा आपण करतो तेव्हा मनात अधिकाऱ्यांनी भरलेल्या खोलीची कल्पना येते. परंतु, प्रत्यक्षात व्यवसायामध्ये खाजगी कार्यालये, सरकारी कार्यालये पासून तुमचे स्वतःचे घर किवा दुसऱ्या कोणाचे घर व इतर विविध प्रकारच्या कामाच्या जागा आणि व्यावसायिक जागांचा समावेश होतो.

व्यवसायासंबंधी गोष्टी फक्त नियुक्ती, बडतर्फ करणे, विलीनीकरण आणि अधिग्रहण किंवा पीआर च्या भोवताली फिरत नाहीत. स्वच्छता कर्मचारी, सेक्स वर्कर, घरकाम कामगार, कार्यकर्ते, इत्यादी देखील व्यवसायात सहभागी असतात. अशा परिस्थितीमध्ये एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या समस्यांवर बातमी करत असताना त्यातील फक्त घटना किंवा तथ्ये न नोंदवता त्या घटना किंवा तथ्ये अतिशय संवेदनशीलपणे, पत्रकारितेतील कठोरता वापरून करावी.

या भागात पत्रकार आणि संपादकांनी किंवा आपल्या व्यावसायिक रचनेत एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींबद्दल ज्यांना कर्मचारी, विशेषज्ञ, व्यावसायिक चेहरे, प्रभावशाली व्यक्ती, इत्यादी म्हणले असेल तरीही त्यांच्या बद्दल बातमी करत असताना ज्या मुलभूत धोरणांचा विचार करायला हवा त्याबद्दल माहिती दिलेली आहे.

- असा एक सामान्य गैरसमज आहे की, व्यावसायिक रचनेत एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या संबंधित बातमी करत असताना कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची काळजी करण्याची गरज नाही. परंतु, व्यावसायिक रचनेमध्ये देखील एलजीबीटीक्युआयए+ ओळखींसाठी संवेदनशीलता व आदर असायला पाहिजे. हे लक्षात ठेवायला पाहिजे की , तुमच्या बातमीस्त्रोतांनी त्यांची ओळख त्यांच्या सहकारी, त्यांच्यावरील अधिकारी किंवा त्यांच्याखालील इतर कामगार, ग्राहकांना सांगितली नसेल. त्यांच्या लैंगिक ओळखीबद्दल चुकूनही सर्वांसमोर ते जाहीर करणे अत्यंत धोकादायक वाटत नसले तरीही त्रासदायक असू शकते. त्यांच्या बातमीस्त्रोतांचे रक्षण करणे हे पत्रकारांचे कर्तव्य आहे, मग ते कार्यक्षेत्रात असो किंवा ऑफिसमध्ये.

लक्षात घेतले पाहिजे की ज्या व्यावसायिक किंवा संस्थात्मक रचनेमध्ये गुन्हेगारांकडे अधिक सामाजिक व आर्थिक भांडवल असू शकते अशा ठिकाणी क्वीअरफोबिया, होमोफोबिया किंवा ट्रान्सफोबिया ला प्रतिकार करणे आव्हानात्मक असू शकते. यासाठी पत्रकारांनी एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील व्यक्ती आणि बातमीस्त्रोतांसह काम करत असताना सहानुभूती आणि आत्मविश्वासाने कार्य करायला पाहिजे. थोडक्यात, ही गोष्ट जे पत्रकार अनुभवी नाहीत अशांसाठी नाही.

- एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील बातमीस्त्रोतासह मुलाखत सुरु करण्यापूर्वी, पुढील गोष्टी कराव्यात तुमचा परिचय द्या, तुम्ही प्रतिनिधित्व करत असलेल्या प्रकाशनाची माहिती द्या, तुमच्या मुलाखत देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि वय खाली लिहा (तुम्ही त्यांना त्यांच्या नावाचे स्पेलिंग तुमच्यासाठी सांगण्याची खात्री करा), मुलाखत देणाऱ्या व्यक्तीचे सर्वनाम आणि तुमची व्यावसायिक भूमिका याबद्दल बोला. ते मुलाखतीसाठी आरामदायक आहेत याची खात्री करा आणि तुमच्याशी बोलण्यासाठी आणि कोणत्याही फॉलो-अप प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्यांनी तुम्हाला उत्साहाने संमती दिली असावी याची खात्री करा.

- तुम्ही एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तीची मुलाखत घेण्यापूर्वी किंवा त्यांना प्रश्न विचारण्यापूर्वी हे तुम्ही त्यांना एक खाजगी व्यक्ती म्हणून विचारात आहात की कामाच्या ठिकाणी/कंपनी/क्षेत्र/उद्योगाचे प्रतिनिधी म्हणून बोलत आहात याची खात्री लिखित स्वरूपात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दिलेल्या उत्तरांचा अर्थ कसा लावला जातो यावर याचा तीव्र परिणाम होऊ शकतो. शिवाय, याची खात्री करा की तुमच्या मुलाखत देणाऱ्या स्त्रोतांना त्यांच्या कंपनीच्या मीडिया धोरणांची माहिती आहे जेणेकरून ते त्यांचे पालन करत आहेत की नाही हे त्यांना कळेल अन्यथा तुम्हाला कोट्स देत असताना कामाच्या ठिकाणचे नियमांचे उल्लंघन होत राहील. मुलाखत देण्यासाठी मुलाखतकाराच्या जनसंपर्क विभागाने परस्परसंवादाची मान्यता दिली आहे का याबाबत त्यांना विचारा. परंतु मुलाखत सार्वजनिक हिताची असल्यास व तुमचा स्त्रोत तसे करू इच्छित नसल्यास आवश्यक नाही किंवा असे पाऊल उचलणे ही पत्रकार आणि मुलाखत देणाऱ्या स्त्रोताच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त महत्वाची पातळी आहे.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिकांबद्दल लिहित असताना 'आनंददायी कथा' किंवा 'गरिबीपासून श्रीमंतीपर्यंत' कथा यासारख्या जाळयामध्ये पडणे टाळा. उपेक्षित लोकांचे जीवन क्वचितच इतके साधे असते, बातम्यांमधून समान पातळीचे बारकावे दाखविले गेले पाहिजे.

- एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील व्यावसायिक व्यक्तीला त्यांचा रोजगार सुरक्षित आहे किंवा त्यांच्याकडे करिअर/व्यवसायाशी संबंधित असंख्य उपलब्धी आहेत म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत नाही असे समजू नका.

- एलजीबीटीक्युआयए+ ओळख देखील वर्ग, जात, त्वचेचा रंग, धर्म अपंगत्व, मानसिक आरोग्य, आर्थिक पार्श्वभूमी इ. या सर्व ओळखींच्या सोबतच निर्माण होते याची जाणीव ठेवा. तुमची बातमी व्यक्तीच्या एकाच ओळखीवर जास्त लक्ष केंद्रित करते आणि तुमच्या स्त्रोताच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि त्यांच्याबद्दलच्या इतर सर्व ओळखींना विसरते का? आपल्या स्त्रोताबद्दल/मुलाखत देणाऱ्या व्यक्तीबद्दल पुरेशी माहिती गोळा करा जेणेकरुन त्यांचे गुंतागुंतीचे व्यक्तिमत्व त्यांच्या एका ओळखीपर्यंत सीमित करण्याऐवजी संपूर्णपणे कॅप्चर करता येईल.

- जर तुम्ही एलजीबीटीक्युआयए+ समुदायातील व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तीसंबंधित असलेली बातमी किंवा विशिष्ट कथा तयार करत असाल तर खरोखरच त्यांची क्वीअर ओळख ही कथेशी संबंधित आहे का, असा प्रश्न स्वतःला विचारा.

आणि त्यापुढे जाऊन तुमच्या बातमीमधील मुलाखत देणारी व्यावसायिक व्यक्ती क्वीअर आहे की नाही हे जाहीर करणे सार्वजनिक हिताचे आहे कि नाही याचा विचार करा.

  - उदाहरणार्थ, विलीनीकरण/अधिग्रहण किंवा नियुक्ती/बडतर्फी या विषयांच्या बातमीला व्यक्तीची क्वीअर ओळख सांगणे खरोखर गरजेची आहे का? तुम्ही सिसजेंडर हेटेरोनॉर्मेटिव्ह स्रोताची ओळख त्याच पद्धतीने हाताळल्यास ते विचित्र होईल का? नंतरच्या प्रश्नाचे उत्तर होय असल्यास, यापुढे एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिकांसोबत असे करणे थांबवा.

- एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिकांचा समावेश असलेल्या नकारात्मक बातम्या कव्हर करताना, संबंधित व्यक्तीची क्वीअर ओळख दाखविणे किंवा ही ओळख व्यक्तीविरुद्ध लावलेल्या आरोपांशी जोडलेली आहे का? ही ओळख सांगणे खरोखरच बातमीसाठी गरजेचे आहे का याचा पुन्हा विचार करा (लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये पिडीत किंवा आरोपी असलेल्या क्वीअर व्यक्तींसंबंधी बातमी तयार करण्याबद्दलच्या अधिक माहितीसाठी 'गुन्हा' प्रकरणाचा संदर्भ घ्यावा.)

- थोडक्यात, क्वीअर व्यक्तीच्या क्वीअर या ओळखीचे महत्त्व जास्त वाढवू नका, जेव्हा ही ओळख बातमीसाठी कोणतेही मूल्य जोडत नाही व बातमीच्या मुख्य विषयापासून दूर राहते.

- गोपनीय स्रोतांचे संरक्षण करणे हे निर्विवादपणे पत्रकारितेचे मूलभूत तत्त्व आहे. आपली क्वीअर ओळख अद्याप जाहीर न केलेल्या एलजीबीटीक्युआयए+ स्रोतांशी संवाद साधताना, त्यांचे वर्तमान आणि भविष्य लक्षात ठेवा. तुम्ही त्यांच्या क्वीअर ओळखीच्या संबंधित गोपनीयता संरक्षित करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचा सध्याच्या किंवा भविष्यातील रोजगार कायमचा धोक्यात येऊ शकतो. गोपनीयता राखण्यासाठी सर्व कायदेशीर किंवा नैतिकदृष्ट्या आवश्यक असलेली पावले उचलली गेली पाहिजेत.

- तुमच्या गोपनीय बातमी स्रोतांसोबत व्यवसाय खाती, व्यवसाय ईमेल किंवा ऑफिस फोन नंबरद्वारे संवाद साधू नका.

- तुमच्या स्रोताच्या क्वीअर ओळखीचा संदर्भ दिल्याने त्यांची ओळख अनवधानाने उघड होणार नाही याची खात्री करा. लहान कंपन्यांमध्ये सर्वजण एकमेकांना ओळखत असल्याने ते अंदाज बांधून संबंधित व्यक्तीला ओळखू शकतात हा यामागील मोठा धोका असतो.

- भेटण्याआधीच व्यवस्थित धोरणे निश्चित केल्याने तुम्ही आणि तुमचे बातमीस्रोत सुखरूप व सुरक्षितपणे भेटू शकता.

- तुमच्या गोपनीय बातमीस्रोताने तुम्हाला माहितीपूर्ण संमती दिली आहे का? आणि त्यातील जोखीम, जसे की त्यांच्या कंपनीमध्ये संभाव्य संशयाचा सामना करणे, चौकशीला सामोरे जावे लागणे, आपली क्वीअर ओळख परवानगीशिवाय सतत जाहीर झालेली असणे, बहिष्कृत केले जाणे, कायदेशीर नोटीस पाठविली जाणे इ. बद्दल माहिती आहे याची खात्री करा.

- तुमच्या बातमीस्रोताला 'ऑफ द रेकॉर्ड' टिप्पण्या आणि कोट्सची मर्यादा स्पष्ट करा. तुम्ही दोन्ही पक्षांनी पुढे जाण्यापूर्वी संबंधित अटींवर सहमत होणे आवश्यक आहे.

- तुम्ही कॉर्पोरेट, संस्थात्मक किंवा सरकार-संबंधित प्राइड कार्यक्रमांशी सावधगिरीने आणि गंभीरपणे संपर्क साधणे महत्त्वाचे आहे. तसे करण्यात अयशस्वी होणे म्हणजे बातमी अचूक, निःपक्षपाती आणि सद्भावनेने लिहिलेली असण्याऐवजी फक्त

क्वीअर ओळखीनुसारच नाही तर त्वचेचा रंग, जात, धर्म,अपंगत्व इ. दुर्लक्षित असलेल्यांचा आवाज वगळून ती बातमी संबंधित कार्याक्रमाच्या आयोजकांचे हे एक प्रकारचे प्रेस प्रकाशनच बनू शकते. कॉर्पोरेट त्यांच्या क्वीअर कर्मचाऱ्यांना केवळ दृश्यमानता देण्यासाठी कौतुकास पात्र नाहीत. पत्रकारांनी संबंधित कॉर्पोरेटची व्यावसायिक धोरणे आणि अंमलबजावणीमध्ये सर्वसमावेशक मूल्ये खरोखरच प्रतिबिंबित होतात की नाही हे तपासले पाहिजे.

- शक्यतो, जोपर्यंत तुम्ही कार्यक्रमाबद्दल एकाहून अधिक व्यक्तींशी बोलत नाही, ज्यामध्ये फक्त कार्यक्रमाचे आयोजकच नाही तर कार्यक्रमासाठी अभिप्रेत प्रेक्षक, सहभागी होणारे प्रेक्षक यांचाही समावेश होतो. तोपर्यंत कॉर्पोरेट प्राइड कार्यक्रम किंवा एलजीबीटीक्युआयए+ कार्यक्रमांवर बातमी प्रकाशित करण्यापासून दूर रहा.
- कंपनीच्या एलजीबीटीक्युआयए+ विविधता, समानता आणि सर्वसमावेशक धोरणे राबविण्याचा अनुभव असलेल्यांना प्रथम व्यक्त होण्यासाठी जागा दिली जाईल याची खात्री करा. तज्ञांनी दिलेल्या टिप्पण्या अशा अनुभव असलेल्या व्यक्तींच्या टिप्पण्याचे, आवाजाचे महत्व कमी करतात
- एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिकांना त्यांच्या वैयक्तिक जीवनाबद्दल आणि/किंवा एलजीबीटीक्युआयए+ जोडीदार किंवा कुटुंबातील सदस्य यांच्याबद्दल विचारण्यापूर्वी त्यांची संमती मिळवा त्यांनी उघड केलेली त्यासंबंधी माहिती 'ऑफ द रेकॉर्ड' आहे की नाही हे तपासा.
- जर तुमचा बातमीस्त्रोत वैयक्तिक आघात, गैरवर्तन किंवा कौटुंबिक हिंसाचार यांसारख्या विषयांवर जेथे कायदेशीर निर्बंध लागू होऊ शकतात अशा विषयांवर चर्चा करत असेल तर लेखी संमती मिळवा.
- विद्यार्थी किंवा अल्पवयीन असलेल्या एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिकांशी बोलताना सावधगिरी बाळगा. बातम्यांमधून जाहीर होण्याच्या धोक्यांबद्दल त्यांना माहिती द्या. १८ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बातमीस्त्रोतांसाठी त्यांच्या पालकांकडून लेखी परवानगी प्राप्त करा परंतु तुमचा बातमीस्त्रोताची क्वीअर ओळख जाहीर होणाच्या जोखमीबद्दल जागरूक रहा. अल्पवयीन बातमीस्त्रोताची ओळख किंवा छायाचित्र/विडिओ जाहीर करू नका.
- तुम्ही आणि तुमचा बातमीस्त्रोत व्हायरल होण्याच्या जोखमींबद्दल जागरूक आहात का? भविष्यात बातमी मागे न घेता अशा घडामोडींना तोंड देण्याची तुमची तयारी आहे का? तुमच्या बातमीस्त्रोताची त्यांच्या व्यावसायिक किंवा खाजगी आयुष्याकडे लक्ष वेधण्याबद्दल त्यांची तशी लेखी संमती असल्याची खात्री करा.

तुमच्या एलजीबीटीक्युआयए+ स्त्रोताची ओळख आणि वैयक्तिक जीवनातील बाबी यामुळे त्या व्यक्तीच्या व्यावसायिक किंवा व्यवसाय-संबंधित गोष्टींकडे दुर्लक्ष होणार नाही (अपवाद: तुम्ही जर वैयक्तिक प्रोफाइल लिहित असाल आणि तुमचा स्त्रोत तुम्हाला त्यांची संमती देत असेल.)

एलजीबीटीक्युआयए+ व्यावसायिक व्यक्तीबद्दलची तुमची बातमी त्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य, मित्र, सहकारी कर्मचारी, ओळखीचे इतर लोक, वर्तमान आणि भूतकाळातील जोडीदार इ. यांची ओळख जाहीर करणार नाही याची खात्री करा.



## श्रद्धा

*एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या संबंधित श्रद्धा आणि धार्मिकता, संघटीत धर्म, एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे धार्मिक विश्वासासंबंधी असलेले नाते, धार्मिक पौराणिक कथा व एलजीबीटीक्युआयए+व्यक्तींचे त्याच्याशी असलेले संबंध, त्यांच्याशी संबंधित सांस्कृतिक घटना आणि प्रथा, त्यांचा श्रद्धेकडे असलेला कल यांचा या भागामध्ये समावेश आहे.*

श्रद्धेविषयक व श्रद्धाळू व्यक्तींविषयी बातमी करत असताना विशेषतः ही बातमी प्रश्नार्थक किंवा चिकित्सा करणाऱ्या दृष्टीतून येत असेल त्यांच्या राजकीय वृत्तीचासुद्धा संदर्भ असेल, जसे की एलजीबीटीक्युआयए+ समुदाय तर बातमी करणे आव्हानात्मक असू शकते. कारण पूर्वग्रहदूषित दृष्टीकोनाकडे दुर्लक्ष न करता विषयाचा आणि विषयाच्या संवेदनशीलतेने क्वीअर व्यक्तींच्या आयुष्यावर त्याच्या पडणाऱ्या प्रभावाचा विचार करणे आवश्यक आहे. धार्मिक संवेदनशीलता, धर्मनिरपेक्षतेचा तत्वांना लक्षात ठेवून आणि धार्मिक अल्पसंख्यांकांच्या समुदायाचे रक्षण करत असताना एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या हक्कांचे समर्थन करणे हे नाजूक काम असू शकते.

एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या श्रद्धा व त्या श्रद्धेशी असणारे त्यांचे नातेसंबंध याबद्दल बातमी करताना तुम्हाला अनेक प्रकारच्या परिस्थितींना सामोरे जाऊ लागू शकते. जिथे एखाद्या व्यक्तीच्या श्रद्धा ह्या त्या व्यक्तीच्या लैंगिक ओळखीच्या विरुद्ध असू शकतात. अशा वेळी, काळजीपूर्वक या परिस्थितीचा विचार करणे, त्या व्यक्तीसाठी त्यांची श्रद्धा काय आहे हे समजून घेणे आणि त्यांच्या वैयक्तिक श्रद्धा व प्राधान्यक्रम समजून घेणे आवश्यक आहे.

- कोणत्याही श्रद्धेच्या रचनेसंबंधी बातमी करत असताना, त्या विशिष्ठ श्रद्धेच्या व्यक्तींची मुलाखत घेणे आवश्यक आहे. अनेक एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती एकाच प्रकारची श्रद्धा कशी बाळगतात हे सांगणे महत्वाचे आहे. त्यातील समानता व फरक करणाऱ्या गोष्टी लिहिणे महत्वाचे आहे. संपूर्ण समुदायासाठी एकच निष्कर्ष काढणे हे चुकीचे असू शकते.
    - उदाहरणार्थ, क्वीअर व्यक्तींच्या समस्यांबाबतीत एखाद्या विशिष्ठ मुद्द्यावर न्यायालयात सुनावणी सुरु असताना, जसे की वैवाहिक समानता, काही धार्मिक गट एलजीबीटीक्युआयए+ समुदायाच्या विरोधात किंवा बाजूने बोलू शकतात. अशा प्रतिक्रिया आपल्या बातमीमध्ये समाविष्ठ करताना, विशेषतः अशा प्रतिक्रिया ज्या एलजीबीटीक्युआयए+ अधिकारांना विरोध करणाऱ्या आहेत, त्या धार्मिक श्रद्धेच्या क्वीअर व्यकींच्या विविध प्रतिक्रियासुद्धा बातमीमध्ये समाविष्ठ करणे महत्वाचे आहे. समस्येवरील त्यांच्या प्रतिक्रियेपासून ते धार्मिक गटाने दिलेल्या विरोधातील

प्रतिक्रीयेवरील त्यांची काय प्रतिक्रिया आहे आणि त्या त्यांच्या श्रद्धेसोबत नातेसंबंध कसे जोडतात याचा शोध घ्यायला पाहिजे. (विशेषतः धार्मिक अल्पसंख्यांकांच्या बाबतीत)

- धार्मिक आणि इतर श्रद्धा रचनांवर बातमी करणे महत्वाचे असताना, श्रद्धेच्या नावाखाली बहुसंख्यावादाचा प्रचार करण्यासंबंधी काही मर्यादा निश्चित केल्या पाहिजेत. जरी ह्या मर्यादा संकुचित स्वरूपाच्या असतील तरीही आपल्या बातमीमध्ये त्याचा विचार केल्याने समस्या समजून घेण्यास मदत होऊ शकते.
    - उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती किंवा गटाच्या त्यांच्याच धार्मिक समुदायातील इतर व्यक्ती किंवा गटांवरील टीका/टिप्पणीची नोंद करताना दोन्ही बाजूंच्या प्रतिक्रियांची नोंद घेणे आवश्यक आहे. यामध्ये त्यामधील अंतर्गत गुंतागुंत व त्यातील वर्चस्व असणाऱ्या गोष्टी यांच्याबद्दल सुद्धा विचार करायला पाहिजे. किवळ तटस्थ भूमिका घेण्यासाठी दोन्ही गटांच्या प्रतिक्रिया नोंदविणे बरोबर नाही.
- बहुतेक संघटीत धर्मांमध्ये (विशेषतः अब्राहमिक धर्म आणि पूर्व आशियातील काही श्रद्धा) धर्मग्रंथ आहेत. अशा धर्मग्रंथांचा वापर अनेकदा एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या आणि त्यांच्या अधिकारांच्या विरोधासाठी केला जातो. बऱ्याच वेळी, या धर्माचे प्रतिनिधी त्यांचे मत व्यक्त करतात आणि दावा करतात की , एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींचे अस्तित्व त्यांच्या पवित्र श्रद्धेच्या विरुद्ध आहे. तुम्ही अशा गटाच्या प्रतिक्रियांची बातमी करत असाल किंवा त्यांची मुलाखत घेत असाल तर नेहमी त्याच धर्मातील एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींशी बोला आणि त्याच धर्माने किंवा श्रद्धेने त्यांना अभय देण्यात काही मदत केली आहे का किंवा त्यांनी स्वतःची क्वीअर ओळख स्वीकारण्यासाठी त्यांनी त्या धर्माची केलेली पुन:व्याख्या याबद्दलच्या प्रतिकियांचा समावेश करा.
    - उदाहरणार्थ, काही वर्षांपूर्वी चेन्नई येथे एका अभिमान पदयात्रेदरम्यान ख्रिश्चन संघटनांनी अभिमान पदयात्रेला विरोध करणारी निषेधयात्रा आयोजित केली होती. अनेक बातमीकारांनी एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींच्या प्रतिक्रियांची नोंद न करता ख्रिश्चन संघटनांनी काढलेली निषेधयात्रा एकतर्फी कव्हर केली होती. अशा बातमीमध्ये क्वीअर व्यक्तींच्या प्रतिक्रिया महत्वाच्या आहेत. विशेषतः सदर धर्मातील क्वीअर व्यक्तींच्या प्रतिक्रिया. (या उदाहरणात ख्रिश्चन क्वीअर व्यक्तीच्या प्रतिक्रिया)
- अलीकडच्या काळात, श्रद्धांवर आधारित एलजीबीटीक्युआयए+ गटांच्या स्थापनेत वाढ झाली आहे. जुन्या क्वीअर गटांनीसुद्धा एका विशिष्ट धर्माकडे अस्पष्टपणे किंवा स्पष्टपणे विशिष्ट धर्माकडे झुकण्यास सुरुवात केली आहे. एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींनी स्थापन केलेल्या अशा गटावर बातमी करत असताना त्यांनी अशा गटाची स्थापना करण्यामागची गरज का भासली आणि ते इतर अशाच प्रकारच्या श्रद्धेतून तयार झालेल्या गटांपेक्षा कसे वेगळे आहेत याबद्दल त्यांच्या दृष्टीकोन समजून घ्या.
- भारतामध्ये क्वीअर व्यक्तींचा समावेश असलेले अनेक सांस्कृतिक कार्यक्रम आहेत ज्यांचे मूळ मूलनिवासी लोक संस्कृती, मूलनिवासी श्रद्धा किंवा संघटीत धर्मांच्या संबंधित आहे. अशा कार्यक्रमांना एलजीबीटीक्युआयए+ दृष्टीकोनातून कव्हर करणे चांगली गोष्ट आहे. विशेषतः सांस्कृतिक संदर्भांचा शोध घेत असताना आणि संबंधित संदर्भामुळे क्वीअर व्यक्तींच्या आयुष्यात पडणारी मोलाची भर याबद्दल बोलत असताना जास्त उत्साहवर्धक भाषा वापरणे टाळा आणि क्वीअर व्यक्तींना अशा प्रकारच्या कार्यक्रमांमधे भाग घेताना येणाऱ्या अडचणींवर लक्ष देण्याचा प्रयत्न करा. (अधिक माहितीसाठी अभिमान यात्रा आणि इतर एलजीबीटीक्युआयए+ कार्यक्रम हे प्रकरण पहा)

- उदाहरणार्थ, कुवागम, तामिळनाडूच्या कल्लाकुरीची जिल्ह्यातील कुथंडवर मंदिरात चीथिराई या तमिळ महिन्यात होणारा वार्षिक उत्सव, दरवर्षी यावर मोठ्या प्रमाणत बातम्या केल्या जातात. क्वीअर व्यक्तींच्या संबंधित असे अनेक उत्सव किंवा शोकाचे कार्यक्रम आहेत ज्यांवर बातम्या केल्या जाऊ शकतात. त्या कार्यक्रमातील मिथकांव लक्ष केंद्रित करण्याऐवजी मिथकांव व्यक्तींचा सहभाग आणि उपस्थित व्यक्तींसाठी तो कार्यक्रम त्यांच्यासाठी काय आहे यावर लक्ष केंद्रित करा.

- धार्मिक श्रद्देने प्रेरित असलेल्या एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींवरील गुन्ह्याची किंवा हिंसाचाराची घटना नोंदवताना, वैयक्तिक उदाहरणाबद्दल बोलताना संपूर्ण समुदायाची बदनामी न करणे महत्वाचे आहे. बातम्यांमध्ये, अशा हिंसाचारामुळे एलजीबीटीक्युआयए+ व्यक्तींना होणारा त्रास आणि त्यांच्यावर होणाऱ्या आघाताचा समावेश असावा. तुमची बातमी जर एखाद्या विशिष्ठ धर्माच्या व्यक्ती किंवा गटांद्वारे क्वीअर व्यक्तींवर वारंवार होणाऱ्या हिंसाचाराच्या घटना किंवा या प्रवृत्तीबद्दल असल्यास, तर या विषयामधे अनेक गोष्टींचा समावेश असल्याने काळजीपूर्वक किंवा सूक्ष्मपणे हाताळले गेले पाहिजे. समकालीन घटना आणि अशा वृत्तींचे मूळ समजून घेण्याचा प्रयत्न करा आणि संपूर्ण समुदायाला किंवा श्रद्धेला बदनाम करणे टाळा.

    - उदाहरणार्थ, धार्मिक पंथाचे नेतृत्व करणाऱ्या स्वयंघोषित 'दैवी पुरुष/ स्त्री' यांच्यावर अनेकदा लैंगिक गुन्ह्यांचा आरोप केला जातो. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की, कथित व्यक्तीची लैंगिकता ही त्या गुन्ह्याचे कारण नाही. (अधिक माहितीसाठी गुन्हा हे प्रकरण पहा) हे देखील लक्षात ठेवले पाहिजे की अपराधी हा त्या संपूर्ण धार्मिक किवा श्रद्धा गटाचे प्रतिनिधित्व करत नाही ज्याचा ते नेहमी दावा करत असतात

# ऋणनिर्देश

## मीडिया संदर्भ मार्गदर्शिका

- **सी मौली** (तो) - सह-संस्थापक, क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स
- **रागमालिका कार्तिकेयन** (तो/ती) - वरिष्ठ लीड - प्रेक्षक महसूल आणि प्रयोग, द न्यूज मिनिट
- **गिरीश** (तो) - लेखक आणि कवी. संपादक, क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स
- **सेंथिल** (तो) - प्रकल्प संचालक, क्वीअर चेन्नई क्रॉनिकल्स
- **वाई** (ते) - स्वतंत्र कलाकार
- **अजीफा फातिमा** (ती) - वरिष्ठ रिपोर्टर, द न्यूज मिनिट
- **शिवानी कावा** (ती) - रिपोर्टर, द न्यूज मिनिट
- **लक्ष्मी प्रिया एम** (ती) - वरिष्ठ उपसंपादक, द न्यूज मिनिट
- **जान्हवी** (ती) - सहाय्यक वृत्त संपादक, द न्यूज मिनिट
- **रंजिता गुणसेकरन** (ती) - सहाय्यक निवासी संपादक, द न्यू इंडियन एक्सप्रेस
- **नारायणी सुब्रमण्यम** (ती) - लेखिका आणि सागरी संशोधक
- **सायंतन दत्ता** (ते) - विज्ञान पत्रकार
- **सहाना वेणुगोपाल** (ती/झे)
- **अंकुर पालीवाल** (तो/ते) - स्वतंत्र पत्रकार, क्वीअरबीटचे संस्थापक
- **रागी गुप्ता** (ते) - क्रिएटिव्ह कंटेंट मॅनेजमेंटचे प्रमुख, पिक्सस्टोरी
- **हिमांशू आर्य** (तो/ते) - पत्रकार

- **के सत्य कीर्ती** (तो) - फोटो पत्रकार
- **विजयता ललवाणी** (ती/ते) - स्वतंत्र पत्रकार
- **चेतना आनंद** (ती)
- **प्रशांत भवरे** (तो/ते)- वकील आणि संशोधक
- **शर्वरी देशपांडे** (ती/ते)- स्वतंत्र कलाकार आणि संशोधक
- **ओंकार शिंदे** (तो/ते)- स्वतंत्र अनुवादक आणि संशोधक
- **आर्या पाठक** (ते/ती)- स्वतंत्र अनुवादक आणि संशोधक

## शब्दावली

या शब्दावलीची आवृत्ती क्विअर चेन्नई क्रॉनिकल्स, द न्यूज मिनिट आणि आणखी काही व्यक्तींच्या योगदानासह जानेवारीमध्ये प्रकाशित करण्यात आली. २०२२ मध्ये मद्रास उच्च न्यायालयात इंग्रजी आणि तमिळ माध्यमांसाठी प्रकाशित केले आणि सादर केले. फेब्रुवारी २०२२ च्या आदेशात मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन आनंद व्यंकटेश यांनी तामिळनाडू सरकारला अधिकृत असणाऱ्या शब्दावली मध्ये जोडून घेण्यास सांगितले. त्याचा मराठी अनुवाद क्वीअरबीटने केला आहे.

- **जमीर कांबळे** (कोणतेही सर्वनाम)
- **दिशा शेख** (ती)
- **ओंकार शिंदे** (तो/ते)
- **आर्या पाठक** (ते/ती)
- **प्रज्वल गायकवाड** (तो/ते)
- **प्रियांका तुपे** (ती)
- **प्रियांका अक्कर** (ते)

सर्वसमावेशक न्यूजरूम: एलजीबीटीक्युआयए+ मीडिया मार्गदर्शक पुस्तिका हा द न्यूज मिनिट आणि क्वीअर चेन्नई क्रॉनिकलस् यांचा संयुक्त प्रयत्न आहे, ज्याला गूगल न्यूज इनीशीएटीव्ह द्वारे समर्थन आहे. ही मार्गदर्शक पुस्तिका पत्रकार आणि न्यूजरूम ज्यांना एलजीबीटीक्युआयए+ व्यक्ती, समुदाय आणि समस्यांबद्दल संवेदनशीलपणे बातम्या करायच्या आहे, त्याबद्दल त्यांना माहिती देते. तुम्ही तुमच्या स्टोरी मध्ये पारलिंगी व्यक्तीचा संदर्भ कसा देता? 'लिंगभाव आणि लैंगिक ओळख जाहीर करणे' म्हणजे काय? समलिंगी महिलेने राजकारणात प्रवेश केल्याचे कसे लिहावे? पत्रकाराला पडणाऱ्या अशा प्रश्नांची उत्तरे मार्गदर्शक पुस्तिका देते.

राजकारण, शिक्षण, आरोग्य, व्यवसाय, गुन्हेगारी, क्रीडा आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान यासह विविध बीट्सवर केंद्रित २० प्रकरणांसह, मार्गदर्शिका क्वीअर पत्रकार, लेखक आणि कार्यकर्त्यांनी लिहिलेले आहे आणि केवळ 'काय' या बद्दल बोलत नाही तर ते 'का' याबद्दल देखील लिहिलेले आहे

By

குயர் சென்னை க்ரோனிக்கிள்ஸ் Queer Chennai Chronicles

The NEWS Minute

queerbeat

Supported by

Google News Initiative

www.news-inq.com